संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
२७ मार्च २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)




## साहित्य अकादमीविजेता आबा गोविंदा महाजन
अशोक कौतिक कोळी

## धडे कोरोनाचे : राष्ट्रीय धोरणासाठी आणि समाजकार्यासाठी...
मिलिंद बोकील




जॉबची संधी नक्की!
करिअरची दिशा पक्की!!
कॉलेज सोबत करा करियरची तयारी
MKCL
ज्ञानदीप लावू जगी
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
किंवा घरून आपल्या कंप्यूटरवर शिका
किंवा आपल्या स्मार्टफोनवरून शिका
नव्या करियर्सचे प्रवेशद्वार
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit
प्रवेशासाठी www.mkcl.org/join या लिंकला भेट द्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा
आजच प्रवेश घ्या!
संपर्क : 8411960005

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
२७ मार्च २०२१
वर्ष ७३ / अंक – ३२
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

वार्षिक वर्गणी :
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./ चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001**, **बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ ...संपादकीय
**हा गळाठा हटवणारी लस शोधणार तरी कोण?**
...अभय टिळक

७ **धडे कोरोनाचे : राष्ट्रीय धोरणासाठी आणि समाजकार्यासाठी...**
...मिलिंद बोकील

१९ **यशवंतराव आणि हॅम्लेट**
...सहदेव चौगुले-शिंदे

२३ **'तसनस': निखाऱ्याची धुमसती राख...**
...शंकर विभुते

२७ **साहित्य अकादमीविजेता आबा गोविंदा महाजन**
...अशोक कौतिक कोळी

३१ **आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण** (नव्या आकृतीबंधातील)
...वृषाली देहाडराय

३६ **वठलेल्या झाडाखाली**
...मधु जामकर

३९ **प्रतिसाद**
...डॉ. अनिल केशव खांडेकर, लखनसिंह कटरे,
...बाळकृष्ण शिंदे, सुभाष आठले.

## संपादकीय

# हा गळाठा हटवणारी लस शोधणार तरी कोण?

पुरेपूर एक वर्ष उलटून गेले तरी 'लॉकडाऊन'चे सावट आपली पाठ सोडण्याचे नाव घेत नाही, ही वस्तुस्थिती जितकी चिंताजनक तितकीच चिंतनीयही आहे. काही राज्यांमध्ये आणि त्या-त्या राज्यांतील काही निवडक शहरांमध्ये 'कोविड १९'ने पुन्हा डोके वर काढल्याने २०२० मधील मार्च महिन्यात अंगावर कोसळलेल्या 'लॉकडाऊन'च्या कटू आठवणींनी जवळपास सगळ्यांनाच पुरते भयशंकित करून सोडलेले आहे. सर्वसामान्य नागरिकांचा केवळ धीरच नव्हे, तर संयमही आता पातळ व्हायला लागलेला दिसतो. खास करून, 'लॉकडाऊन'पायी ज्या समाजघटकांनी पराकोटीचे आर्थिक चिमटे सहन केले, ते तर आता पार हातघाईला आलेले आहेत. ''काहीही झाले तरी पुन्हा 'लॉकडाउन' नको'', अशी एक सार्वत्रिक मानसिकता झाल्याचे आपण अनुभवतो आहोत. मुळात, 'कोविड'चा प्रादुर्भाव हा लोकसंख्येच्या घनतेशी निगडित असल्यामुळे शारीरिक अंतर राखण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्याखेरीज अन्य काही हुकमी उपायच नाही, ही या सगळ्यांतील सर्वांत अनोखी बाब होय. आणि, प्रचंड लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात दाटीवाटीचा जनसंपर्क हेच रोकडे वास्तव असल्यामुळे 'कोविड'च्या फैलावाला सुपीक भूमी सततच नांगरून तयार असते. सार्वत्रिक शिस्तीचा एकंदरीनेच असणारा घाऊक अभाव हा त्याच्याच जोडीने आणखी एक पूरक घटक. लसीकरणाच्या संदर्भातील उदंड गोंधळ आणि बेपत्ता असणारी सुसूत्रता व समन्वय पाहता शेवटच्या नागरिकाला लस मिळायला कोणते वर्ष उजाडेल, हे निश्चित सांगण्याच्या परिस्थितीत निदान आज तरी कोणीच नाही. भरीस भर म्हणून की काय, पण राज्यसंस्थेबाबत सर्वसामान्यांच्या मनात वसणाऱ्या विश्वासाची सरासरी पातळी आज पार रसातळाला गेलेली असल्यामुळे, 'कोविड'ची साथ आटोक्यात खरोखरच आलेली नाही की, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी लसनिर्मितीसाठी केलेल्या अब्जावधीच्या गुंतवणुकीवर त्यांना अपेक्षित असणारा फायदा मिळण्याची सोय 'कोविड'च्या दुसऱ्या लाटेची आवई उठवून संगनमताने केली जाते आहे, याबद्दलही अनंत प्रकारच्या वावड्या प्रत्यही कानांवर येत आहेत.

हे काहीही असले तरी, 'कोविड'संदर्भातील गेल्या वर्षभरात साकारलेल्या घडामोडी आणि राजकीय व्यवस्था व शासकीय पातळीवरून त्यांना दिला गेलेला पडसाद यांमध्ये दोन बाबी सातत्यशील राहिलेल्या जाणवतात. व्यापक स्तरावरील कोणत्याही संकटाला तोंड देताना कमालीची तोकडी ठरणारी राज्यसंस्थेची व्यवस्थापनक्षमता कसोटीच्या याही काळात ठसठशीतपणे डोळ्यांत भरली. ही झाली पहिली बाब. राज्यसंस्थेच्या दुर्बळ क्षमतेसंदर्भात चिकित्सक आणि बौद्धिक ऊहापोह अनेक व्यासपीठांवरून उदंड घडला. आजही त्यांत खंड नाही. परंतु, कमजोर राहिलेली (अथवा, जाणीवपूर्वक मरतुकडी राखली गेलेली) ही 'स्टेट कपॅसिटी' बुलंद कशी बनवायची आणि त्या दिशेने जाण्याच्या मार्गावरील मुख्य टप्पे कोणते, या संदर्भातील व्यावहारिक व प्रगल्भ चर्चेचा आजही कोठे मागमूस नाही. दुसरे म्हणजे, कोणत्याही संकटाच्या लांबी-रुंदीशी सुसंगत भासणाऱ्या औरस-चौरस उपाययोजनांसंदर्भात प्रचंड रकमांच्या तरतुदींची घोषणा करण्याची सत्ताधाऱ्यांना असणारी अतोनात हौस गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत सर्वत्र ठासून भरलेली असल्याचे वास्तव 'कोविड'ने पुन्हा एकदा अधोरेखित केले, ही सातत्यशीलतेने प्रतीत झालेली दुसरी वस्तुस्थिती. केंद्र सरकारचा अर्थसंकल्प हे त्याचे बोलके व ठळक उदाहरण. अरिष्टाच्या मुकाबल्यासाठी जितक्या अधिक रकमांच्या घोषणा कराव्यात तितकी सरकारची उपक्रमशीलता अधिक दिसते, असा एक समज या विचित्र कार्यप्रणालीच्या मुळाशी आहे व असतो. अक्राळविक्राळ स्वरूप धारण केलेल्या एखाद्या रोगावर अत्यंत महागडे औषध नेमून दिले की रोग्याला जसा अंमळ दिलासा मिळतो, त्यातलाच हा प्रकार. जीवघेण्या रोगावर भारी किमतीची दवा दिलेली आहे म्हणजे ती जालीम रामबाण 'ट्रीटमेन्ट' असणारच, असा दिलासा काय तो रोग्याला त्यामुळे

मिळतो. बस्स्! त्यापलीकडे काही नाही. जबर बाजारभावाचे ते औषध रोगाच्या मुळाचा नायनाट करणारे आहे अथवा नाही, याची फिकीरही मग ना रोग्याला असते, ना त्याच्या सग्यासोयऱ्यांना. 'कोविड' आणि त्याच्या फैलावापायी अवतरलेला 'लॉकडाऊन' यांच्या संदर्भातही आज घडते आहे ते नेमके हेच. सगळ्यांत चिंतेची आणि चिंतनीय बाब कोणती असेल, तर नेमकी हीच.

'कोरोना'चा फैलाव, त्याने उडवलेला हाहाकार, त्यासाठी करावा लागलेला 'लॉकडाऊन', सर्वसामान्यांच्या जगण्यापासून ते देशाच्या अर्थकारणापर्यंत जीवनाच्या प्रत्येकच अंगाला त्याच्या झोंबलेल्या झळा यांचे चित्र सर्वच जगात थोड्याफार फरकाने एकसमानच दिसले. परंतु, आपल्या देशात मात्र या सगळ्यापायी, तीन समाजघटक तुलनेने सर्वाधिक पोळले-भरडले गेले. शहरोशहरी फोफावलेल्या असंघटित उद्योगांच्या अस्ताव्यस्त विश्वात सामावून घेतले गेलेले कुशल-अकुशल-अर्धकुशल असे शब्दश: अगणित स्थलांतरित; लघुतम, लघु व मध्यम उद्योजक आणि शेतीसह एकंदरच ग्रामीण व्यावसायिक- हे ते तीन घटक होत. या तीन समाजघटकांची जी अतोनात परवड झाली, तिला 'कोविड'इतकेच कारणभूत आहे ते आपल्या देशाच्या व्यवस्थापनात सर्वदूर पसरलेले प्रगाढ असंतुलन. बेबंदपणे पोसले जाणारे बांडगुळी नागरीकरण आणि कुपोषणापायी खुरटलेले ग्रामीण अर्थकारण, हे त्या असंतुलनाचे प्रगट असे मुख्य दोन आयाम. 'लॉकडाऊन'ने एकाच वेळी मुसक्या आवळल्या या दोघांच्याही. धडाकेबाज लसीकरणाद्वारे आज ना उद्या 'कोविड' हटेलही. मात्र दृढमूल झालेल्या या असंतुलनाबाबत आपण काय करणार आहोत, याबाबत आज तरी सर्वत्र बधिरताच जाणवते. चटकन आकलनात येणेदेखील दुरापास्त व्हावे, अशा रकमांच्या तरतुदी असणाऱ्या घोषणांच्या दणदणाटात मूळ दुखण्याची तीव्रता अनंत पटींनी वाढविणाऱ्या त्याच्या मूलभूत कारक घटकाकडेच दुर्लक्ष होईल, अशी भीती वाटते. ही भीती अनाठायी अजिबातच नाही, हे समजावून घेण्यासाठी २०२० मधील फेब्रुवारी-मार्च महिन्यांपासूनचा ढोबळ घटनाक्रम केवळ आठवून बघितला तरी पुरे.

'कोविड' नावाची एक महामारी चीनमध्ये धुमाकूळ घालत असल्याच्या बातम्या २०१९ मधील नोव्हेंबर महिन्यापासूनच जागतिक समुदायाच्या कानांवर पडत होत्या. आपल्या देशात 'कोरोना'चा चंचुप्रवेश घडला तो साधारणपणे २०२० मधील फेब्रुवारीच्या मध्यास. देशात 'कोविड'चा प्रादुर्भाव प्रथम अतिशय जोरकसपणे झाला तो लोकसंख्येची प्रचंड दाटीवाटी असलेल्या महानगरांमध्ये. स्मरणशक्तीला जरा ताण दिला तर एक बाब निश्चित आठवावी. ती अशी की, 'कोविड' हा आपल्या देशात तरी त्याच्या उद्रेकाच्या पहिल्या पर्वात निखळ 'अर्बन फेनॉमेनन' होता आणि ते अतिशय स्वाभाविकच होते. कारण १९९०-९१ नंतर आर्थिक विकासाची आपल्या देशातील एकंदरच प्रक्रिया शहरीकरणाच्या वाढविस्तारास पोषक अशीच राहिलेली आहे. २००१-०२ ते २००८-०९ या काळात देशाच्या ढोबळ देशी उत्पादनातील वाढीचा वार्षिक सरासरी वेग राहिला आठ टक्क्यांच्या परिघात. त्या वाढीचे वर्णन त्या काळात सतत 'जॉबलेस ग्रोथ' असेच होत राहिले. 'जॉबलेस ग्रोथ' म्हणजे रोजगारात शून्य टक्के वाढ, असा अर्थ अजिबात नाही. सरासरी दरडोई उत्पन्न वाढत राहिले तरी त्याला समांतर अशा पद्धतीने वा वेगाने देशातील संघटित, कॉर्पोरेट उद्योगांच्या विश्वात रोजगारनिर्मिती घडून येत नव्हती. ती सगळी आर्थिक वाढ 'जॉबलेस' वाढ होती ती या अर्थाने. रोजगारवाढ चालू होती, पण ती मुख्यत्वेकरून नगरा-महानगरांतील असंघटित उद्योगांच्या विश्वात. अतिरिक्त मनुष्यबळाच्या बोज्याखाली दबलेली शेती किफायतशीर राहिलेली नाही आणि सुयोग्य कौशल्ये व प्रशिक्षण नसल्यामुळे शहरी कॉर्पोरेट नोकऱ्यांच्या वाटा बंद झाल्या, अशा कोंडीत सापडलेल्या अकुशल-अर्धकुशल स्थलांतरितांना सामावून घेत राहते ते शहरी उद्योगांचे हेच लवचिक असे असंघटित क्षेत्र. 'आई जेवू घालीना आणि बाप भीक मागू देईना', असा प्रसंग ओढवलेल्या शहरी स्थलांतरितांचे मायपोट अखेर ठरते ते हेच असंघटित व्यवसायक्षेत्र. देशाच्या ग्रामीण भागांतून लोकसंख्येबरोबरच ग्रामीण गरिबांच्याही शहरांकडे होत राहिलेल्या स्थलांतराचे अक्राळविक्राळ दर्शन घडते ते शहरोशहरी फुगलेल्या उद्योग-व्यवसायांच्या याच असंघटित क्षेत्रात. इतकी वर्षे छुपी बेरोजगारी हे ग्रामीण भारताच्या पाचवीला पुजलेले वास्तव होते. आज तेच नेमके बनलेले आहे शहरी 'इंडिया'चे भागधेय. शहरी संघटित उद्योगक्षेत्राशी या असंघटित क्षेत्राचे नाते असते बहुपदरी आणि नानाविध स्वरूपाचे.

'लॉकडाऊन'ने संघटित उद्योगांच्या नाड्या आवळल्यानंतर साहजिकच हातपाय जखडले गेले ते त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या उद्योग-व्यवसायांच्या असंघटित क्षेत्राचे. मुळात, शहरी समाजजीवनात आणि अर्थकारणात 'उपरे'च गणल्या जाणाऱ्या स्थलांतरितांना एकाएकी प्रगाढ निराधारपण जाणवावे, हे मग ओघानेच आले. ना त्यांची कायदेशीर गुंफण शहरी

कॉर्पोरेट विश्वाशी, ना त्यांची नाळ जुळलेली नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांशी. केवळ कामापुरतेच जवळ करावयाच्या या क्षेत्राबद्दल कोणालाच बांधिलकी नव्हती आणि नाही. सगळी उपजीविका ज्या शहरी अर्थकारणावर विसंबलेली, त्या अर्थचक्राचेच चलनवलन ठप्प झाल्याने असंघटित क्षेत्रातील कामगार-मजुरांची गात्रे जायबंदी व्हावीत, हे तर्कशुद्धच होते. परंतु, पोटाचे गाणे तर्काचा बाजा वाजवून सुरेल बनविता येत नाही. जिथून शहरात आलो, त्या मूळ गावाकडे पुन्हा पाय वळवण्याखेरीज मग शहरी स्थलांतरितांना अन्य पर्यायच नव्हता. परतीच्या खडतर प्रवासात झालेले त्यांचे धिंडवडे साऱ्यांनीच बघितले. त्याबद्दल आतड्यापासून कळवळाही व्यक्त झाला. पण मुळात हे असे अधांतरी जगणे या प्रचंड मनुष्यबळाच्या भाळी लिहिणाऱ्या विकासविषयक धोरणदृष्टीबाबत आज एका वर्षानंतर तरी काही कोठे चर्चा, विचार, चिकित्सा चालू दिसते का? बरे, निरुपायाने गाव जवळ करणाऱ्यांना तरी तिथे जगण्याची काय सोय होती? विकासाची सगळी प्रक्रियाच कमालीची असमान आणि शहरकेंद्री बनलेली असल्याने महात्मा गांधी रोजगार हमी योजनेवर हजेरी लावण्याखेरीज परतीची वाट चोखाळलेल्या स्थलांतरितांना अन्य मार्गच नव्हता. म्हणजे, हा दैवदुर्विलास बघा कसा आहे तो. शहरांमधील अत्याधुनिक उत्पादनव्यवस्थेमध्ये शिरकाव करून घेता येईल, अशी कौशल्ये व शैक्षणिक क्षमता प्रचलित शिक्षणव्यवस्थेमध्ये न मिळाल्यामुळे स्थलांतर करूनही शहरांत रोजंदारीवर राबणेच नशिबी आले. श्रमांच्या शहरी बाजारपेठेतील 'स्ट्रक्चरल' असमतोल तिथे या स्थलांतरितांच्या तसा मुळावर आला. आणि शहरांमध्ये कुशल-अर्धकुशल रोजगार पदरात पाडून घेताना प्रत्यक्ष कार्यानुभवाद्वारे जी काही क्षमता या स्थलांतरितांनी कमावलेली होती, तिचा विनियोग करून घेण्याच्या संधी गावात नसल्यामुळे पुन्हा रोजगार हमीच त्यांच्या पदरी आली. म्हणजे, ग्रामीण भारतातील श्रमांच्या बाजारपेठेतही पुन्हा एक विचित्र असा 'स्ट्रक्चरल' असमतोल निर्माण होऊन नांदतो आहेच. 'लॉकडाऊन'ने स्थलांतरितांची हानी केली ती अशी दुहेरी.

'लॉकडाऊन'च्या फटक्याने कोलमडलेल्या समाजघटकांच्या माध्यमातून आज प्रकर्षाने पुढ्यात उभरलेले वास्तव हे असे कठोर, जटिल आणि दुर्धर आहे. या वास्तवाला आपण कसे भिडणार आणि त्यांवर कोणती उपाययोजना करणार, यांबद्दल मात्र आज कोठेही आवाजदेखील उमटत नाही. आकड्यांच्या भरजरी खेळात रंगलेल्या अंदाजपत्रकांमध्ये तर या गुंतागुंतीची किमान जाणही अणुमात्र जाणवत नाही. 'कोविड'चे संकट हे केवळ तात्कालिक निमित्त होय. खासगी तसेच सार्वजनिक गुंतवणूक, पायाभूत सेवासुविधा, शिक्षण, आरोग्य, वाहतूक, दळणवळण... यांसारख्या सार्वजनिक सुविधा, भांडवल, रोजगाराच्या संधी, प्रशासकीय क्षमता, नेतृत्व... अशांसारख्या प्रत्येकच बाबीमध्ये आपल्या देशात जे प्रचंड असंतुलन विकसित झालेले आहे, त्यांपायी 'लॉकडाऊन'सारख्या प्रसंगी अनिवार्य ठरणाऱ्या कठोर उपाययोजनांची दाहकताही विषम पद्धतीनेच वाटली जाते. याबाबत धोरणात्मक पातळीवर आपण काय विचार करतो आहोत आणि मुळात विचार करणार आहोत अथवा नाही, हाच खरा कळीचा प्रश्न उरतो. 'कोविड' आला तसा जाईलही. न जाणो, उद्या 'कोविड'चे एखादे चुलत भावंड जगप्रवासावर निघेल. व्यापक प्रमाणावर उत्पातक ठरणारी कोणतीही समस्या मुळातील प्रश्नांची धग अधिकच वाढवते, या वास्तवाला आपण भिडणार का, इथे सगळी गाडी येऊन थांबते.

'लॉकडाऊन'ने उभी केलेली प्रश्नांची ही मालिका आज एक वर्ष उलटल्यानंतरही तितकीच प्रस्तुत आहे. विद्रूपपणे फोफावणारे नागरीकरण, अ-लक्षित राहत चाललेले ग्रामीण जीवन, विकासप्रक्रियेचे जाणीवपूर्वक विकेंद्रीकरण घडवून आणण्यासंदर्भातील प्रगाढ अनास्था, ग्रामीण औद्योगिकीकरणाचा संपूर्ण पडलेला विसर, एकंदरच ग्रामीण अर्थकारणाच्या सक्षमीकरणाबाबत बळजोर बनलेली बेफिकिरी... असे हे आपले बहुपदरी मूळ दुखणे आहे. लसीकरणासाठी भरभक्कम आर्थिक तरतूद करणे, आरोग्ययंत्रणांच्या सबलीकरणाकडे निधीचे प्रवाह वळवणे (निदान, तसा आभास तरी उत्पन्न करणे), 'पब्लिक-प्रायव्हेट पार्टनरशिप'च्या 'मॉडेल'चा जप ऊठसूट करणे... या सगळ्यांपायी वरवरची मलमपट्टी होईलही कदाचित. परंतु, खोल रुजलेल्या गँगरीनचे निराकरण काही त्यांमुळे घडून येणार नाही. ते घडून यावे अशी इच्छाशक्ती शाबूत असणारे नेतृत्वच आज अभावाने दिसते. पहिल्या 'लॉकडाऊन'पायी निर्माण झालेली प्रश्नांची मालिका ही अशी आहे. पुरते एक वर्ष सरून गेले तरी आपल्या देशातील सार्वजनिक चर्चेच्या विश्वात तिचा कोठे मागमूसही दिसत नाही. हा गळाठा हटवणारी लस शोधणार तरी कोण?

**अभय टिळक**

agtilak@gmail. com

मिलिंद बोकील

# धडे कोरोनाचे : राष्ट्रीय धोरणासाठी आणि समाजकार्यासाठी...

‘सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट अॅन्ट अॅक्टिव्हिटीज’ (CYDA) या संस्थेच्या वतीने, कोरोनाकाळात जे मदतकार्य करण्यात आले त्याचा समाजशास्त्रीय अभ्यास करून अहवाल-लेखन करण्याचे काम समाजशास्त्राचे अभ्यासक व आघाडीचे मराठी लेखक मिलिंद बोकील यांनी केले आहे. एकूण २२ पृष्ठांचा तो अहवाल इंग्रजीमध्ये लिहिला गेला असून, cydaindia.org या वेबसाईटवर उपलब्ध आहे. त्या अहवालाच्या अखेरीस ‘कोरोना कालखंडातून मिळालेले धडे’ हा विशेष विभाग आहे. तो भाग मराठीत आणण्याची विनंती आम्ही मिलिंद बोकील यांना केली होती, त्यातून आकाराला आलेला हा लेख बराच मोठा असला तरी; एकाच अंकात प्रसिद्ध करीत आहोत, कारण एकाच बैठकीत तो वाचणे अधिक उपयुक्त ठरणार आहे. विशेषत: कोरोनाकाळातील पहिल्या लॉकडाऊनला एक वर्ष पूर्ण झाले आहे त्या पार्श्वभूमीवर तरी... - संपादक

**१. पार्श्वभूमी**

कोविड महासाथीच्या काळ्याकुट्ट ढगांनी सगळ्या जगाला ग्रासून टाकलेले असताना भारतात जर कोणता आशेचा किरण दिसला असेल, तर तो म्हणजे स्वयंसेवी संस्थांनी आणि कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्तपणे दिलेला प्रतिसाद! या महासाथीला तोंड देताना केवळ भारतातीलच नाही तर सगळ्या जगातील सरकारे दिग्मूढ झालेली असताना, शासकीय यंत्रणा पांगळ्या झालेल्या असताना आणि समाजामध्ये भीतीचे प्रचंड वातावरण असताना स्वयंस्फूर्त संस्थांनी ही जी कामगिरी बजावली, तिला भारताच्या सामाजिक इतिहासामध्ये तोड नाही.

खरे तर आपत्तीनिवारण हे काही स्वयंसेवी संस्थांचे पारंपरिक काम नव्हते, परंतु १९९३ च्या लातूर भूकंपापासून भारतातील स्वयंसेवी संस्था ह्या आपत्तीकाळातील मदतकार्यात आणि नंतरच्या पुनर्वसनामध्येही आपला सहभाग देत आल्या आहेत. नंतरच्या काळातील कच्छमधील भूकंप, दक्षिण भारतातील सुनामी, गढवालमधील ढगफुटी, ब्रह्मपुत्रेचे पूर, पूर्व भारतातील वादळे- एवढेच नाही तर दंगली, दहशतवादी हल्ले, आग, चेंगराचेंगरी अशा मानवनिर्मित आपत्तींमध्येही त्यांनी मोलाची कामगिरी बजावलेली आहे. ह्या सगळ्या संकटांमध्ये काम केल्याने स्वयंसेवी संस्थांना मदतकार्याचा अनुभव तर प्राप्त झालाच, शिवाय निरनिराळ्या प्रकारची आव्हाने स्वीकारावी लागल्याने आपत्ती-निवारणाच्या कौशल्यांमध्येही वाढ झाली. हे कोणाच्याही लक्षात येईल की, सामाजिक संस्थांचा प्रतिसाद हा उत्तरोत्तर अधिकाधिक प्रगल्भ, कौशल्यपूर्ण आणि सर्वसमावेशक होत गेलेला आहे. ह्याचे एकच उदाहरण द्यायचे झाले तर- लातूर भूकंपाच्या वेळेस आपत्तीग्रस्त स्त्रियांना सॅनिटरी नॅपकिन्स दिले पाहिजेत याची जाणीव कोणालाही नव्हती, परंतु संवेदनशील स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी ही गरज ओळखल्यामुळे

त्यानंतरच्या आपत्तींमध्ये ह्या गोष्टीचा समावेश मदतकार्याच्या जिनसांमध्ये होत गेला.

स्वयंसेवी संस्थांचे हे ज्ञान व कौशल्य वाढण्यामध्ये ज्या गोष्टीची सर्वांत मोठी मदत झालेली आहे, ती म्हणजे– प्रत्येक आपत्तीमधून शिकलेले धडे आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांचे दस्तावेजीकरण (डॉक्युमेंटेशन). प्रत्येक आपत्तीमधून शिकायला तर पुष्कळच मिळते; परंतु ते शिक्षण जर व्यवस्थितरीत्या संग्रहित केले गेले नाही, तर मग त्याचा काही उपयोग नसतो. नंतरच्या पिढीतल्या तरुण कार्यकर्त्यांना मग त्याचा फायदा होत नाही. तेव्हा नुसते मदतकार्य करून थांबायचे नाही, तर त्यातून मिळालेली शिकवण ग्रंथित करून ठेवायची, हीसुद्धा स्वयंसेवी चळवळीची प्रेरणा राहिलेली आहे. ह्या प्रेरणेला अनुसरूनच कोविड महासाथीच्या काळातले हे धडे नोंदवलेले आहेत. ते अर्थातच केवळ या महासाथीपुरतेच मर्यादित नसून, अशा कोणत्याही आपत्तीकाळासाठी लागू पडणारे आहेत.

हे धडे शिकण्यासाठी निमित्त झाले ते म्हणजे 'सेंटर फॉर युथ डेव्हलपमेंट ॲन्ड ॲक्टिव्हिटीज' (सीवायडीए) ह्या पुणे येथील संस्थेने केलेल्या कोरोना काळातील मदतकार्याचे. सीवायडीए ही संस्था गेली पंचवीस वर्षे मुख्यत: युवकांसोबत काम करत असली तरी वर उल्लेख केलेल्या निरनिराळ्या आपत्तींमध्ये तिने मदतकार्य केलेले होते. त्यामुळे कोरोनाकाळातही (एप्रिल–ऑगस्ट २०२०) अशाच प्रकारचे कार्य तिने हाती घेतले. ह्या कामाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, ज्याला 'मिशन' म्हणतात, अशा प्रकारच्या सर्वंकष मोहिमा ह्या संस्थेने काढल्या आणि केवळ एकटीने काम करण्याऐवजी इतर सामाजिक संस्था, डोनर एजन्सीज, कार्यकर्त्यांचे गट, सीएसआर फाउंडेशन्स, दुसऱ्या शहरांतील नेटवर्क्स एवढेच नाही तर स्थानिक नगरसेवक, पोलीस, महानगरपालिका, आरोग्य यंत्रणा आणि मुलकी प्रशासन यांच्या समन्वयातून काम केले. याशिवाय पुण्यातील येरवडा परिसरात– जिथे संस्थेचा प्रत्यक्ष संबंध होता– स्थानिक लोकांसोबतही मदतकार्य केले. कोरोना आपत्तीच्या ह्या पहिल्या पाच महिन्यात सीवायडीए संस्थेने ३१,००० हून अधिक कुटुंबांना शिधावाटप केले, ६,००० हून अधिक स्थलांतरित कामगारांना जेवण पुरवले, तर ३,४०० कामगारांना घरी परतण्यासाठी प्रवासाची सोय केली. ह्या संस्थेने केलेल्या कार्याची माहिती देणे हा या लेखाचा उद्देश नाही; ते तपशील संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत (https://cydaindia.org).

ह्या मदतकार्याच्या खिडकीतून कोरोनाकाळातील चित्र कसे दिसले आणि त्यातून भविष्यातील समाजकार्याकरता आणि सार्वजनिक धोरणाकरता (पब्लिक पॉलिसी) कोणती शिकवण मिळते ह्याचा अभ्यास करून ते निष्कर्ष ह्या लेखात मांडलेले आहेत. हा अभ्यास करताना लाभार्थ्यांच्या मुलाखती, समूहांशी प्रत्यक्ष भेटी, इतर सहभागी संस्थांशी चर्चा, प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मुलाखती, तज्ज्ञांशी सल्लामसलत आणि ह्या कार्यात सामील झालेल्या निरनिराळ्या कार्यकर्त्यांशी संवाद ह्या पद्धती वापरल्या. हा अभ्यास करण्यामागची ही समाजशास्त्रीय पद्धत आहे, आरोग्यशास्त्रीय किंवा प्रशासकीय नाही. त्यामुळे कोरोना विषाणूचे जैवशास्त्रीय स्वरूप किंवा त्याची जीवशास्त्रीय चिकित्सा आणि सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भातील उपाययोजना ह्या या अभ्यासाच्या कक्षेत घेतलेल्या नाहीत. सविस्तर इंग्रजी अहवाल हा सीवायडीए संस्थेच्या वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**२. महासाथीचा अनुभव**

समाजकार्यासाठी कोणते धडे मिळतात, हे पाहण्यापूर्वी कोविड काळातील एकंदर परिस्थितीचा धावता आढावा घेणे उचित राहील.

कोरोना विषाणूबद्दल एक गोष्ट निश्चितच खरी होती की, हा एक 'अनोखा' (नॉव्हेल) विषाणू होता. त्याच्या अनोखेपणामुळे त्याने जगाला बेसावधपणे गाठले. जरी ह्या विषाणूची प्रजाती विश्वात पूर्वीपासून अस्तित्वात असली तरी त्याचे जे प्रकटीकरण झाले, त्यामुळे सर्वसामान्य जनताच काय परंतु वैज्ञानिक जगही बुचकळ्यात पडले. भारतातील या संदर्भातील जी शीर्षस्थ संस्था आहे– इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च– तिच्या 'इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्च' या नियतकालिकाच्या ऑगस्ट–सप्टेंबर २०२०च्या संपादकीयात असे स्पष्टपणे म्हटले होते की, 'या विषाणूसंदर्भात ज्ञातापेक्षा अज्ञातच मोठे आहे.' कोरोना विषाणूसंबंधात कोणतीही चर्चा करताना ही गोष्ट कायम लक्षात ठेवली पाहिजे. (हा लेख छापायला जात असताना वृत्तपत्रांमध्ये एक बातमी वाचण्यात आली. राज्याचे निवृत्त आरोग्य महासंचालक, जे सध्या आपले कोरोना सल्लागारही आहेत, त्यांनाच लसीचे दोन डोस

घेतल्यानंतरही कोविड झाला! लोकसत्ता, पुणे १९ मार्च २०२१)

मात्र कोरोना विषाणूच्या स्वरूपाबद्दल आणि त्याचे प्रकटीकरण व परिणाम याबद्दल अनभिज्ञता असली तरी अशा प्रकारचे विषाणू जगात थैमान घालून मानवजातीच्या अस्तित्वालाच नख लावू शकतात, याची जाणीव मात्र वैज्ञानिक जगाला पुरेपूर होती आणि सर्वसामान्य जनतेलाही त्याचा विदारक अनुभव आलेला होता. गेल्या वीस–तीस वर्षांच्या काळात एन्फ्लुएंझा, कॉलरा, डेंग्यू, चिकुनगुनिया, इबोला, स्वाइन फ्लू, मंकिपॉक्स, निपा, सार्स, पिवळा ताप, झायका अशा अनेक विषाणूंनी जगाला हैराण केलेले होते. पुण्यासारख्या आधुनिक महानगरातही डेंग्यू, चिकुनगुन्या आणि स्वाइन फ्लू या रोगांनी शेकडो माणसे दगावलेली होती. मात्र असे असूनही ह्या साथींच्या मुकाबल्यासाठी जी 'तयारी' (प्रिपेअर्डनेस) लागते, तिच्याकडेसरकारने किंवा सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी अक्षम्य दुर्लक्ष केले होते. 'सकाळ' दैनिकाच्या १६ सप्टेंबर २०२० रोजीच्या बातमीप्रमाणे खरे तर पुणे महानगरपालिकेने साथीच्या रोगांचा मुकाबला करण्यासाठीचा एक कृती आराखडा (ब्लू प्रिंट) पूर्वी बनवला होता, पण तो कधीही अमलात आणला गेला नव्हता.

साथीच्या रोगांचा वैज्ञानिक रीतीने मुकाबला करण्याचा मानवाचा इतिहास खरे तर किमान दोन–अडीचशे वर्षे जुना आहे (एडवर्ड जेन्नरने देवीच्या रोगावरची लस १७९६मध्ये शोधून काढली). त्यामुळे अशा महासाथी आल्यावर काय करायचे याचे ज्ञान आणि कौशल्य वैज्ञानिक जगाने चांगले विकसित केलेले आहे. साथरोगतज्ज्ञांच्या मते (एपिडेमॉलॉजिस्ट), विषाणू वा रोग कोणताही असला तरी, त्यांचा प्रतिकार करण्याची एक त्रिसूत्री आहे. ती म्हणजे– 'चाचणी, शोध आणि उपचार' (इंग्रजीत तीन 'टी'– टेस्ट, ट्रेस, ट्रीट). म्हणजे संशयित रोग्याची चाचणी किंवा तपासणी करा, त्याच्या संपर्कात आलेल्यांचा शोध घ्या आणि मग त्या सर्वांवर उपचार करा. विषाणू अनोखा असू शकतो, पण ही त्रिसूत्री मात्र अनेक वर्षांच्या अनुभवातून तावून–सुलाखून सिद्ध झालेली आहे.

भारतात कोविड–१९ साथीचा मुकाबला करण्यासाठी देशव्यापी टाळेबंदीचे पाऊल उचलले गेले. आता



पश्चातबुद्धी म्हणून नाही, पण तेव्हाही हा निर्णय विवादास्पद होता. पुरेशी माहिती नसल्याने सरकार गोंधळलेले होते आणि अतिसावधगिरीपोटी हा निर्णय घेतला गेला, असे म्हणता येईल. परंतु वैज्ञानिक दृष्टीने पाहायचे झाले तर तज्ज्ञांनी जी वरील त्रिसूत्री सांगितली होती, तिचा अंगीकार करणे योग्य झाले असते. सुरुवातीच्या काळात म्हणजे मार्च २०२० मध्ये देशातल्या रुग्णांची संख्या थोडी होती आणि जे काही रुग्ण होते ते मुख्यत: महानगरांमध्ये आणि तेही परदेशांतून आलेले होते. त्यांचा शोध घेऊन त्यांचे विलगीकरण करणे आणि आवश्यकतेनुसार त्या-त्या भागात स्थानबंदी क्षेत्रे तयार करणे (कंटेनमेंट झोन्स) हे शक्य आणि योग्य झाले असते. असे न करता देशव्यापी टाळेबंदी करण्यात आली. जर पुण्यासारख्या शहरांत रुग्ण असतील, तर तिथला भाग किंवा पेठा बंद करणे किंवा फारच झाले तर फक्त पुणे शहरात टाळेबंदी करणे उचित होते. मात्र रुग्ण पुण्यात असताना गडचिरोली, बांसवाडा, तिरुचिरापल्ली किंवा आसाम-अरुणाचल प्रदेशामध्ये टाळेबंदी लावणे तर्कशुद्ध नव्हते. मुख्य म्हणजे देशांतर्गत दळणवळण बंद करण्यात योग्य ते तारतम्य दाखवले गेले नाही. मालवाहतुकीवर सरसकट निर्बंध आणण्याचे कारण नव्हते. नंतरच्या काळात अनेक देशांनी टाळेबंदीचे पाऊल उचलले असले तरी भारतात ज्या प्रकारची अमानुष टाळेबंदी लादली गेली, तशी तिथे नव्हती. युरोप-अमेरिकेचे सोडा; पण पाकिस्तान, अफगणिस्तान, बांगलादेश यांसारख्या आपल्याहून अविकसित देशांतही अशा प्रकारचे टोकाचे पाऊल उचलले गेले नव्हते. अतिसावधगिरी हे एक कारण असेल, पण खऱ्या वैज्ञानिकतेचा अभाव आणि आपण काही तरी भव्य-दिव्य, नाट्यपूर्ण व अभूतपूर्व करतो आहोत, अशी सत्ताधाऱ्यांची समजूत व प्रवृत्तीही त्याला कारणीभूत होती. शिवाय हे जे 'मॉडेल' घेतले ते चीनसारख्या हुकूमशाही, एकाधिकारवादी आणि मानवाधिकार धाब्यावर बसवणाऱ्या देशाकडून! भारतासारख्या संघराज्यीय, लोकशाही प्रजासत्ताकासाठी ते उपयुक्त नव्हते.

या टाळेबंदीचा सगळ्यात मोठा दुष्परिणाम जो सगळ्यांनी पाहिला तो म्हणजे, त्यातून दळणवळण आणि लोकांची हालचाल थांबवण्याचा जरी उद्देश होता तरी प्रत्यक्षात थांबले ते म्हणजे काम- म्हणजे श्रम किंवा उत्पादक कार्य. आपण लोकांना घरात डांबून बसवतो म्हणजे त्यांना काम करण्यापासून परावृत्त करतो, ही साधी गोष्ट धोरणकर्त्यांच्या का लक्षात आली नाही? एक माहिती-तंत्रज्ञान क्षेत्र सोडले तर बाकीच्यांना 'घरातून काम' करण्याची सोय नव्हती किंवा तसा अवकाश नव्हता. या गोष्टीचे जे भयावह परिणाम झाले, ते सगळ्यांनी पाहिले. बेकारी व दारिद्र्य तर वाढलेच शिवाय आर्थिक उत्पादन बंद पडल्याने देशही कंगाल झाला. भारत हा खरं तर तरुण श्रमिकांचा देश. हे श्रमिक काही प्रौढ, वयस्कर किंवा आजारी व्यक्तींसारखे धोक्याच्या परिस्थितीत नव्हते. सुरक्षित वातावरणात आणि आरोग्याची योग्य काळजी घेऊन जर उत्पादक कार्य चालू ठेवले गेले असते, तर ही भीषण परिस्थिती आली नसती.

टाळेबंदीचा सर्वांत प्रचंड तडाखा बसला तो स्थलांतरित मजुरांना. त्या मजुरांची घराकडे परत जाताना जी ससेहोलपट झाली, ती सर्वांनी पाहिली. ही दृश्ये एकविसाव्या शतकातील भारताची होती की अश्मयुगातील? कारण अश्मयुगातच अशा प्रकारे माणसे शेकडो मैल चालत जात असत. टाळेबंदीचा या कष्टकऱ्यांवर काय परिणाम होईल याचा कोणताही विचार दिल्लीत बसणाऱ्यांनी केला नाही. ह्याचे साधे कारण म्हणजे ही माणसे सत्ताधाऱ्यांना आणि धोरणकर्त्यांना दिसतच नाहीत. त्यांना वाटते, देश केवळ 'वित्त भांडवल' म्हणजे, 'फायनान्स कॅपिटल'वर चालतो. दुसरी गोष्ट म्हणजे, ही माणसे स्थलांतरित होती हा एक भाग; पण मुळात ती श्रमिक-कष्टकरी होती. शहराच्या गिचमिड्या चाळींत, गरम भट्ट्यांसारख्या वातावरणात, झोपडपट्ट्यांमध्ये, उघड्या रस्त्यांवर, उन्हातान्हात, वाऱ्यापावसात, बांबूंच्या परातींवर किंवा जमिनीच्या पोटात श्रमिक काम करत असतात म्हणून देश चालतो. देशातील सुमारे ९० टक्के श्रमिक हे असंघटित उद्योगांमध्ये आहेत, पण ते आमच्या धोरणाच्या वा विचारांच्या केंद्रस्थानी नाहीत.

सर्वांत दुर्दैवी गोष्ट म्हणजे, ह्या श्रमिकांचे शोषण हाच आमच्या राष्ट्राचा आणि समाजाचा स्थायिभाव आहे. आमची सगळी समृद्धी ही या शोषणावर आधारलेली आहे- मग ते शेतमजूर असोत, खाणकामगार असोत, बिल्डिंग मजूर असोत वा आमच्या घरांतील मोलकरणी. हीच गोष्ट या निमित्ताने ठसठशीतपणे समोर आली (बऱ्याच लोकांना वाटते की कार्ल मार्क्स कालबाह्य झाला, पण कोरोनाकाळात मार्क्स आम्हाला पुन्हा भेटला). हे असंघटित मजूर ज्या उद्योगक्षेत्रांमध्ये होते, त्यातील

कल्याणकारी मंडळांनी त्यांना मदत का केली नाही? (उदा. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ). प्रत्येक क्षेत्रांमध्ये असे कल्याणकारी मंडळ का नाही? प्रत्येक श्रमिक अशा मंडळाचा सभासद का नाही? जी आहेत ती मंडळे काय करत होती? स्थलांतरित मजुरांना ह्यांच्या कक्षेत कसे आणता येईल? एक समाज म्हणून आपण ह्या प्रश्नांना कधीही भिडलेलो नाही आणि म्हणून आपत्तीकाळात ही भीषण परिस्थिती उद्‌भवली. ह्या श्रमिकांशिवाय जे इतर घटक आहेत- म्हणजे सेक्स-वर्कर्स, तृतीयलिंगी व्यक्ती किंवा भटके-विमुक्त- त्यांचा विचार तर आपला ढोंगी समाज कधी करतच नाही.

ही टाळेबंदी प्रत्यक्षात आणण्यासाठी ज्या दोन कायद्यांचा उपयोग केला गेला, त्यातला एक म्हणजे 'साथरोग अधिनियम १८९७' आणि दुसरा म्हणजे 'आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५'. ह्या कायद्यांचा उपयोग हे या क्षेत्रातले आपले धोरण-दारिद्र्य स्पष्टपणे दाखवते. पहिला कायदा हा ब्रिटिशांच्या काळात सव्वाशे वर्षांपूर्वी, प्लेगच्या काळात तयार केला गेला होता. तो उघड-उघड वसाहतवादी कायदा आहे. तोच आपण स्वातंत्र्यानंतर पंचाहत्तर वर्षे झाली असूनही वापरला. मधल्या काळात साथीच्या रोगांच्या संदर्भात आपण काहीच विचार केला नाही? दुसरा कायदा हा प्रामुख्याने पूर, वादळे, भूकंप अशा आपत्तींना तोंड देण्यासाठी तयार करण्यात आलेला असून त्यात 'आपत्ती व्यवस्थापन' ही संज्ञा संदिग्धपणे तर वापरलेली आहेच, शिवाय मुख्य चर्चा ही केंद्र व राज्यस्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणे स्थापन करण्याची आहे. लोकांसाठी कसे उपयोगी पडू, असा विचारच त्यात नाही. आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य हे खरे तर स्थानिक पातळीवर केले जाते, पण त्या संदर्भात कलम ४१ मध्ये एक छोटासा परिच्छेद तेवढा घालण्यात आलेला आहे. साथीच्या रोगांचा आणि इतर आपत्तींचा एवढा इतिहास असताना आपले सार्वजनिक धोरण किती ढिसाळपणाचे आहे याचेच हे निदर्शक आहे.

ह्या कायद्यांच्या आणि एकूणच टाळेबंदीच्या निमित्ताने जो खरा वैचारिक मुद्दा ऐरणीवर यायला पाहिजे होता, पण ज्याची पुरेशी चर्चा झाली नाही, तो म्हणजे- केंद्र व राज्य संबंध. ज्या राज्यांमध्ये विरोधी पक्षांची सरकारे होती तिथे या संदर्भात राजकारण पुष्कळ केले गेले, परंतु अशा आपत्तीच्या काळात केंद्राची भूमिका व कर्तव्य काय आणि राज्य सरकारांची काय ह्या गोष्टींचा विचार झाला नाही. भारताचे संघराज्यीय स्वरूप लक्षात घेता, केंद्राची भूमिका ही पालकत्वाची म्हणजे ज्ञान व माहिती पुरवण्याची किंवा सुसूत्रता ठेवण्याची राहायला पाहिजे होती; तर कार्यकारी निर्णय हे राज्य सरकारांकडेच सोपवायला हवे होते. 'सार्वजनिक आरोग्य' हा राज्यांच्या अखत्यारीतला विषय असल्याने केंद्राने किती हस्तक्षेप करायचा याचे तारतम्य ठेवायला हवे होते आणि राज्य सरकारांनीही आपली क्षमता वाढवायला हवी होती.

ही गोष्ट तर सगळ्यांना माहीतच आहे की, आपल्या सार्वजनिक आरोग्य यंत्रणा- मग त्या शहरातल्या असोत की ग्रामीण भागातल्या- ह्या आपत्तीला तोंड द्यायला अजिबात सक्षम नव्हत्या. गेल्या ४० वर्षांमध्ये सार्वजनिक आरोग्याची जी दुर्दैवी हेळसांड झालेली आहे, त्याची किंमत आपण कोरोनाकाळात मोजली. अनेक वर्षे मागणी होत असूनही सरकार सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या तीन टक्केही खर्च आरोग्यसेवांवर करत नाही (पुतळे आणि स्मारकांवर मात्र हजारो कोटी रुपये खर्च होतात). आपल्या आरोग्यसेवांचे उत्तरोत्तर खासगीकरण करून त्यांना विमा कंपन्यांच्या दावणीला बांधण्याचे जे धोरण आपण स्वीकारलेले आहे, त्याचे हे फळ आहे. पुण्यासारख्या श्रीमंत महानगरातही पुणे महापालिकेच्या आरोग्यसेवेत तज्ज्ञ ॲलोपॅथिक डॉक्टरच नव्हते! आपल्या धोरणकर्त्यांनी ही गोष्ट नीट लक्षात घेतली पाहिजे की- जेव्हा महासाथ येते तेव्हा तुम्ही 'जंबो हॉस्पिटल' उभारू शकता, खाटा टाकू शकता, इंजेक्शनच्या सुया गोळा करू शकता; पण तज्ज्ञ डॉक्टर व नर्सेस निर्माण करू शकत नाही आणि ते जर नसतील, तर तुमच्या बाकीच्या उपाययोजनेला काहीच अर्थ राहत नाही.

कोरोना विषाणूशी हा जो काही सामना चालला होता (आणि अजूनही चालणार आहे), त्यात आमचा प्रशासकीय पातळीवर कर्णधार म्हणजे 'कॅप्टन' कोण होता? ही आपत्ती सार्वजनिक आरोग्याच्या क्षेत्रातली असल्याने आरोग्य-क्षेत्राला ह्याचे नेतृत्व द्यायला हवे होते की नाही? म्हणजे आमचे 'जिल्हा आरोग्य अधिकारी' किंवा शहरांच्या पातळीवर महानगरपालिकांचे आरोग्य अधिकारी हे आमचे कॅप्टन असायला हवे होते. पण प्रत्यक्षात निर्णयांचे अधिकार कोणाला दिले होते, तर कलेक्टर किंवा पोलीस अधीक्षक/आयुक्त यांना. हे पुन्हा ब्रिटिशांच्या वेळचेच धोरण होते. कायदा आणि सुव्यवस्था

राखायची असल्याने असे करणे अटळ होते, असे कोणालाही वाटेल; पण मुळात हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न होता का? हा काही दहशतवादी हल्ला किंवा जातीय दंगली नव्हत्या. कलेक्टर/एसपी यांनी दुसऱ्या फळीत असायला हवे होते; नेतृत्व हे आरोग्य अधिकाऱ्यांकडेच असायला हवे होते, कारण ही आरोग्याच्या बाबतीतली आणीबाणी होती. आपला समाज आणि प्रशासन हे अजूनही वसाहतवादी मानसिकतेचे असल्यानेच अशा बाबतीत काही वेगळे वा नावीन्यपूर्ण धोरण आपण स्वीकारले पाहिजे, असे आपल्याला वाटत नाही. पोलिसांच्या ताब्यात एकदा तुमच्या जीवनाचे नियंत्रण दिले की, मग ते ब्रिटिश आहेत की भारतीय ह्यात फार फरक राहत नाही.

कोरोनाकाळात केंद्र व राज्य यांच्यामध्ये जी साठमारी चालली होती त्यात 'स्थानिक स्वराज्य संस्था'ना काहीही स्थान वा किंमत नव्हती. खरे तर सगळे काम झाले ते नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदांच्या पातळीवर; परंतु निर्णयांच्या संदर्भात ह्या संस्था पराधीन आणि पांगळ्या होत्या. दुसरी गोष्ट अशी की– टाळेबंदीच्या सुरुवातीच्या काळात, एरवी वाघ असणारे नगरसेवक आणि कारभारी आपापल्या बिळांत लपून बसले होते. नंतर परिस्थिती उघडली तेव्हा काही माननीयांनी आपापल्या क्षेत्रांत काम केले, नाही असे नाही; परंतु त्यातही स्वार्थाचा, प्रसिद्धीचा आणि राजकारणाचा सोस सुटला नव्हता. खरे तर अशी भयंकर आपत्ती जेव्हा येते तेव्हा तिचा मुकाबला करण्यासाठी सर्वसामान्य जनतेचा उत्स्फूर्त आणि हार्दिक सहभाग आवश्यक असतो, परंतु असा सहभाग मिळवण्याच्या यंत्रणाच आपल्याजवळ नाहीत. आपल्या लोकशाहीचे हेही एक विदारक चित्र आहे. प्रशासन केवळ लोकप्रतिनिधींमार्फतच लोकांशी संबंध ठेवू शकते आणि हे प्रतिनिधी जेव्हा कार्यक्षम नसतात, तेव्हा नोकरशाहीच्या हातात नियंत्रण जाते! ह्यात जनता कुठे आहे? मुळातला कारभारच वसाहतवादी असल्याने जनतेच्या हातात काहीच सूत्रे नसतात. जनतेमधले काही घटक बेशिस्तपणे वागतात, ही गोष्ट खरी आहे. पण त्यामागचे कारणही बरेचसे अज्ञान, थोडीशी बेफिकिरी, काही प्रमाणात निराशा आणि काही प्रमाणात बंडखोरी हे असते. जनतेला संघटित करणाऱ्या आणि त्यांच्या हातात कारभार देणाऱ्या मोहल्ला सभा, वॉर्ड कमिट्या, नागरिक सभा अशा यंत्रणा आपण निर्माणच केलेल्या नाहीत– भारतीय राज्यघटनेचे तसे स्वप्न असले तरीही! त्यामुळे प्रशासनाला जनतेचा सहभागच मिळवता येत नाही. आमची मुळात पांगळी असलेली लोकशाही कोविड काळात अधिकच दुबळी झाली. काही अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी निष्ठेने व प्रामाणिकपणे काम केले परंतु अशा आपत्तींचा मुकाबला हा लोकांच्या निश्चयाने आणि सहभागानेच होत असतो. लोकांच्या हातात त्यांच्या जीवनाची सूत्रे नसल्यानेच ते एका बाजूला हताश आणि दुसरीकडे बेफिकीर होत असतात. भारतीय लोक प्रारब्धवादी आहेत हे खरे, पण तसे ते का झालेत हे समजून घेण्याची गरज आहे. तुमच्या भोवतालची व्यवस्था जर न्यायपूर्ण, विवेकनिष्ठ आणि विज्ञानाधारित नसेल, तर मग सर्वसामान्य लोक प्रारब्धावर किंवा नशिबावर अवलंबून राहू लागतात.

मात्र कोरोनाचा प्रसार हा केवळ लोकांच्या बेशिस्तीमुळेच झाला असे नाही (तसे असते तर केंद्रीय गृहमंत्री किंवा महाराष्ट्राच्या अनेक मंत्र्यांना कोरोना झाला नसता). आपली शहरे ज्या तऱ्हेने वसलेली आहेत आणि ज्या दाटीवाटीने व कुचंबलेल्या अवस्थेत लोकांना राहावे लागते, ती परिस्थितीही त्याला कारणीभूत आहे. कोरोनाचा मुख्य धडा 'शहरांचे नियोजन सुधारले पाहिजे' हा आहे. गरीब वस्त्यांमध्ये सार्वजनिक शौचालये ही कोरोना प्रसाराची केंद्रे ठरली. ज्या वस्त्यांमध्ये त्यांचे निर्जंतुकीकरण केले गेले, तिथे परिस्थिती सुधारली. पुण्यातील येरवडा परिसराचा 'केस स्टडी' केला असता असे लक्षात आले की– पहिल्यांदा लोकजागृती करणे, लोकांच्या मनातली भीती घालवणे, त्वरित चाचण्या व उपचार करणे, गरजू व निराधार लोकांना आवश्यक ती मदत पोहोचवणे आणि लोकांचेच छोटे–छोटे गट करून त्यांना आपापल्या गल्ली वा मोहल्ल्याची व्यवस्था पाहायला सांगणे– ह्या पद्धतींनी कोविड आटोक्यात आणता आला. मुंबईतील धारावीचा धडाही असाच आहे. लोकांच्या मनातील भीती व दहशत घालवायची आणि त्यांना सक्षम करायचे, हाच या संदर्भातला मूलभूत उपाय आहे. ज्या–ज्या ठिकाणी असे केले गेले तिथे प्रशासनाला चांगले यश आले.

ह्या बिकट काळात शहरांचे आरोग्य जर कोणी राखले असेल तर महानगरपालिकांचे स्वच्छता कर्मचारी आणि कचरावेचक यांनी. सभोवतालची परिस्थिती अत्यंत धोकादायक असूनही ह्या मंडळींनी आपले कार्य निरलसपणे

बजावले. त्यामुळेच बाकी शहर ठप्प झालेले असूनही कचरा व मलनि:सारणाची कामे सुरळीत होत राहिली आणि ह्या बाबतीत आणीबाणीची परिस्थिती आली नाही. पुण्यासारख्या शहरात 'स्वच्छ' ह्या कचरा-वेचकांच्या सहकारी संघटनेने जे काम ह्या परिस्थितीत केले, त्याला तोड नाही. आपला जीव धोक्यात घालून त्यांनी शहराचे आरोग्य राखले. त्यांच्या कामाची कदर आपण समाज म्हणून कशी करणार, हाच खरा प्रश्न आहे. पुण्यामध्ये आता त्यांनाच बेदखल करून खासगी कंत्राटदारांकडे हे काम सोपवण्याचे ठरते आहे. हे म्हणजे 'गरज सरो आणि वैद्य मरो' असेच झाले!

कचरावेचकांसारख्या वंचित घटकांनी आपली जबाबदारी निभावली, पण ह्या काळात आमच्या समाजवस्त्राची वीण अनेक ठिकाणी उसवली. ह्या संदर्भातली एक मोठी वैचारिक चूक म्हणजे 'सोशल डिस्टन्सिंग' नावाची एक अत्यंत चुकीची संज्ञा प्रसारित करण्यात आली. जे आवश्यक होते ते म्हणजे भौतिक अंतर किंवा दूरी. ह्याचा मराठी अनुवाद करण्याच्या नादात काही जणांनी 'सोवळ्या-ओवळ्या'चे पुनरुज्जीवन करण्याचा कंडू शमवून घेतला. महाराष्ट्रातील एक मोठे वृत्तपत्र 'साथसोवळे' ह्या शब्दाचा हिरिरीने पुरस्कार करत होते. सोवळे-ओवळे, पवित्र-अपवित्र, शुद्ध-अशुद्ध या संकल्पनांतूनच आपल्याकडे अस्पृश्यता निर्माण झाली, ही गोष्ट या मंडळींनी लक्षातच घेतली नाही.

सुरुवातीला म्हटले त्याप्रमाणे ह्या सगळ्या चिंताजनक परिस्थितीला चंदेरी किनार होती. ती म्हणजे, स्वयंसेवी संस्थांनी केलेल्या कामाची. अनेक स्वयंसेवी संस्था, कार्यकर्त्यांचे गट एवढेच नाही तर सीएसआर फाउंडेशन्सनी लोकांना- विशेषत: स्थलांतरित मजुरांना- मोलाचे साहाय्य केले. ह्या कामाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यात तरुणांचा वाटा फार मोठा होता. एरवी भारतातील सध्याची तरुणाई ही चंगळवादी, बेफिकीर, उथळ आणि मीडियाप्रेमी असल्याची टीका होत असते; परंतु अशा आपत्तीच्या प्रसंगी ही तरुणाई उस्फूर्त आणि निरलसपणाने कशी मदत करते याचेही दर्शन ह्या काळात घडले. याची अनेक उदाहरणे सगळ्यांना माहीत असतील. वानगीदाखल पुणे शहरातील 'साद' ह्या गटाचे उदाहरण सांगता येईल. कोरोनाकाळात निराधार, स्थलांतरित मजुरांची होणारी ससेहोलपट पाहून 'साद' गटाचे सदस्य त्यांच्या मदतीला धावून गेले आणि त्यांना जेवण व शिधा पुरवण्यापासून ते त्यांना त्यांच्या गावी बस वा रेल्वेच्या माध्यमातून पोचवण्याचे काम अविश्रांतपणे करत राहिले. त्यांना कोणताही प्रकल्प मिळालेला नव्हता, कोणी निधीही दिला नव्हता वा प्रशासनाने मान्यता दिलेली नव्हती. केवळ स्वयंस्फूर्तीने आणि निरपेक्षपणाने त्यांनी हे काम केले. ह्या संदर्भात डॉ.चिन्मय दामले, सायली तामणे, सुहास ढोले आणि त्यांचे सहकारी यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. सायलीने आपल्या अनुभवांचे शब्दांकन प्रसिद्ध केलेले आहे. चिन्मय दामले हा भारतातील एक अग्रगण्य नॅनोफिजिसिस्ट; पण त्याने स्वत:ला ह्या कामात पूर्णपणे झोकून दिले आणि प्रशासनाची बेपर्वाई, लाभार्थ्यांची मानसिकता, टाळेबंदीमुळे लादल्या गेलेल्या अडचणी, रेल्वे पोलिसांची हडेलहप्पी- असल्या कशाची पर्वा न करता अथकपणे व निरलसपणे हे सेवाकार्य केले. असेच उल्लेखनीय काम म्हणजे पुणे कॅम्प परिसरातील गुरुद्वारा समितीचे. शिखांच्या गुरुद्वारामध्ये कायम लंगर चालतो आणि कोणीही भुकेलेला माणूस विन्मुख जात नाही, हे सगळ्यांना माहीत आहे. कोरोनाकाळात कॅम्प गुरुद्वाराने अखंडपणे लंगर चालवून 'तयार जेवण' पुरवले. ऐन आणीबाणीच्या काळात ह्या गुरुद्वारातून दर दिवशी १८,००० व्यक्तींचे भोजन तयार होत होते आणि अनेक संस्था इथून अन्न घेऊन गरजूंना पुरवत होत्या. असा स्वयंपाक करण्याचा व्याप केवढा असू शकतो आणि त्यासाठी केवढे संघटन लागते, याची कोणीही कल्पना करू शकते. (मात्र आपली सार्वजनिक वितरण म्हणजे 'रेशनिंग' व्यवस्था कार्यक्षम असती, तर लोकांवर ही वेळ आली नसती. कोणाही माणसाला दुसऱ्याकडून अन्नाची मदत घेणे आवडत नाही. तशी वेळ आपण कोणावरही येऊ देता कामा नये).

स्वयंसेवी संस्थांना मुख्य अडचण भासली ती टाळेबंदीची. पोलीस विभागाने काही प्रमाणात सहकार्य केले; परंतु कोणतेही सेवाकार्य करायचे तर जी मुभा आणि मोकळीक लागते, ती संस्थांना उपलब्ध नव्हती. मुख्य म्हणजे आपण स्वयंसेवी संस्थांना ह्या कामात सामावून घेतले पाहिजे, असे सरकारचे वा प्रशासनाचे धोरण नव्हते. स्थानिक अधिकाऱ्यांनी आपापल्या पातळीवर जे काही सहकार्य केले असेल तेवढेच. अशा आपत्तीप्रसंगी स्थानिक प्रशासनाने ताबडतोब एक 'समन्वय केंद्र' उघडून तिथे एका

कार्यक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करून, स्वयंसेवी मदतीचे सुसूत्रीकरण करायचे असते. ही प्रक्रिया योग्य रीतीने घडली नाही, त्यामुळे लोकांच्या हाल-अपेष्टा वाढल्या. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी काही प्रमाणात हे केले म्हणून त्यांना चांगल्या रीतीने मदत गोळा करता आली. स्वयंसेवी संस्थांशिवाय आपण मदतकार्य करू शकत नाही, हे सरकारला उमगत नाही; ही यातली खरी समस्या आहे. सामाजिक संस्था- विशेषत: परदेशी मदत घेणाऱ्या संस्था, ह्या जणू काही आपल्या शत्रू आहेत, असेच शासनाचे धोरण असते.

सारांशाने असे म्हणता येईल की, कोविड-१९ महासाथीने आपले सगळे जीवन विस्कटून टाकले आणि एक संघटित, पगारदार वर्ग सोडला तर बाकीचे सगळे समाजघटक ह्या आपत्तीमुळे पोळून निघाले. हे विस्कळीत जीवन आपण परत कसे सांधणार, एवढेच नाही तर- ह्या आपत्तीपासून शिकून अधिक चांगल्या जीवनाकडे वाटचाल कशी करणार, हा आपल्यासमोरचा प्रश्न आहे. पुढचा विचार हा त्या दिशेने केला पाहिजे, म्हणजे ही आपत्तीही मानवजातीने कारणी लावली, असे म्हणता येईल.

### ३. कोरोनाची शिकवण

#### ३.१ सामाजिक संस्थांसाठी

कोणत्याही आपत्तीसंदर्भात मुख्य समस्या ही असते की, अशी आपत्ती ही तुम्हाला बेसावधपणे गाठते. अशा वेळी संसाधने कशी जुळवायची, साह्य कोणाला मागायचे, मदतकार्य कसे संघटित करायचे आणि मुख्य म्हणजे योग्य लाभार्थी कसे शोधायचे असे- प्रश्न संस्थांसमोर असतात. म्हणून त्यातले धडे असे :

१. आपत्तीकाळात लोकांना मदत करायची असे ज्या संस्थांचे ध्येय असेल, त्यांनी कायमच 'तयार' राहायला पाहिजे. ह्या तयारीमध्ये काय काय आवश्यक आहे?

संस्थेचे विश्वस्त/पदाधिकारी यांची अशा मदतकार्याला कायमची व सुस्पष्ट मान्यता. प्रत्येक वेळी विश्वस्त मंडळाची परवानगी घेण्याची आवश्यकता पडता कामा नये.

सर्व कार्यकर्ते आणि कर्मचाऱ्यांना स्पष्ट सूचना की, असे मदतकार्य त्वरित करावे लागेल आणि त्यासाठी कायम तयारीत असले पाहिजे.

कार्यकर्ते व कर्मचाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे मूलभूत प्रशिक्षण- कोणत्या मुद्यांवर?

- आपत्तीचे स्वरूप समजून घेणे.
- खरे गरजू आणि पात्र लाभार्थी शोधणे.
- स्त्री-पुरुषांच्या विशेष गरजा ओळखणे (जेण्डर नीड्स).
- प्रत्यक्ष मदत पोहोचवण्याची व्यवस्था करणे.
- असे मदतकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांजवळ पायाभूत जीवनकौशल्ये आहेत की नाहीत याची खात्री करणे- ज्यामध्ये वाहन चालवता येणे, पोहायला येणे, झाडावर चढता येणे, लांब अंतर चालणे आणि अथकपणे काम करण्याची क्षमता असणे इत्यादींचा समावेश होतो. ह्या सोबतच मदत-प्रस्ताव बनवणे, हिशेब ठेवणे, अहवाल लिहिणे, संपर्क साधणे ही कौशल्येही महत्त्वाची आहेत.

अशा काळात उपयोगी पडतील असे घाऊक दुकानदार, ठोक विक्रेते, पुरवठादार यांची माहिती कायम तयार असायला हवी. त्याचप्रमाणे संबंधित सरकारी विभाग, सक्षम अधिकारी, पोलीस, अग्निशमन यंत्रणा, डॉक्टर्स आणि हॉस्पिटल्स यांचे संपर्कही अद्ययावत हवेत.

कार्यालयामध्ये प्रथमोपचार पेट्या, आवश्यक ती औषधे, सॅनिटरी नॅपकिन्स, शुद्ध पाणी इत्यादींचा पुरेसा साठा केलेला असावा. ह्या गोष्टींची गरज कार्यकर्त्यांनाही लागते.

सर्व कार्यकर्त्यांचा आरोग्यविमा व अपघात विमा उतरलेला असावा आणि हेल्मेटसारखी सुरक्षासाधने कायम वापरली जावीत.

**२. प्रत्यक्ष मदतकार्याच्या वेळी-**

आदेश आणि संपर्काची व्यवस्था त्वरित बसवणे आणि एकमेकांमध्ये सुसूत्रीकरण राहील याची दक्षता घेणे.

आपत्तीग्रस्तांच्या खऱ्या गरजा काय आहेत, याचा शोध घेऊन त्यानुसार मदतीचे संयोजन आणि जबाबदाऱ्यांचे वाटप करणे, रोजच्या रोज परिस्थितीचा आढावा घेणे व त्यानुसार पावले उचलणे.

देणगीदार संस्थांशी संपर्क साधून परिस्थितीचे वार्तांकन तयार करणे आणि मदतीचे प्रस्ताव तयार करणे. तसेच हिशेबाची आणि लाभार्थींच्या निवडीची व्यवस्था बसवणे.

३. आपत्तीच्या काळात स्वयंसेवी संस्थांनी करण्याची मुख्य गोष्ट म्हणजे इतर संस्थांशी संवाद आणि संपर्क ठेवणे (नेटवर्कींग). सगळे मदतकार्य आपणच केले पाहिजे किंवा करू शकतो असा अहंकार न बाळगता, इतर मित्रसंस्थांशी सतत संपर्क ठेवून जबाबदाऱ्यांचे वाटप करणे योग्य राहते. जे

क्षेत्र आपले नाही अशा क्षेत्रांत त्या-त्या ठिकाणच्या संस्थांशी सहकार्य करावे. असाच संवाद प्रशासनाशीही ठेवावा लागतो. आपत्तीग्रस्तांना अचूक मदत कशी मिळेल, ही मुख्य आस्था असावी.

**३.२ लोकांच्या समुदायासाठी**

सर्वसामान्य लोक हे आपत्तीग्रस्त असतात, भावी लाभार्थी असतात आणि कार्यकारी घटकही असतात. मदतकार्यात त्यांचा सहभाग कसा मिळवायचा आणि त्यांच्यावर लाचारीची वेळ येऊ न देता सन्मानाने मदत कशी करायची, हा कळीचा मुद्दा असतो. त्यासाठी-

१. स्वयंसेवी संस्थांचा लोकांशी घनिष्ठ संपर्क असायला हवा. ह्याची दोन परिमाणे आहेत. एक तर जिथे आपला असा संपर्क आहे, तिथे प्राधान्याने मदतकार्य करायला घ्यावे आणि तसे नसेल तर घनिष्ठ संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करावा. हा संपर्क आणि संबंध जितका चांगला तितके मदतकार्य परिणामकारक होते, असा जगभरातला अनुभव आहे.

२. ह्यातली पुढची पायरी अशी की- हा संबंध त्या लोकांमधले जे खरे आपत्तीग्रस्त, वंचित किंवा गरजू आहेत त्यांच्याशी प्राधान्याने असावा. ही गोष्ट फक्त संस्थांनाच जमू शकते- सरकारला वा पुढाऱ्यांना नाही (ते हितसंबंधित लोकांना मदत करतात). ह्यामध्ये विशेषकरून एकट्या-निराधार स्त्रिया, दिव्यांग व्यक्ती, स्त्री-कुटुंबप्रमुख असलेली गरीब कुटुंबे आणि आजारी व्यक्ती यांच्याकडे विशेष लक्ष द्यावे लागते.

३. लोकांना निव्वळ लाभार्थी वा याचक न समजता, त्यांचे छोटे-छोटे गट वा समित्या करून त्यांना मदतकार्यात सहभागी करून घ्यावे आणि त्यांच्यावर मदतकार्याची काही जबाबदारी सोपवावी. कोणत्याही समुदायात उत्साही व निरलस व्यक्ती असतात; शिवाय हल्ली बहुतेक ठिकाणी स्त्रियांचे बचतगट हमखास असतात. हे बचतगट म्हणजे एक प्रकारचे 'तयार संघटन' (रेडिमेड असोसिएशन) असते. अशांना ओळखून ह्या कामात सहभागी करून घ्यावे.

४. व्यवस्थित व समन्यायी मदतकार्यासाठी खालील प्रक्रिया उपयुक्त ठरतात.

- गाव, समुदाय किंवा वस्ती मोठी असेल, तेव्हा तिचे छोटे-छोटे घटक पाडावेत आणि प्रत्येक ठिकाणी लोकांची



समिती गठित करावी.

– अशा प्रत्येक समितीची जबाबदारी ही स्थानिक स्वयंसेवकाकडे सोपवावी आणि ह्या दोहोंमार्फत स्थानिक मदतकार्य वा आपत्ती व्यवस्थापन पार पाडावे.

– लोकजागृती ही अशा मदतकार्यातील पहिली व अनिवार्य पातळी समजावी. साथरोगांमध्ये तर हे अतिशय महत्त्वाचे आहे.

– आपत्तीग्रस्तांच्या गरजा कोणत्या आहेत, हे स्थानिक समिती व स्वयंसेवकांशी सल्लामसलतीने ठरवावे आणि त्या मदतीचे संयोजन करावे. केवळ वाटायची आहे म्हणून मदत वाटू नये.

– सर्व मदतकार्यात पारदर्शकता असणे आवश्यक असते. त्यासाठी हिशेबाची काटेकोर व्यवस्था तर करावीच; शिवाय ज्यांना मदत दिली, त्यांचे अचूक संपर्कपत्तेही घेऊन ठेवावेत.

### ३.३ देणगीदार आणि साह्यकारी संस्था (डोनर एजन्सीज) यांच्यासाठी

आपत्तीच्या प्रसंगी देणगीदार संस्थांकडे केवळ त्यांच्या संबंधातल्या संस्थांचेच अर्ज येतात असे नाही, तर इतरही अनेक इच्छुक मदत मागत असतात. अशा वेळी कोणाला मदत द्यायची आणि कोणाला नाही, हे ठरवणे कठीण जाते. केवळ सक्षम आणि विश्वासू संस्था शोधणे पुरेसे नसते, तर त्यांना मदतकार्याचा अनुभव आहे की नाही, हेही तपासावे लागते. पात्र आणि गरजू लाभार्थी निवडणे हीसुद्धा जबाबदारी असते. मुख्य म्हणजे हे निर्णय त्वरित घ्यावे लागतात. शिवाय देखरेख व मूल्यांकनाची व्यवस्थाही अमलात आणावी लागते. आणि हे सर्व मानवतावादी भूमिकेतूनच करावे लागते. त्यामुळे–

१. आपल्या देशाची आणि एकूणच जागतिक परिस्थिती पाहता, देणगीदार संस्थांनी इथून पुढे ‘आपत्कालीन मदत’ याचा समावेश आपल्या उद्दिष्टांमध्ये करून त्यासाठी योग्य त्या निधीची तरतूद करायला हवी. अशा तऱ्हेच्या आपत्ती ह्या आता आपल्या जगण्याचा भाग होणार आहेत. त्यातही महासाथी आणि आरोग्याची आणीबाणी ह्यांचा समावेश प्राधान्याने करायला हवा. महासाथी ह्या स्थानिक न राहता संबंध समाजाला ग्रासून टाकणाऱ्या असू शकतील, ही शक्यताही संभवते. त्यामुळे आम्ही एका विशिष्ट भागातच मदत देऊ, असे म्हणणे योग्य होणार नाही. विशेषत: सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) फाउंडेशन्सनी हे लक्षात ठेवायला पाहिजे.

२. शक्य असेल तिथे देणगीदार संस्थांनी आपत्कालीन परिस्थितीची पाहणी व मूल्यांकन या कामात सहभागी व्हावे म्हणजे त्यांचे स्वत:चे आकलन सुधारेल आणि अचूक निर्णय घेता येतील. मात्र लाभार्थी सदस्य आणि समुदायांची निवड करताना योग्य ती लवचिकता ठेवावी. त्याबाबत पूर्वग्रह ठेवू नयेत (म्हणजे आम्ही अमुक एक तऱ्हेच्या लोकांनाच मदत देऊ, अशा प्रकारचे). या संदर्भात मानवतावादी दृष्टिकोन ठेवतानाच मानवी अधिकारांचेही भान ठेवावे.

३. देणगीदार संस्थांनी देखरेख जरूर ठेवावी; मात्र व्यवस्थापनात थेट हस्तक्षेप– म्हणजे मायक्रो–मॅनेजमेंट– करणे टाळावे. एकदा संस्था पारखून घेतली की तिला आणि तिच्या कार्यकर्त्यांना तो प्रकल्प राबवण्याचे पूर्ण स्वातंत्र्य द्यावे, कारण प्रत्यक्ष परिस्थिती त्यांना चांगली माहीत असते.

४. देणगीदार संस्थांनी आपापसात ‘गोलमेज’ बैठका भरवून एकमेकांच्या कार्याची माहिती घ्यावी. अशा तऱ्हेने नियमित भेटण्याचा परिपाठ ठेवल्यास मदतीची पुनरावृत्ती तर टाळता येतेच, शिवाय प्रशासनाशी काही संयुक्त मुद्यांवर बोलायचे असल्यास सोईचे जाते.

### ३.४ स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी

राष्ट्रीय आपत्तींच्या काळात केंद्र व राज्य सरकारे ही आपत्ती व्यवस्थापनाचे निर्देश देत असली तरी प्रत्यक्षात जे काम करावे लागते ते ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका वा महानगरपालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांना. ह्या बाबतीतली सर्वांत मोठी समस्या म्हणजे वरून येणारे हे निर्देश सुस्पष्ट नसतात आणि सारखे बदलत राहतात. त्यामुळे नक्की काय करावे, या बाबतीत स्थानिक संस्थांचा गोंधळ होतो. दुसरी समस्या म्हणजे ह्या संस्थांचे प्रशासकीय अधिकार तर मर्यादित असतातच, शिवाय त्यांच्याकडे निधी वा गंगाजळी तुटपुंजी असते. त्यांना राज्य व केंद्र सरकारांवर अवलंबून राहावे लागल्याने मुळातच परावलंबित्व असते आणि आपत्तीकाळात ते जास्तच वाढते. खरे तर स्थानिक संस्था ह्या विकेंद्रित कारभाराच्या पायाभूत संस्था असल्याने त्या मजबूत असायला हव्यात, पण आपली लोकशाही ही केंद्रीकरणाकडे झुकलेली

असल्याने राज्य व केंद्र सरकारे त्यांना सक्षम होऊ देत नाहीत. अशा परिस्थितीत आपल्या कक्षेमध्ये राहणारे लोक (जनता) हाच त्यांनी आपला मुख्य आधार मानायला हवा आणि त्या जनतेशी घनिष्ठ संबंध ठेवून आपले उद्दिष्ट साध्य करायला हवे.

१. आपल्या कार्यक्षेत्रांत कोणत्या आपत्ती येऊ शकतात (उदा. पूर, साथीचे रोग, दंगली, आग, भूस्खलन, इमारती कोसळणे, इत्यादी) त्यांचा स्थानिक प्रशासनाने सतत अदमास घेऊन आपली कार्यसिद्धता ठेवली पाहिजे.

२. आपल्या कार्यक्षेत्रांत राहणारे जे तज्ज्ञ नागरिक, संस्था, कॉलेजेस, विद्यापीठे- एवढेच नाही, तर खासगी कंपन्या असतील त्यांच्याशी सल्लामसलत करून कृती-आराखडे तयार करायला हवेत. ते जनतेसमोर मांडून त्यात जनतेचा सहभाग घेतला पाहिजे आणि नंतर आपत्तीकाळात ते प्रत्यक्षात कसे आणायचे याचा कृती-कार्यक्रम ठरवला पाहिजे.

३. हे आराखडे प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपले अधिकारी व कर्मचारी तसेच सदस्य/नगरसेवक यांच्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम सातत्याने आयोजित केले पाहिजेत. ही सक्षमता जर स्थानिक शासनामध्ये आली नाही, तर नुसते आराखडे तयार करून काही उपयोग नाही; ते निव्वळ कपाटात पडून राहतात.

४. आपत्कालीन परिस्थितीमध्ये स्वयंसेवी संस्थांचे साह्य घेण्यावाचून तरणोपाय नसतो, हे लक्षात घेऊन आपल्या कार्यक्षेत्रातील संस्थांशी कायमस्वरूपी आंतरसंबंध (इंटरफेस) तयार करावा. हे करण्यासाठी एक कायमस्वरूपी 'संपर्क केंद्र' निर्माण करावे. असे केंद्र हे जिल्हा परिषद पातळीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, तर महानगरपालिका पातळीवर आयुक्तांच्या थेट अमलाखाली असावे.

५. ज्या मोठ्या महानगरपालिका आहेत तिथे हे कार्य विकेंद्रित स्वरूपात 'वॉर्ड ऑफिस' पातळीवर करावे. प्रत्येक वॉर्ड ऑफिसने आपल्या कार्यक्षेत्रात निरनिराळ्या प्रकारचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था कोणत्या आहेत, याची माहिती ठेवावी आणि त्यांच्याशी सतत संपर्क ठेवण्यासाठी एका सक्षम अधिकाऱ्याची नेमणूक करावी. केवळ आपत्कालातच नाही, तर एरवीही असा संपर्क उभयपक्षी आणि अंतिमत: जनतेसाठी फायद्याचा ठरेल.

६. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, शहरी भागात ७४ व्या घटनादुरुस्तीच्या आशयाप्रमाणे निरनिराळ्या वस्त्यांमध्ये 'नागरिक सभा' निर्माण कराव्यात (वॉर्ड कमिट्या नव्हेत). ह्या सभांना स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत वैधता द्यावी आणि त्या-त्या भागातील नगरसेवक हे अशा सभांना उत्तरदायी करावेत. केवळ आपत्कालीन कार्यक्रमच नव्हेत, तर एरवीचा कारभारही अशा रीतीने विकेंद्रित करावा. नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद आणि सहभाग मिळाला, तरच इथून पुढे मोठ्या शहरांचे व्यवस्थापन सुयोग्य रीतीने करता येईल.

**३.५ राज्य व केंद्र शासनासाठी**

भारतासारख्या खंडप्राय आणि संघराज्यीय व्यवस्थेमध्ये केंद्र व राज्य शासनाचे संबंध हे नेहमीच गुंतागुंतीचे आणि विवादास्पद राहिलेले आहेत. अगदी एकाच पक्षाची सरकारे असतील तरीही ते तसे असतात आणि विरोधी पक्षांची असताना तर नक्कीच असतात. अशा परिस्थितीत राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार दोन्ही प्रकारच्या सरकारांनी आपला कारभार चालवणे आवश्यक असते. केंद्र व राज्य सरकारांमध्ये सुसूत्रता नसली तर पुढाऱ्यांचे काही जात नाही, पण जनतेचे मात्र हाल होतात. म्हणून आपली जी घटनासिद्ध जबाबदारी आहे, ती ओळखून तिच्या मर्यादेमध्येच केंद्र व राज्य सरकारांनी उपाययोजना केल्या पाहिजेत.

१. घटनात्मक दृष्ट्या केंद्र सरकारला अनेक अधिकार असले तरी ते अनिर्बंधपणे न वापरता केंद्राने ते राज्यांशी सल्लामसलत करूनच वापरले पाहिजेत. याचे कारण प्रत्यक्ष कारभाराची जबाबदारी ही राज्य सरकारकडे असते. आरोग्याच्या संदर्भात जी मुख्य जबाबदारी आहे की- सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या किमान तीन टक्के निधी आरोग्यसेवांसाठी दिला पाहिजे, ती केंद्राने आधी प्राधान्याने पार पाडावी (सध्या हे प्रमाण फक्त १.२८ टक्के आहे).

२. इथून पुढची आव्हाने लक्षात घेता, भारतात विषाणूशास्त्र आणि साथरोगशास्त्र यांच्या संदर्भात जेवढे संशोधन करू तेवढे कमीच पडेल. पाश्चिमात्य जगाची नक्कल करण्याच्या नादात संसर्गजन्य रोगांवरचे संशोधन दुर्लक्षित झाले होते. त्यामुळे त्यासाठीच्या अद्ययावत प्रयोगशाळा व संशोधनकेंद्रे ही केंद्र सरकारने सर्व राज्यांमध्ये उभारली पाहिजेत. करदात्यांचा अमूल्य पैसा हा पुतळे, स्मारके व अशाच दिखाऊ स्थापत्यावर न उधळता अशा

पायाभूत सुविधांवरच खर्च करायला हवा

३. कोणत्याही आपत्तीत गरीब, वंचित व कष्टकरी वर्गच भरडून निघतो, हे लक्षात घेऊन केंद्र व राज्य सरकारांनी असंघटित क्षेत्रांतील सर्व श्रमिकांसाठी कल्याणकारी मंडळे उभारून व तत्संबंधित कायदे करून प्रत्येक श्रमिकाला सामाजिक सुरक्षा आणि कल्याणाचे फायदे मिळतील याची दक्षता घ्यायला हवी. ह्यासोबतच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील त्रुटी नाहीशा करून श्रमिक कुटुंब कुठेही राहत असले तरी त्याला स्वस्त धान्याची सुविधा मिळेल याची खबरदारी घेतली गेली पाहिजे. 'आधार' प्रणालीमुळे हे करणे आता अजिबात अवघड नाही.

४. केंद्र व राज्य सरकारांनी स्वयंसेवी संस्थांचे महत्त्व व आवश्यकता ओळखून, ह्या क्षेत्राची वाढ उत्तरोत्तर कशी होईल असेच धोरण आखायला पाहिजे. सध्या जे कायदे त्यांना जाचक ठरतात, त्यांमध्ये तत्काळ सुधारणा करून ते सुलभ व साह्यकारी होतील असे पाहायला पाहिजे. ह्या संस्थांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही राज्यसंस्थेने स्वत:कडे न घेता संस्थांच्याच नियामक मंडळांकडे सोपवायला हवी.

५. राज्य सरकारांनी शहरी स्वशासनाच्या (नगरपालिका व महानगरपालिका) कायद्यात त्वरित सुधारणा करून नागरिक सभांच्या निर्मितीचे अधिनियम पारित करायला हवेत. त्या-त्या भागाचे स्थानिक स्वशासन हे मोहल्ला सभा वा वस्ती सभा यांच्याकडे सोपवले पाहिजे. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारात वाढ करून विकेंद्रित लोकशाहीचे उद्दिष्ट साध्य करायला हवे.

६. नागरी नियोजनाकडे ताबडतोबीने लक्ष देऊन, 'स्मार्ट' शहरांऐवजी सर्वसमावेशक-पर्यावरणपूरक आणि मूलभूत सोईसुविधांनी युक्त अशी शहरे उभारणे श्रेयस्कर आहे. भविष्यातील मानवी वस्ती जर सगळी शहरात राहणार असेल तर ही शहरे सौख्यपूर्ण कशी होतील, याचा विचार आतापासूनच सुरू करायला हवा. सध्याचे महानगरांचे जे रूप आहे- अस्ताव्यस्त, बकाल आणि हिंसक- ते स्वत:हून आपत्तींना निमंत्रण देणारे आहे.

**३.६ एकंदर समाजासाठी**

साथीचे रोग किंवा इतर आपत्ती नेहमीच येत असल्या तरी त्या-त्या काळात समाजाचे स्वरूप व रचना कशी आहे, यावर त्या समाजाचा प्रतिसाद अवलंबून असतो. समाज जर चिरफळ्या उडालेला, असभ्य आणि बेदरकार असेल तर आपत्तीची तीव्रता आणखी वाढते. प्रत्येक आपत्तीवेळी समाजाने अंतर्मुख होऊन आपले परीक्षण केले पाहिजे आणि त्यानुसार बदल घडवले पाहिजेत.

१. ही गोष्ट सगळ्यांनी लक्षात घेतली पाहिजे की- समाज जर स्वयंशिस्तीने वागला नाही, तर त्यावरचे नियंत्रण हे राज्यसंस्थेकडे किंवा अगदी टोकाच्या काळात लष्कराकडे जाते. लोकांनी स्वत:ला जर सभ्यतेने आणि स्वयंशिस्तीने बांधून घेतले, तर मग बाहेरच्या दमनकारी यंत्रणेची गरज भासत नाही. आपल्यावरचे राज्याचे नियंत्रण किती वाढवायचे याचा निर्णय जनतेनेच करायचा असतो.

२. आपत्तीच्या काळात आपल्याच बांधवांबरोबर आपण कसे वागणार ह्याचा निर्णयही समाजाने आपला आपण करायचा असतो. याचे मार्गदर्शन काही पुढारी वा सरकारकडून घ्यायचे नसते. आपला सामाजिक व्यवहार हा मुळातच समताधिष्ठित, न्यायपूर्ण आणि माणुसकी जपणारा असेल तर मग आपत्तींना तोंड देण्याची क्षमता त्यामध्ये तयार होते. तसे नसेल तर आपत्तीकाळात विषमतेची वाढ होऊन समाजस्थैर्याची आणखी हानी होते.

३. आपत्तीकाळात माणसांनी एकमेकांना साह्य करणे हाच आपत्ती निवारणाचा आणि व्यवस्थापनाचा उपाय असतो. त्यामुळे ते करण्याच्या यंत्रणा आपण नित्यश: विकसित करायला हव्यात. त्यासाठीचा सर्वोत्तम उपाय म्हणजे समाजाचे 'मंडळीकरण' होणे. जेवढ्या वेगवेगळ्या तऱ्हेच्या 'असोसिएशन्स' आपण तयार करू, तितके हे कार्य सुकर होते. अशा असोसिएशन्स ह्या माणसांच्या भावनिक, सामाजिक, आर्थिक व आरोग्याच्या गरजांची पूर्ती तर करू शकतातच; शिवाय वेळप्रसंगी राज्यसंस्थेकडून होणारे दमनही रोखू शकतात. नागरिक म्हणून आपण वाळूच्या कणांसारखे नसून मातीच्या घट्ट ढेकळांसारखे आहोत, हे प्रत्येकाला जाणवले पाहिजे.

४. प्रत्येक नागरिकाने अशा कोणत्या ना कोणत्या मानवतावादी 'मंडळीं'शी वा संस्था-संघटनेशी जोडून घेणे आवश्यक आहे. अशा संस्था-संघटनांना आर्थिक मदत तर करावीच, शिवाय त्यांच्या कार्यातही सहभाग द्यावा. ह्यातून व्यक्तिगत समाधान तर मिळतेच, शिवाय समाजाचे लोकशाहीकरण होऊन सामाजिक घडणही मजबूत होते.

**मिलिंद बोकील**, पुणे

अभिवादन

## सहदेव चौगुले-शिंदे

# यशवंतराव आणि हॅम्लेट

हॅम्लेटचे मन दुभंगलेले आहे. व्यक्तिगत जीवनात तो निराश आहे, तर डेन्मार्कमधील राजकीय व सामाजिक परिस्थितीबद्दल तो नाराज आहे. या जगात डेन्मार्क आहे; पण डेन्मार्कमध्येच तो जग पाहू लागतो, एकूण जीवनाची समीक्षा करू लागतो. डेन्मार्कच्या भ्रष्ट व बुरसटलेल्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात हॅम्लेटला गुदमरल्यासारखे वाटते. म्हणून 'डेन्मार्क इज अ प्रिझन' असे तो म्हणतो. बदललेल्या तत्कालीन भ्रष्ट भारतीय राजकारणात आणि आपल्या ऐतिहासिक ध्येयधोरणापासून दूर जात असलेल्या तेव्हाच्या काँग्रेस पक्षात यशवंतरावांना घुसमटल्यासारखे वाटते. त्यांची द्विधा मन:स्थिती आणि मानसिक संघर्ष अशा पद्धतीने व्यक्त झाला आहे. 'आम्ही साऱ्यांनी वैयक्तिक विचार करूनच वागणे योग्य आहे का, असा संघर्ष मनात चालू आहे. निवडणुकीला उभे राहू नये आणि लोकांत काम करीत राहावे- किंवा निवडणूक करून ती जिंकून सत्तेबाहेर राहावे असे दोन पर्याय आहेत. कोणता स्वीकारावा?

महाराष्ट्राचे चार वेळा मुख्यमंत्री झालेले, महाराष्ट्राच्या भवितव्याची सफर करणारे व स्वप्न पाहणारे राज्याचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण हे एक मुरब्बी, मुत्सद्दी राजकारणी व दूरदृष्टीचे समाजकारणी होते. महाराष्ट्रातील 'माळावरचा माणूस' उभा करण्यासाठी त्यांनी जीवाचे रान केले, सहकाराचं अमृत सामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, शिक्षणाचा संदेश घरोघरी नेण्यासाठी फी-सवलतीचा मार्ग अवलंबिला. ना भूत ना भविष्य अशा अवस्थेत हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांसाठी 'कसेल त्याची जमीन' हा कायदा राबवून त्याची मातीशी जोडलेली नाळ आणखी घट्ट केली. विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबवून स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या प्रगतीची पायाभरणीच केली. राजकारणात केवळ मिरवण्यापेक्षा, कुणाला तरी हरवण्यापेक्षा किंवा कुणाची तरी जिरवण्यापेक्षा बेरजेचे राजकारण केले आणि महाराष्ट्रातील माणूस नव्या परिवर्तनाच्या लाटेत सामील करून घेतला. गेली साठ-सत्तर वर्षे महाराष्ट्र प्रगतिपथावर आहे, याचे मोठे श्रेय यशवंतरावांच्या कार्यक्रमाधिष्ठित राजकारणाला व त्यांच्या ध्येयवादाला जाते. सामान्य माणसांचं खऱ्या अर्थाने प्रतिनिधित्व करणारा, लोकाधार असलेला, इतिहास पाठीवर टाकून भविष्यकाळ घडवायला चाललेला एक अत्यंत यशस्वी राजकीय नेता- अशी त्यांची प्रतिमा तयार झाली आणि राष्ट्रीय राजकारणाच्या दिशेने कळतनकळत त्यांची वाटचाल सुरू झाली. पुढे पं.नेहरूंच्या हाकेला प्रतिसाद देत ते दिल्लीला गेले. तिथे त्यांच्या जमेच्या राजकीय बाजूच त्यांच्या अंतिम यशाच्या आड आल्या, हा सलही त्यांनी आपल्या स्वभावानुसार घरंदाजपणे वेणूताईंना लिहिलेल्या एका पत्रातून व्यक्त केला आहे.

मी १९७७ मध्ये 'यशवंतराव चव्हाण : एक साहित्यिक राजकारणी' हा लेख प्रसिद्ध केला होता. त्यासाठी वाचन करताना टी.टी.कुन्हीकृष्णन यांच्या 'चव्हाण ॲन्ड द ट्रबल्ड

डिकेड' या ग्रंथात त्यांच्याबद्दल एक वाक्य आढळले... 'There is in him a certain thin streak of the quality of Hamlet.' याचा अर्थ हॅम्लेटच्या मानसिक संघर्षासारखा यशवंतरावांचाही मानसिक संघर्ष कधी तरी झाला असला पाहिजे किंवा अधून-मधून होत राहिला असला पाहिजे. यशवंतरावांवर वाचन-मनन करत होतो, पण त्यांनी आपल्या मानसिक संघर्षाबद्दल लिहिल्याचे किंवा बोलल्याचे एखादे उदाहरण सापडत नव्हते. मात्र, त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात त्यांच्यावर 'साहित्यिक यशवंतराव' हा ग्रंथ लिहिताना त्यांचे ४ मे १९७५ रोजीचे माँटेगो बे (जमैका) येथून लिहिलेले पत्र आढळले आणि कुन्हीकृष्णन यांच्या वरील विधानाची मला प्रचिती आली.

प्रथम आपण हॅम्लेटचा मानसिक संघर्ष पाहू या. हॅम्लेटच्या जीवनात अशी एक वेळ येते की, डेन्मार्कमधील लोकांचे भ्रष्ट, दुटप्पी वर्तन पाहून तो संतापतो. अशा जगात कसे तरी जगण्यापेक्षा मेलेले बरे, असे त्याला वाटू लागते आणि 'To be, or not to be' that is the question' हे स्वगत येतं. या स्वगतात हॅम्लेटचा वैचारिक कल्लोळ व मानसिक संघर्ष व्यक्त झाला आहे. इथे तो मानवी अस्तित्वासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित करतो. कसं तरी रडत-कुढत जगण्यात काही उदात्तता आहे का? काळाने केलेला तिरस्कार, त्याच्या चाबकाचे फटके, जुलमी माणसाचा अन्याय व अत्याचार, भ्रष्टाचार, अधिकाऱ्यांचा उद्दामपणा, कायद्याचा विलंब इत्यादी गोष्टी सहन करत जगण्यात काही अर्थ आहे का? या जीवनातील दु:ख आपण सहन करीत असतो, कारण मृत्यूनंतर येणाऱ्या अज्ञात दु:खापेक्षा हे ज्ञात दु:ख केव्हाही बरेच म्हणायचे, अशी त्याची समजूत होते.

भरगच्च राजकीय कारकिर्दीत यशवंतरावांना फार कमी वेळा फुरसतीचे, विश्रांतीचे, विरंगुळ्याचे क्षण मिळत असत. कराडच्या प्रीतिसंगमावर, दौऱ्यावेळी लोकांच्या सान्निध्यात आणि निसर्गात त्यांना थोडा निवांतपणा मिळत असे. परदेश दौऱ्यावर असताना आपल्या देशापासून खूप दूर असल्यामुळे ते स्वत:कडे व भारतीय राजकारणाकडे अगदी तटस्थपणे व वस्तुनिष्ठ पद्धतीने पाहू शकत असत. त्या एकटेपणात ते काही सर्जनशील निर्मिती करत असत- मग ती वाचनाच्या माध्यमातून असेल किंवा लेखनाच्या.

मागे उल्लेख केलेले यशवंतरावांचे पत्र त्यांनी आपल्या सत्ताराजकारणाच्या जवळजवळ शेवटी लिहिले आहे. हॅम्लेटचे स्वगत हे त्याने स्वत:शी केलेले संभाषण आहे, तर यशवंतरावांचे हे पत्र (आणि इतरही) म्हणजे वेणूताईंशी त्यांनी केलेले संभाषणच आहे. कारण या पत्राच्या शेवटी ते म्हणतात, 'हे सर्व लिहीत असताना तू समोर बसली आहेस, असे मला एकसारखे वाटत होते.' (विदेश दर्शन, पृ.१४०). या पत्रातून यशवंतरावांनी केलेले आत्माविलोकन, आत्मनिरीक्षण, आत्मपरीक्षण, आत्मसमीक्षा व जीवनसमीक्षा हे त्यांच्या संवेदनशीलतेचे व सदसद्विवेकबुद्धीचे प्रतीक आहे.

रंगभूमीवर एकटेच असताना आपल्या अत्यंत खासगी भावना व्यक्त करायला हॅम्लेटला ती वेळ योग्य वाटते, तर माँटेगो बे (जमैका)च्या निवांत वातावरणात सागराला साक्ष ठेवून यशवंतराव आपल्या मनाचे कप्पे उघडू-उलगडू लागतात. आपल्या जिव्हाळ्याच्या भावना, राजकारणात उपसलेले कष्ट, लोकांकडून आलेले भले-बुरे अनुभव, लोकांचे स्वार्थ, वरिष्ठांकडून झालेला अवमान, अपमान, अवहेलना व त्यातून आलेली अगतिकता इत्यादी गोष्टी व्यक्त करताना यशवंतराव अंतर्मुख होतात आणि हॅम्लेटप्रमाणे स्वत:लाच धारेवर धरतात. या अंतर्मुखतेला प्रांजळपणाची झाक असल्यामुळे ती पराकोटीची उंची गाठते.

हॅम्लेटच्या स्वगतात सर्वत्र त्याची प्रश्नार्थी मन:स्थिती व्यक्त होते. यशवंतरावांच्या पत्रातही आपल्याला त्यांच्या प्रश्नार्थी मन:स्थितीचे दर्शन घडते. या पत्राची सुरुवातच मुळी अशी होती- 'गेले दोन-तीन दिवस अनेक प्रश्नांनी माझ्या मनात काहूर मांडले आहे. त्या प्रश्नांची उत्तरे काय आहेत कोण जाणे; पण प्रश्न तरी नेमके काय असू शकतील हे एकदा कागदावर मांडून पाहावे, असे मनात आले आहे.'

आपल्याभोवतीची माणसं, त्यांचे राजकीय डावपेच, ढोंगी मित्र, आई, चुलता, प्रेयसी या सर्वांबद्दल हॅम्लेट साशंक, संशयी बनतो; वेळ आल्यावर त्यांच्याबद्दल कटू प्रतिक्रिया व्यक्त करतो. यशवंतरावांच्या दीर्घ काळच्या राजकारणात माणसांचे थवेच्या थवे त्यांच्या आजूबाजूला राहिले. त्यांतील काही लोकांच्या वर्तनाबद्दल संशय व्यक्त करत एका तत्त्वचिंतकाच्या भूमिकेतून ते आपल्या राजकीय कारकिर्दीच्या मुळालाच हात घालतात. 'जे आपणासाठी कोणी केले नाही ते आपण इतरांसाठी करावे आणि सत्तेच्या केंद्रस्थानी असताना ते जर केले, तर अधिक फलदायी होते. म्हणून अधिक मित्रभावाने, हळुवारपणे पण विचारांच्या दिशा कायम ठेवून माणसे मी वागविली आणि वाढविलीही... हे सर्व ठीक आहे. पण आज मी जेव्हा राजकारणाचे चित्र

पाहतो, तेव्हा माझे मन अस्वस्थ होते. आपण काही नव्या कामाचा पाया घातला होता का? खरी जिव्हाळ्याची माणसे अवतीभोवती होती का? काही माणसांचे नमुने पाहिले म्हणजे आश्चर्यही वाटते- खरे म्हणजे दुःख होते' (विदेश दर्शन, पृ.१३७) हॅम्लेटदेखील उद्वेगापोटी एके ठिकाणी म्हणतो- What a strange piece of work is a man!

हॅम्लेटच्या चुलत्याने त्याला डेन्मार्कच्या गादीपासून (त्या गादीचा तो खरा वारसदार असूनही) दूर ठेवले आहे. त्याचा चुलता इतरांच्या साह्याने हॅम्लेटविरुद्ध कटकारस्थाने करतो, त्याला ठार मारण्याची योजनाही आखतो. अशा सत्तालोभाचा, सत्तास्पर्धेचा हॅम्लेटला वीट येतो. अशी राजकीय परिस्थिती सर्वत्र सर्व काळी आढळते. यशवंतरावही काहीअंशी अशाच प्रकारच्या राजकीय अनुभवातून गेले होते. तो अनुभव आणि त्यानंतरची त्यांची भावना शब्दबद्ध करताना यशवंतराव लिहितात, 'आज सत्तास्थानावर राहण्याची अनेकांची धडपड चालू आहे. जे आहेत ते तेथेच कसे राहता येईल यासाठी साधनशुचितेचा कसलाही विचार न करता अगदी क्रूरपणे कारस्थाने करताहेत... असल्या कारस्थानात अप्रत्यक्षपणे सामील न होता किंवा त्या कारस्थानाचे बळी होण्यापूर्वीच योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन बाजूला झाले तर बरे नाही का- असा प्रश्न मनात घोळतो आहे.' (विदेश दर्शन, पृ.१३७)

हॅम्लेटचा चुलता क्लॉडियस हा हॅम्लेटच्या वडिलांचा खून करून व हॅम्लेटचे राजेपद हिरावून घेऊन स्वत: डेन्मार्कचा राजा बनलेला असतो. त्याने हॅम्लेटला डेन्मार्कच्या मुख्य सत्ताकेंद्रापासून दूर ठेवलेले आहे. तो हॅम्लेटला विश्वासात घेत असल्याचं नाटक करतो, त्याला चुचकारतो, त्याच्याशी गोड-गोड बोलतो. त्याने हॅम्लेटच्या सर्व हालचालींवर पाळत ठेवलेली असते. यशवंतराव एक जनाधार लाभलेले व पुरोगामी चेहरा असलेले नेते अशी देशाला त्यांची ओळख होती. त्यामुळे दिल्लीच्या राजकारणात त्यांना कित्येक मित्र होते तसे छुपे आणि उघड प्रतिस्पर्धीही होते. यशवंतरावांतील वक्ता आणि नेता जनमानसावर व वरिष्ठांवर खूप मोठा प्रभाव टाकून गेला. लोकांतून उगवलेले-उभारलेले हे नेतृत्व पं.नेहरूंच्या नजरेतून सुटणे शक्य नव्हते. त्यांच्या विनंतीवरून यशवंतराव हिमाललयाच्या रक्षणासाठी महाराष्ट्राचा सह्याद्री बनून छातीचा कोट करून गेले, पण दिल्लीत सारं काही आलबेल होतं असं नाही. जिथं सत्ता आहे तिथं कमालीची स्पर्धा आली



आणि स्पर्धेत ऊरफोडी व कुरघोडी आली. सुसंस्कृत मनाचे, घरंदाज स्वभावाचे यशवंतराव या स्पर्धेत पडायला मुळी तयार व्हायचे नाहीत. कारणं काही का असेनात, सत्ता नेहमी त्यांच्याकडे चालत आली. ते कृतज्ञतेने मान्य करतात की, 'पुढल्या वर्षी तीस वर्षे होतील, जेव्हा मी पहिली निवडणूक जिंकून सरकारमध्ये आलो. अनेक अडचणी आल्या, परिश्रम करावे लागते. अनेकांचे आशीर्वाद मिळाले. लौकिक अर्थाने नावलौकिक मिळाला. सत्तेची अनेक स्थाने पाहिली- राज्यात आणि केंद्रातही. सामान्य अर्थाने कुणालाही हेवा वाटावा अशी!' ज्या परिस्थितीतून हॅम्लेट जात आहे, त्याच परिस्थितीतून यशवंतरावही जात होते. दोघांचेही Political alienation प्रकर्षाने जाणवते. प्रवाहाला दिशा देण्याचं, प्रवाहावर मात करण्याचं- नव्हे, स्वत:च प्रवाह बनण्याचं ज्याच्या अंगात सामर्थ्य आहे; त्याला किनाऱ्यावर केवळ उभं केलं तर तो अस्वस्थ होणार, धुमसणार, हे उघडच आहे. यशवंतरावांना आता सत्तेचा मोह नाही, कारण त्यांनी यापूर्वी ती मनमुरादपणे व औदार्याने जनतेसाठी वापरली आहे. हॅम्लेट आणि यशवंतराव या दोघांनाही सत्तेपासून दूर ठेवल्याचं व मुद्दाम दुर्लक्षित केल्याचं दुःख आहे. यशवंतराव लिहितात, 'श्रीमतीजी (इंदिराजी) अजून महत्त्वाच्या कामात सल्ला-मसलत घेतात. पण सत्तेच्या केंद्रवर्तुळाच्या बाहेर ठेवण्याचा समजेल असा प्रयत्न करतात, असा अनुभव आहे. मग मन धुमसत राहते. असे अपमानित राहण्याने ज्यांचा मी प्रतिनिधी आहे असे मानतो, त्यांचाही अवमान तर नाही ना

होत, अशी बोचणी असते.'

हॅम्लेटचे मन दुभंगलेले आहे. व्यक्तिगत जीवनात तो निराश आहे, तर डेन्मार्कमधील राजकीय व सामाजिक परिस्थितीबद्दल तो नाराज आहे. या जगात डेन्मार्क आहे; पण डेन्मार्कमध्येच तो जग पाहू लागतो, एकूण जीवनाची समीक्षा करू लागतो. डेन्मार्कच्या भ्रष्ट व बुरसटलेल्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात हॅम्लेटला गुदमरल्यासारखे वाटते. म्हणून 'डेन्मार्क इज अ प्रिझन' असे तो म्हणतो. बदललेल्या तत्कालीन भ्रष्ट भारतीय राजकारणात आणि आपल्या ऐतिहासिक ध्येयधोरणापासून दूर जात असलेल्या तेव्हाच्या काँग्रेस पक्षात यशवंतरावांना घुसमटल्यासारखे वाटते. त्यांची द्विधा मन:स्थिती आणि मानसिक संघर्ष अशा पद्धतीने व्यक्त झाला आहे. 'आम्ही साऱ्यांनी वैयक्तिक विचार करूनच वागणे योग्य आहे का, असा संघर्ष मनात चालू आहे. निवडणुकीला उभे राहू नये आणि लोकांत काम करीत राहावे- किंवा निवडणूक करून ती जिंकून सत्तेबाहेर राहावे असे दोन पर्याय आहेत. कोणता स्वीकारावा? पण निवडणुका तरी होणार आहेत का?... सत्तेच्या बाहेर राहिल्यानंतर आजची शक्ती राहणार नाही. लोकांची दृष्टी बदलेल. ते दूर होतील. साधनांची कमतरता होईल आणि मग मनाने कष्टी होऊन एकाकी पडावे लागेल, हेही शक्य आहे. पण त्याची तयारी नको का करायला?'

मृत्यूच्या काही क्षण अगोदर हॅम्लेट आपल्या 'To be, or not to be' या भूमिकेवरून 'Let it be' या तडजोडीच्या भूमिकेवर येतो. तो डेन्मार्कच्या भवितव्याचा विचार करू लागतो. यशवंतरावही अशाच पद्धतीने व्यवहारवादी भूमिकेतून भारताच्या भवितव्याचा विचार करताना दिसतात. ते म्हणतात, 'असा वैयक्तिक भावनांचा विचार करून निर्णय घ्यावयाचे नसतात. राष्ट्रीय कार्य करीत असताना स्वत:ला विसरले पाहिजे- भविष्याकडे लक्ष ठेवले पाहिजे. रागाने मोडता येते, जोडता येत नाही. तडजोडीने वागले पाहिजे, असा विचार करून मग काम चालू राहते... पण खऱ्या अर्थाने काम चालू आहे का? की, एका व्यक्तीचा अहंकार सुखविण्यासाठी हे सर्व चालू आहे?... मला हेही कबूल केले पाहिजे की, श्रीमतीजी (इंदिराजी) माझ्याशी कधी सूडाने वागल्या नाहीत. फेअर वागणे म्हणतात तसे गेली सहा वर्षे त्यांनी माझ्याशी व्यक्तिश: वर्तन केले. पण शेवटी हे सगळे वैयक्तिकच ना? सार्वजनिक जीवनात आणि राजकारणात जी तत्त्वे मानली, त्यांच्या भविष्याचे काय?'

मरणासन्न अवस्थेतही हॅम्लेट डेन्मार्कच्या गादीचा व डेन्मार्कच्या कल्याणाचा विचार करतो आणि नॉर्वेचा तरुण फॉर्टिनबास हा डेन्मार्कच्या गादीचा वारस व्हायला योग्य आहे, असे तो आपला मित्र होरॅशियोला सांगतो. तो म्हणतो, 'I do prophesy the election lights on Fortinbrass. He has my dying voice.' ज्या काँग्रेसला यशवंतरावांनी आपलं सर्वस्व मानलं व आपलं सर्वस्व वाहिलं- ती काँग्रेस एकाधिकारशाहीच्या मार्गाने चालली होती, निवडणुका जिंकण्याचे एक यंत्र बनत चालली होती. अशा प्राण हरवलेल्या अखिल भारतीय काँग्रेसमध्ये यशवंतरावांचे मन रमत नव्हते. ती काँग्रेस सुधारणेपलीकडे गेल्याचे त्यांना वाटत होते. म्हणून निदान महाराष्ट्र काँग्रेस तरी त्या अधोगतीपासून वाचवावी, असा विचार त्यांच्या मनात आला होता आणि तो त्यांनी सदरील पत्रात व्यक्त केला आहे. 'आणि मला महाराष्ट्र काँग्रेस पक्षालाच मार्ग दाखविला पाहिजे. छुपे शत्रू आणि आज वरवर दिसणारे मित्रही लांब जातील, विरोध करतील- हे सर्व समजून-उमजून निर्णय घ्यावा लागेल.' महाराष्ट्रातील तेव्हाच्या पुलोद सरकारला यशवंतरावांची प्रेरणा होती- हे काहीअंशी तरी या अवतरणावरून सिद्ध होऊ शकेल.

यशवंतरावांचे हे पत्र म्हणजे त्यांचे आत्मावलोकन आहे, तसेच ते त्यांच्या राजकीय व सामाजिक जीवनाचे सिंहावलोकनही आहे. माँटेगो बे येथील 'हॅपी डेज' या बंगल्यात त्यांची राहण्याची व्यवस्था केली होती. बंगल्यातून समोरचा शांत सागर त्यांच्या दृष्टीस पडत होता... पण मनात काही कढ येत होते, काही लाटा उसळत होत्या. 'हॅपी डेज' या बंगल्यातील वास्तव्यात मन प्रसन्न असताना भूतकाळातील काही दु:खद व खेदमय क्षणांची आठवण यावी याला मानसशास्त्रीय स्पष्टीकरण आहे. तरीही आंग्ल कवी शेली यांच्या या शब्दांत त्या मन:स्थितीचे समर्पकपणे वर्णन करता येईल.

'We look before and after,
And pine for what is not;
Our sincerest laughter
With some pain is fraught;
Our sweetest songs are those that tell of saddest thought.'

**प्रा. डॉ. सहदेव चौगुले-शिंदे,** कोल्हापूर
Mob.9823431282

नवे पुस्तक

शंकर विभुते

# 'तसनस' : निखाऱ्यावरची धुमसती राख...




मराठी कादंबरीविश्वाची उंची वाढवायची असेल, तर आत्मकथनात्मक आशयाच्या लेखनाला थोडीशी बगल देऊन मराठी माणसाच्या जगण्यातील विविध संदर्भ कवेत घेता आले पाहिजेत. त्याचे वर्तुळ वाढले पाहिजे. या दृष्टीने 'तसनस' ही कादंबरी पुढे गेलेली आहे. चाकोरीबद्ध लेखनाला फाटा देऊन कादंबरीचा नायकच 'चळवळ'– ही मध्यवर्ती कल्पना ठेवून वाचकांच्या पुढे आलेल्या या कादंबरीने कमालीची उंची गाठलेली आहे. आसाराम लोमटे यांची ही पहिलीच कादंबरी असूनही पहिलेपणाचे कोणतेही लक्षण यात दिसून येत नाही, हेही तितकेच खरे आहे. उलट, त्यांच्या 'कथा'लेखनाच्या गुणवत्तेची पुढील पायरी या कादंबरीने गाठली आहे, असे म्हणता येते.

कधी कधी एखाद्या लेखकाची एखादी उच्च दर्जाची कलाकृती नावाजल्यानंतर तितक्याच उच्च दर्जाची किंवा त्यापेक्षा एक पाऊल पुढे जाणारी लेखनकृती त्याच्याकडून जन्मास येतेच, असे नाही. उलट बहुतांश वेळी तर त्या लेखकाने पुढे कितीही लेखन केले तरी 'त्या' एकाच कलाकृतीने त्याला ओळखले जाते. ही मर्यादा त्याच्या अनुभवक्षेत्राच्या चौकटीमुळे उद्‌भवते. काही अपवादात्मक लेखक आपल्या विविधांगी अनुभवक्षेत्रामुळे हा शिक्का पुसून टाकतात आणि त्यांचे पुढील लेखन पूर्वीच्या लेखनाच्या तुलनेत वेगळे अनुभवविश्व घेऊन वाचकांच्या समोर येते. अशा वेळी लेखकाविषयी व लेखनकृतीविषयी वाचक, अभ्यासक, समीक्षक यांना जीवनातील नव्या अनुभव-विश्वाचे आकलन घडते. हे अनुभवविश्व प्रत्येक वेळी नव्याने मांडणारे मोजकेच लेखक मराठी साहित्यात आहेत. त्यातील नव्या पिढीतील एक दमदार नाव म्हणजे आसाराम लोमटे.

'इडा पीडा टळो' व 'आलोक' हे कथासंग्रह आणि 'धूळपेर' हा लेखसंग्रह या लेखनकृतींनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेले आणि साहित्यातील अत्यंत सन्मानाच्या साहित्य अकादमी या पुरस्काराने सन्मानित झालेले आसाराम लोमटे आपल्या 'तसनस' या नव्या कादंबरीद्वारे वाचकांच्या भेटीला आले आहेत. मुळात त्यांच्या कथाही लघुकादंबरीच्या जवळ जाणाऱ्या आहेत. एखाद्या प्रसंगाभोवती रिंगण घालणाऱ्या त्यांच्या कथा नाहीत. त्यांच्या कथा वाचताना बाबूराव बागुल यांची 'मैदानातील माणसं' या कथेची प्रकर्षाने आठवण येते. एकच मुख्य पात्र, एखादी मोठी घटना हा आकृतिबंध त्यांच्या लेखनाचा कधीही नव्हता. हीच परंपरा त्यांच्या कादंबरीतही घडली आहे. या कादंबरीत एखादा मुख्य नायक किंवा नायिका नाही. प्रारंभ, मध्य व शेवट नाही. ओढून-ताणून केलेले लेखनाचे नवे प्रयोग नाहीत. भाषेची तोडमोड नाही. कल्पनेने उभे केलेला खोटा इतिहास नाही किंवा लेखकाच्या

लेखनकृतीने भावना दुखावल्या म्हणून मोर्चे, निवेदन, निषेध घडून आणण्यासारखी सनसनाटी विधानेही यामध्ये नाहीत. पण जे काही आहे ते वाचकांच्या मनाला विचार करायला भाग पाडणारे, मेंदूला हलवून सोडणारे आणि काही काळासाठी कादंबरीतील पात्रांसारखे निराश व हतबल होऊन गंभीर चिंतन करणारे भावविश्व या कादंबरीत आहे.

कथानक, पात्र, वातावरण, निवेदनशैली, लेखकाचा दृष्टिकोन, आकृतिबंध... इत्यादी कसोट्या ढोबळमानाने कादंबरी या साहित्यप्रकाराचे मूल्यमापन करणाऱ्या आहेत. पण हेच मापदंड सगळ्या साहित्यकृतींना लागू पडत नाहीत. कथानक म्हटले की साधारणपणे ज्यास आपण 'कथा' म्हणतो, त्या पद्धतीने सुरुवात ते शेवट असा प्रसंगाचा धागा असतो, पण ही कल्पनाही या कादंबरीने बाद केली आहे. या कादंबरीत कथानक आहे, पण रूढ अर्थाने म्हणतो तसे सलग नाही. वेगवेगळ्या क्षेत्रांतील समाजातील गंभीर प्रश्न सोडविणाऱ्या चळवळीच्या वेगवेगळ्या कार्यकर्त्यांची ही कहाणी आहे. सगळे कार्यकर्ते धाडसी, शूरवीर, पराक्रमी, नीतिमान असले तरी हिंदी चित्रपटासारखे अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देऊन गोड शेवट करणाऱ्या नायकासारखे नाहीत. पण भूमिका घेऊन जगणारी, आपल्या भूमिकेशी प्रामाणिक राहणारी आणि भविष्यात हा धागा पुढे घेऊन जाणारी पिढी जन्मास येईल अशी आशा बाळगणारे नायक–नायिका आहेत. लग्न न करता शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्वतःला वाहून घेतलेला नारायण माधव चिलवंत ऊर्फ नामा असेल, नामाचा मित्र व आमदाराचा नातलग असूनही त्याच्या विरोधात उभा राहणारा राम तांगडे असेल, शेती नसतानाही शेतकऱ्यांकरता आम्ही लढतो असा पुळका दाखवणारा सखाराम धानोरकर हा ढोंगी नेता असेल, शेतकरी संघर्ष समितीचा संस्थापक असलेले पण आपला वारस जाहीर न करताच ही चळवळ डोळ्यांसमोर नष्ट होतांना त्याकडे निर्विकारपणे पाहणारे भाऊसाहेब महाजन असेल... शेतीप्रश्नासोबतच शेतमजूर-कामगारांचे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे आहेत, म्हणून त्याकरता जीवाची पर्वा न करता लढणारा कॉम्रेड रुस्तुम सत्त्वधर असेल, कीर्तन–प्रवचन सोडून महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणारी त्रिवेणीबाई नंद असेल, शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे उत्तर पुरुषांच्या नसबंदीत दडलेले आहे आणि ते केले पाहिजे– असे सांगणारी अविवाहित कांचन थोरात असेल... सत्ता–पैशामुळे कोणतेही प्रश्न सोडविता येतात आणि सत्तेची सूत्रे नेहमीच आपल्या हातात असली पाहिजेत, ही भूमिका ठेवून जगणारा आमदार बदामराव दौलतराव अस्वले असेल, शेतकरी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल झाल्यावर पैसे न घेता त्यांचे प्रश्न सोडविणारे व वेळप्रसंगी महत्त्वाचे मार्गदर्शन करणारे क्षीरसागर वकील असेल, गावातील मंत्र्यांची सभा उधळून लावणारा भास्कर लुंगारे असेल, आपली शेती मिळविण्यासाठी दोन डोळे गमावलेला पण न घाबरता संघर्षाला तोंड देणारा नारायण धुळे असेल... आमदाराचा चमचा बाळू शिंदे असेल, कुठलाही गुन्हा अंगावर न घेता वृत्तपत्रात आपले नाव आले पाहिजे व चळवळीत आपण काम करतो हे दाखवण्यासाठी धडपडणारा भालचंद पोखरदास असेल, शेतीप्रश्नाची जाण असलेला पण शेतीप्रश्नावर कविता लिहिणारा शशांक धानोरकर असेल... ही सगळी पात्रे समाजजीवनातील वेगवेगळे अनुभवविश्व घेऊन वाचकासमोर उभी राहतात. यातील काही नीतिमान, तत्त्वशील भूमिका घेऊन जगणारे नायक–नायिका आहेत तर काही ढोंगी, मतलबी, कपटकारस्थान करणारे खलनायकही आहेत. चळवळीकरता जीवाची पर्वा न करता तुरुंगात जाणारी काही पात्रे आहेत, तर अंगावर साधा ओरखडा न येता समाजसुधारक म्हणून मिरवणारीही काही पात्रे आहेत. त्यामुळे आपल्या भोवताली दिसणाऱ्या वेगवेगळ्या वृत्ती–प्रवृत्तींची प्रातिनिधिक स्वरूपातली चित्रे आहेत.

नामा, राम, भास्कर, त्रिवेणीबाई व कॉम्रेड रुस्तुम ही या कादंबरीतील मुख्य पात्रे आहेत; पण प्रत्येकाचा मार्ग वेगळा आहे, प्रत्येकाची विचार करण्याची पद्धत वेगळी आहे. कादंबरीचे थोडक्यात कथानक असे आहे–

राम, नामा, भास्कर ही तरुण मित्रमंडळी शेत मालाला रास्त भाव मिळावा म्हणून प्रामाणिक प्रयत्न करतात. वेळप्रसंगी तुरुंगात जाणे, लाठीमार खाणे, मंत्र्याच्या सभा उधळून लावणे, शेतकरी अधिवेशन भरवणे अशी कामे अतिशय निष्ठेने करतात. परंतु या शेतकरी आंदोलनात सखाराम, भागचंद, शशांक यांच्यासारख्या मतलबी व संधिसाधू माणसांनी प्रवेश केल्याने या चळवळीची दिशा बदलते. या मंडळींकडून प्रामाणिक काम करणाऱ्या शेतकरी संघर्षचे प्रदेशाध्यक्ष लक्ष्मण निरस यांनाच एका सभेत धक्काबुक्की केली जाते. या बदलत्या, निराश करणाऱ्या घटनेमुळे नामा व मित्रमंडळी या सक्रिय चळवळीतून हळूहळू बाहेर फेकली जातात. त्यांच्या चळवळीविषयी व

प्रामाणिकपणाविषयी आस्था बाळगणाऱ्या समविचारी काही चळवळी-संघटना आहेत. विशेषतः त्रिवेणीबाई यांचा महिला संघ किंवा रुस्तम सत्त्वधर यांची कामगार चळवळ. या बदललेल्या व्यवस्थेविषयी त्यांनाही वाईट वाटते, तरीही नामा आशावादी आहे. कादंबरीच्या शेवटी त्याची भूमिका अशी आहे, 'सगळं वाया गेलंय असंही वाटत नाही. वाटतं- एवढी वर्षे जे काम केलंय ते तण उपटून काढायचंच होतं, राब भाजण्याचंच होतं. आता पेरायचं काम पुढच्यांनी करावं, त्याचीच मी वाट पाहतोय. अजून तरी माझ्यातलं कुतूहल मेलेलं नाही.' (पृ.२८७) याचा अर्थ शेतकऱ्यांच्या समस्येला कारणीभूत ठरणाऱ्या 'तणा'ला बाहेर काढण्यासाठी आयुष्यभर चळवळ करणाऱ्या पण शेवटी वाट्याला राखरांगोळी, 'तसनस' आलेल्या कार्यकर्त्याची ही कहाणी आहे.

शब्द पब्लिकेशन, मुंबईने आकर्षक पुठ्ठाबांधणी रूपात प्रकाशित केलेली २८७ पृष्ठांची कादंबरी पंचवीस प्रकरणांत विभागलेली आहे. या सर्व प्रकरणांचा धागा सलग नसला तरी अन्यायाच्या विरोधात लढण्याची कार्यकर्त्यांची प्रामाणिक तळमळ हीच या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे. या तरुणांच्या वाटा मळवाटा नाहीत. म्हणून लेखकाने ज्यांनी आयुष्यात मळवाटा नाकारल्या... अशांनाच ही कादंबरी अर्पण केलेली आहे. काही प्रकरणांच्या प्रारंभी गडद अक्षरांत सुविचार स्वरूपात केलेली मांडणी कादंबरीच्या तात्त्विक विचारसरणीची उंची वाढविणारी आहे. प्रत्यक्ष चळवळ करणारे आपला इतिहास लिहीत नाहीत आणि लिहिणारे चळवळीत येत नाहीत. या विषयाचे भाष्य सतराव्या प्रकरणाच्या प्रारंभी पुढीलप्रमाणे येते : 'एक इतिहास असतो पुस्तकाच्या पानांत दडलेला. दुसरा इतिहास सांगितला जातो अगणित जिभांमधून पिढ्यान्‌पिढ्या... पण अशा इतिहासातले कैक श्वास विरतात हवेतच, तर कधी मिसळली जाते त्यात सांगणाऱ्याची नियत. तुम्ही इतिहास घडवता, पण लिहीत नाही. हळूहळू मग तुमची जागा घेतात तुमची जीभ लावून बोलणारे सगळे अन् मग अगणित जिभांमधून सांगितला जाणारा इतिहासही होऊ लागतो त्यांच्या मालकीचा.'(पृ.१७४) यामुळे वाचक कादंबरी वाचणे थांबवून विचार करू लागतो. 'प्रतीका'च्या भाषेत केलेली ही मांडणी वाचकांना आजूबाजूला डोळसपणे पाहण्यास मदत करते. कादंबरीत अनेक ठिकाणी लेखकाने प्रतिमा व प्रतीके वापरल्याने भाषिक सौंदर्यात भर पडली आहे. उदा.- मुठीतली वाळू गळताना आता मूठ रिकामी होणार असं वाटावं, तसं आयुष्यात झालंय (पृ.१०), सिंदीच्या फोकासारखा कवळा पोरगा गेला.(पृ.११), घरंगळणारी शिळा खोल खड्ड्यात जाऊन स्थिर व्हावी, तसं व्हायाला त्याला जरा वेळ लागला (पृ.८२), एखाद्या अनाथ लेकराचे केस वाऱ्यावर भुरूभुरू उडताना दिसावेत तसे त्या डोंगराचे माथे दिसू लागतात (पृ.९१), माहेरच्या दोऱ्या तटातट तुटल्यानंतर जसं तिथलं अंगण खायला उठतं, क्षणभरही उभं रहावं वाटत नाही तसं झालं (पृ.२१९) ही काही प्रातिनिधिक उदाहरणे. अर्थात ही प्रतिमा व प्रतीके समजण्यासाठीही वाचकाला या गोष्टींची मूळ माहिती असायला हवी. लेखक एखाद्या पात्राचे वर्णन करताना अशी ओळख करून देतो की, ती व्यक्ती किंवा ते प्रसंग वाचकांच्या समोर दृश्य रूपात उभे राहतात. उदा.शासकीय कामात अडथळा झाल्याचा गुन्हा अंगावर न घेता झेपतील तसं, जमेल तसं- पण उसातून जायचं तर पाचटही अंगाला लागू नये, असं भागचंद यांचं एकूण चरित्र आहे. (पृ.१०९) यामुळे भागचंदविषयी फारसे काही सांगण्याची गरज वाचकांना लागत नाही. भागचंद कसा असेल, हे वाचक एका वाक्यातून ओळखून घेतो. सखाराम धानोरकरविषयी लेखक लिहितात, 'सखारामजीचा कोणताच व्यवहार घाट्याचा नाही. अंग राखून अन् शक्यतो प्रत्येक हालचालीचा-धडपडीचा, मोबदला वसूल करणारा असतो ना.' यामुळे सखारामचा स्वभाव सहज लक्षात येतो. लेखक फक्त पात्राविषयीच भाष्य करून थांबत नाही; तर वर्तमान व्यवस्थेत आजचा समाज कसा आहे, मतदार कसा आहे याविषयी रामाच्या तोंडून ते लिहितात. इतकं मरमर करून लोक इयाट विचारायला तयार नाहीत. मतदान करताना जरा तरी विचार करावा... जनता इतकी बारा पाण्यानं धुतलेलीय की, आपण तिला शहाणं करण्याची गरज नाही. तिला राममंदिर बांधायचं तर ती अयोध्याला विटा घेऊन जाती. दारू-मटणासाठी पुढाऱ्यांचे मळे-तळे रात्री-बेरात्री तुडवून जाती अन् शेतीमालाला भाव पाह्यजी तर ती आपल्यासंग येती. कोणत्या वेळंला कुठं जायचं, हे लोकांना कळतं.(पृ.१९६) चळवळीच्या लोकांना लोक निवडून देत नाहीत, हे भीषण वास्तव लेखक सहजपणे सांगून जातो.

कादंबरीची भाषा प्रसंगानुरूप प्रमाण व बोलीभाषा असल्याने त्याची एक वेगळी गोडी निर्माण झाली आहे. उदा. 'घटना कुठं घडली? घरी का शेतात? पोरानं फाशी

घेतली होती. रुस्तुमनं सावधच विचारलं. वावरात नं, साल धरलं व्हतं. त्या मालकाच्या आखाड्यावरच राहत व्हते दोघं नवराबायकू. हे आसं घडलं तव्हा एकटाच व्हता त्यो. त्याची बायको माहेरला गेल्ती.'(पृ१६१). वावर, साल, व्हतं, तव्हा, गेल्ती... यांसारखी मराठवाडी बोलीभाषेतील असंख्य शब्द पानोपानी आढळतात. यासोबतच म्हणी, वाक्प्रचार, कविता, पत्र, घोषणा, भाषण, निवेदन, बातमी.. यामुळे भाषाशैलीच्या सौंदर्यात भर पडली आहे. निवेदनात बदल म्हणून या बाबी येत नाहीत, तर सहजपणे येतात. लेखक जसा ढोंगी समाजसेवक, बदमाश राजकारणी, मतलबी मतदार यांना सोडत नाही तसा तो साहित्यिकांनाही सोडत नाही. लिहिणाऱ्या साहित्यिकाबद्दल कादंबरीतील नायक नामा म्हणतो : 'आता आमचं कार्यकर्त्यांचं हे जग आणि लिहिणारांच्या दुनियेत दुसरंच काही तरी चालू. शेती–मातीचं लिहिणारे काही लोक अधूनमधून त्यांची पुस्तकं देतात. कसं वाटलं, विचारतात. यात जे अगदीच खपली काढील अन् गदागदा हलवून सोडील, असं खूपच कमी असतं.'(पृ.१२४) यामुळे नवोदित लेखकांना नकळतपणे दिलेला हा इशारा आहे, असे वाचकांना सहज वाटून जाते. असे रोखठोक सांगणारा लेखक मात्र कुठे–कुठे हळवा होतो. तेव्हा ते लेखन ललित गद्याच्या जवळ जाते. उदा. 'यंदा त्याने कमाल केलीय. आईबापावर रुसून गेलेल्या पोरासारखा नाही वागला तो. मुलूख सोडून परागंदा झाल्यासारखे केले नाही त्याने. लहरी जुगाऱ्याने भीड चेपल्यानंतर अगदीच निसवल्यासारखे वागावे, तसेही केले नाही.' पावसाविषयी केलेले हे वर्णन वाचकाच्या मनाला भिडून जाते. कादंबरीचे दुसरे एक महत्त्वाचे वेगळेपण म्हणजे, निवेदनशैलीतील वैचारिक चिंतन प्रसंगानुरूप लेखक नैतिक मूल्यांचे जोरदार समर्थन करतो. अनैतिक माणसे जेव्हा चळवळीतील–संघटनेतील मोठमोठी पदे बळकावतात; तेव्हा कादंबरीतील नायक शांतपणे म्हणतो, 'फुटकळ पदांनी माणूस मोठा होत नाही. ज्यांची कामातून ओळख निर्माण होत नाही, अशांना पदांच्या कुबड्या लागतात. आम्ही पदावर पाणी सोडून जमाना झालाय. पदांचे तुकडे फेकल्यानं फक्त लाचार गोळा होतात अन् पदाला चिकटून राहतात. बेभान जुगाऱ्यासारखी जिंदगी उधळता आली पाहिजे. पदांच्या खरकट्या पत्रावळीचं आकर्षण ज्या दिवशी कमी होईल, तो दिवस भला म्हणायचा.' यामुळे वाचकांच्या मनावर नैतिक मूल्यांची पेरणी नकळतपणे होते.

कादंबरीच्या बलस्थानांसोबतच काही मर्यादाही वाचकांना जाणवू लागतात. ही कादंबरी चळवळीच्या कार्यकर्त्यांची कहाणी असली तरी ती सलग नाही. वाचकांना पकडून ठेवण्याचे कसब येथे दिसत नाही. कधी कधी तर वाचकाची दमछाक होते. तो मनातल्या मनात कथानकाचा धागा जुळवत असतानाच पुढील प्रकरणात या धाग्याशी काही संबंध नसलेले उपकथानक येते. शेतकरी संघर्ष समितीची चळवळ जोरात असतानाच कामगारलढ्यासाठी लढणारा कॉम्रेड रुस्तुम मधेच येतो. त्याने उपस्थित केलेले प्रश्न अतिशय महत्त्वाचे असताना (तो नामाला पत्राद्वारे उत्तर मागतो) नामा मात्र उत्तर देण्याचे टाळतो. शेतीच्या वादातून डोळे काढलेल्या नारायण धुळे यांना भेटण्यासाठी नामा कष्ट घेत नाही, नारायणा धुळे यांची भेट घेणे व रुस्तुमच्या चळवळीला किमान पाठिंबा देणे हे 'नामा'ला सहज शक्य होते, पण लेखक तसा प्रयत्न कुठेही करीत नाही. कदाचित शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी लढणाऱ्या चळवळ्यांना समाजातील अन्य प्रश्न महत्त्वाचे वाटले नाही. असेही लेखकाला अप्रत्यक्ष सुचवायचे असेल.अर्थात माणसाचं जगणं असं काही ठरवून व्यवस्थित होत नाही. पण लेखनात तरी किमान तसे करता येते, असे वाचकांना वाटू लागते. याला कादंबरीच्या मर्यादाही म्हणता येणार नाही, पण वाचकांच्या मनातील काही अपेक्षा पूर्ण होत नाहीत असे म्हणता येईल.

मराठी कादंबरीविश्वाची उंची वाढवायची असेल, तर आत्मकथनात्मक आशयाच्या लेखनाला थोडीशी बगल देऊन मराठी माणसाच्या जगण्यातील विविध संदर्भ कवेत घेता आले पाहिजेत. त्याचे वर्तुळ वाढले पाहिजे. या दृष्टीने 'तसनस' ही कादंबरी पुढे गेलेली आहे. चाकोरीबद्ध लेखनाला फाटा देऊन कादंबरीचा नायकच 'चळवळ'– ही मध्यवर्ती कल्पना ठेवून वाचकांच्या पुढे आलेल्या या कादंबरीने कमालीची उंची गाठलेली आहे. आसाराम लोमटे यांची ही पहिलीच कादंबरी असूनही पहिलेपणाचे कोणतेही लक्षण यात दिसून येत नाही, हेही तितकेच खरे आहे. उलट, त्यांच्या 'कथा'लेखनाच्या गुणवत्तेची पुढील पायरी या कादंबरीने गाठली आहे, असे म्हणता येते.

**प्रा. डॉ. शंकर विभुते**, नांदेड.
Mob.7588068056

तसनस (कादंबरी)
लेखक : आसाराम लोमटे
प्रकाशक : शब्द पब्लिकेशन, मुंबई
पृष्ठे : २८७,किंमत : ४८५ रुपये

अशोक कौतिक कोळी

# साहित्य अकादमीविजेता आबा गोविंदा महाजन

आबाने निवडलेली वाट अचूक होती, हे आता सिद्ध झाले आहे. कसा राहिला आबाचा साहित्य अकादमीपर्यंतचा प्रवास? तर, ही वाट निश्चितच सोपी नव्हती. आबाला कुठलाही शैक्षणिक, साहित्यिक वारसा नव्हता. घरची सगळी परिस्थिती अशा गोष्टींसाठी बिलकुलच अनुकूल नव्हती. जळगाव जिल्ह्यातील एरंडोलसारख्या आडवळणाच्या गावी एका शेतमजूर कुटुंबात त्याचा जन्म झाला. घरची परिस्थिती दारिद्र्याने भारलेली होती. सोबतच वृद्ध आई-वडील व भावंडांची जबाबदारी अंगावर येऊन पडलेली होती. आई लहानपणीच जग सोडून गेलेली. अशा परिस्थितीमुळेच आबाने शिक्षकी पेशा निवडलेला होता. त्या वेळी डी.एड. झाले की नोकरी लागायची. झालेही तसेच होते.

'करि मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभूशी तयाचे...' पूज्य साने गुरुजी यांचे हे वचन आहे. आपल्या ह्या वचनाचा प्रत्यय आणून देणाऱ्या अनेक गोष्टी साने गुरुजींनी लिहिल्या व मुलांचे प्रबोधन, मनोरंजन केले. गुरुजींच्या अनेक गोष्टी, कविता विद्यार्थ्यांना तोंडपाठ आहेत. कित्येक विद्यार्थी आणि शिक्षक या दोहोंवरही साने गुरुजींच्या वाङ्मयाने कायमचे गारूड केलेले आहे. याला नव्या पिढीतील लेखक आणि शिक्षकही अपवाद नाहीत. यातीलच एक नाव आहे आबा गोविंदा महाजन.

आबा गोविंदा महाजन हे खानदेशातील प्रथितयश प्रयोगशील बालसाहित्यिक व शिक्षक (आत्ताचे तहसीलदार, शिरपूर, जि.धुळे) यांना २०२० या वर्षासाठीचा अत्यंत मानाचा साहित्य अकादमीचा बालसाहित्यातील पुरस्कार गेल्या आठवड्यात जाहीर झाला आहे. त्यांच्या 'आबाची गोष्ट' या लघुकथासंग्रहासाठी हा पुरस्कार आहे. तो जाहीर होताच वाङ्मयक्षेत्रातून त्याचे प्रचंड स्वागत झाले.

आबांचे अभिनंदन करणाऱ्यांमध्ये मीसुद्धा होतो. आबा भरभरून बोलत होता. विनयतेने अभिनंदन स्वीकारत होता. फोनवरील बोलणे संपल्यानंतर आबाच्या एकूणच वाङ्मयीन कारकिर्दीचा आलेख माझ्या डोळ्यांसमोरून तरळू लागला... कोण आहेत आबा महाजन; त्यांचा साहित्यिक प्रवास कसा- व कोठून सुरू झाला, याचा धांडोळा मनात सुरू झाला. तसा तर आबा माझा डी.एड.चा वर्गमित्र... आम्ही त्या वेळी चोपडा (जि.जळगाव) येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून डी.एड. करत होतो.

आबा मुळातच विलक्षण बुद्धीचा, संवेदनशील मनाचा व सालस स्वभावाचा मुलगा होता. आमच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य रा.मो.साळवी यांची अध्यापक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी धडपड नेहमी सुरू असायची. त्यातीलच हस्तलिखित

भित्तिपत्रक ही कल्पना होती. या हस्तलिखित भित्तिपत्रकावर त्या वेळचे आमचे वर्गमित्र राजेंद्र उगले, रवींद्र साळी आदींच्या कविता झळकायच्या. त्यांचे कौतुक व अभिनंदन व्हायचे.

आबा आणि माझ्या मनात येथेच साहित्याचे पहिले बीज अंकुरले. शिक्षणशास्त्र विद्यालयातील याच प्रांगणात आमच्या मनावर साहित्याचा पहिला संस्कार झाला. मात्र तेव्हाचा प्रवास बराचसा बाळबोध होता. काय वाचायचं, कुठलं वाचायचं- या बाबतीत निश्चित अशी दिशा नव्हती; पण डी.एड.नंतर दोघांच्याही लिखाणाचा वेग वाढला आणि आम्ही आपापल्या साहित्यिक वाटाही निवडल्या. मी ग्रामीण साहित्याकडे वळलो, तर आबा बालसाहित्याकडे...

आबाने निवडलेली वाट अचूक होती, हे आता सिद्ध झाले आहे. कसा राहिला आबाचा साहित्य अकादमीपर्यंतचा प्रवास? तर, ही वाट निश्चितच सोपी नव्हती. आबाला कुठलाही शैक्षणिक, साहित्यिक वारसा नव्हता. घरची सगळी परिस्थिती अशा गोष्टींसाठी बिलकुलच अनुकूल नव्हती. जळगाव जिल्ह्यातील एरंडोलसारख्या आडवळणाच्या गावी एका शेतमजूर कुटुंबात त्याचा जन्म झाला. घरची परिस्थिती दारिद्र्याने भारलेली होती. सोबतच वृद्ध आई-वडील व भावंडांची जबाबदारी अंगावर येऊन पडलेली होती. आई लहानपणीच जग सोडून गेलेली. अशा परिस्थितीमुळेच आबाने शिक्षकी पेशा निवडलेला होता. त्या वेळी डी.एड. झाले की नोकरी लागायची. झालेही तसेच होते.

डी.एड. १९९४ मध्ये संपले आणि आबाला शिक्षकाची नोकरी मिळाली. जळगाव जिल्हा परिषदेमध्ये तो शिक्षक म्हणून रुजू झाला. शिक्षकाची नोकरी म्हटल्यावर आबाचे मुला-फुलांशी नाते कायम राहिले. चोपडा येथील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून झालेली साहित्यसंस्कारांची पेरणी शिक्षक म्हणून कार्य करताना फळाला आली. ग्रामीण भागातीलच विद्यार्थ्यांच्या मनोविश्वाशी तादात्म्य पावण्याची संधी आबाला चालून आली व तो मुलांच्या भावविश्वात रमायला लागला. सोबतच भा.रा.भागवत, न.म.जोशी, मंगेश पाडगांवकर, कल्याण इनामदार, शांता शेळके, विंदा करंदीकर, वि.वा. शिरवाडकर, वीणा गवाणकर आदी मान्यवरांच्या लेखनाच्या वाचनाचा सपाटा त्याने लावला.

अनेक नामवंत साहित्यिकांशी आबा पत्ररूपाने संवाद साधायचा. त्यांच्या आवडलेल्या साहित्याविषयी बोलायचा. स्वत: करत असलेल्या तोडक्या-मोडक्या काव्याविषयीही सांगायचा. अशा या पत्रसंवादातून, प्रत्यक्ष भेटीतून आबाचा मनःपिंड घडत गेला. सोबतच स्वतःची वेगळी वाट धुंडाळता आली. वाचनाने त्याच्या मनावर साहित्यिक संस्कार तर झालेच, शिवाय आपण कुठल्या दिशेने जायला हवे, हेही कळले. त्यातूनच वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण सुरू झाली. शब्दफुलांची ओंजळ भरून आबा साहित्यपंढरीच्या प्रवासाला निघाला.

सुरुवातीच्याच काळात आबाच्या कविता किशोर, गंमत जम्मत, टॉनिक, मुलांचे मासिक, निर्मळ रानवारा यांसारख्या प्रतिष्ठित नियतकालिकांतून, दिवाळी अंकांतून झळकू लागल्या. त्याच्या या लेखनप्रसिद्धीने व अनोख्या वाङ्मयीन शैलीने साहित्यविश्वाचे लक्ष वेधले. कोण हे नवे बालसाहित्यिक म्हणून वाचक चौकशी करू लागले. यानिमित्ताने अनेक जाणकारांच्या भुवया उंचावल्या गेल्या. एव्हाना आबाने आपला लेखन वारू उधळून दिलेला होता.

डी.एड. संपल्यापासून ते नोकरीची सुरुवातीची काही वर्षे... पाचेक वर्षांचा कालखंड लोटलेला होता. एवढ्या कमी कालावधीत आबाने साहित्यक्षेत्रात बालसाहित्यिक म्हणून दबदबा निर्माण केला होता. आपल्या प्रकाशित झालेल्या बालकविता त्याने महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडे पाठवून दिलेल्या होत्या. त्याच्या ह्या पहिल्या संग्रहास साहित्य संस्कृती मंडळाकडून अनुदान मंजूर झाले. आबाचा आनंद द्विगुणित झाला. आणखी दुग्धशर्करा योग म्हणजे पुण्याच्या ग म भ न या मान्यवर प्रकाशन संस्थेकडून तो संग्रह प्रकाशित झाला.

आबाचा बालकवितासंग्रह थाटात दाखल झाला होता. 'गमतीच्या राज्यात' असे त्याचे नाव होते आणि प्रकाशनवर्ष होते २००१... आबाचा हा पहिलाच संग्रह असला तरी पहिलेपणाच्या खुणा त्यात अजिबात नव्हत्या. सकस, दर्जेदार, नावीन्यपूर्ण, आशयघन शब्दकळा घेऊन आबा बालसाहित्यिक म्हणून दाखल झाला होता. प्रकाशक ल.म.कडू यांनी केवळ अनुदानावर अवलंबून न राहता सुंदर, सुबक, देखणी निर्मिती केली होती. आशयघन शब्दकळा आणि सुबक छपाई यांचा संगम झाल्याने हा संग्रह देखणा झाला.

पहिल्याच कलाकृतीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. सोबतच खूप चर्चा झाली होती. आतापर्यंतची बालकविता

पानाफुलांत रममाण होण्यात धन्यता मानत होती; मात्र आबाची शब्दकळा स्वतःची स्वतंत्र नाममुद्रा घेऊन आली होती. ती प्रत्यक्ष मुलांना गमतीच्या अनोख्या राज्यात (विश्वात) घेऊन जाण्यात यशस्वी ठरली होती. आबा महाजन यांचा काव्यप्रवास सुरू झाला. त्यानंतर त्यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. एकामागून एक कवितासंग्रह, कथासंग्रह, बालनाट्य, बालकादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.

तो काळ भारावलेला आणि मंतरलेला होता. निकोप स्पर्धा होती. शिवाय लिहित्या हातांना हमखास बळ दिलं जायचं. त्या कौतुकाचा आणि स्वागतशील मार्गदर्शनाचा धनी आबा ठरला होता. नव्यानेच लिहू लागलेल्या या लेखकाचे स्वागत जसे महाराष्ट्रभर होत होते. तशीच त्यांची वाङ्मयीन दखल गावाकडेही घेतली जात होती. त्या वेळी आबाच्या गावी एरंडोल येथूनच औदुंबर साहित्य चळवळ राबविली जात होती. या चळवळीचे पाठीराखे श्रीपाल सबनीस होते. तर वा.ना.आंधळे, म.ना.आंधळे, विलास कांतिलाल मोरे, प्राचार्य यशवंत पाटील आदी मंडळींचा सहभाग होता.

औदुंबर साहित्य मंचच्या माध्यमातून एरंडोल येथे विविध कार्यक्रम व्हायचे व उपक्रम राबविले जायचे. या उपक्रमांचा, वाङ्मयीन कार्यक्रमांचा, व्यासपीठांचा मोलाचा वाटा आबा गोविंदा महाजन हा साहित्यिक घडविण्यात राहिला. आबाच्या पहिल्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ एरंडोल येथील याच मंचावर मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला होता. त्याचबरोबर जळगाव येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखाही तेव्हा भरपूर कार्यक्रम घ्यायची. प्रा.नारायण शिरसाळे हे मसापचे जिल्हा प्रतिनिधी व शाखा अध्यक्ष होते.

नारायण शिरसाळे यांचा स्वभाव मृदू व सहकार्यशील होता. नवोदितांना त्यांचे मार्गदर्शन असायचे. त्यांचे स्वतःचे वीणा प्रकाशन होते. आबाच्या लेखनातील हरहुन्नरी पाहून शिरसाळे यांनी त्यांना प्रोत्साहन देत त्यांची 'मौजमजा' व 'रिमझिम गाणी' ही पुढील पुस्तके प्रकाशित केली. नारायण शिरसाळे हे जाणकार प्रकाशक होते, शिवाय धों.वे.जोगीगुरुजी हेही नावाजलेले बालसाहित्यिक जळगाव येथे होते. त्यांचेही मार्गदर्शन आबाला लाभले.

अशा प्रकारे आबा महाजन यांची साहित्यिक जडण-घडण होत राहिली. अनेक व्यासपीठांवरून त्यांना काव्यवाचनाची संधी मिळाली. विशेषतः मसाप जळगाव



'आबाची गोष्ट' हा वैशिष्ट्यपूर्ण बालकुमार कथासंग्रह आहे. २०१७ ला पुण्याच्या दिलीपराज प्रकाशनाकडून तो प्रसिद्ध झाला. या कथासंग्रहातील वैशिष्ट्यपूर्ण खानदेशी बोली व खानदेशी ग्रामसंस्कृतीचे अनोखे दर्शन लक्षवेधी ठरले. या संग्रहातील कथा नावीन्यपूर्ण आहेत. मुख्यत्वे शाळकरी मुलांच्या भावविश्वातल्या या कथा आहेत. संस्कार व बोधपर असे त्याचे स्वरूप आहे. प्रतिकूल अवस्थेत धडपडणारी, परिस्थितीशी दोन हात करणारी, प्रामाणिक, जिद्दी मुलांच्या या संघर्षकहाण्या आहेत. या कहाण्या आबा गोविंदा महाजन या नायकाच्याच आहेत. यातील गुरंढोरं आणि पुस्तक, आबाची गोष्ट, टोपननाव, बोकायकाला, शाळेतले दिवस ह्यासारख्या गोष्टींतून लेखकाचे आत्मचरित्र डोकावते. तर गारपीट, दोस्ती रामरहीमची यांसारख्या कथा प्रत्यक्ष अनुभवांवर बेतलेल्या आहेत. त्यामुळेच त्यांच्यामध्ये जिवंतपणा व तरल संवेदनशीलता दिसून येते. यातील सर्वच कथांना कथामूल्य आहे. खानदेशी बोलीतील संवाद व परिसरनिष्ठ निवेदन यामुळे या कथांना एक प्रकारची चित्रात्मकता प्राप्त होते, जी बालवाचकांसह सर्वांचेच लक्ष वेधून घेते.

आणि आकाशवाणी जळगाव यांनी त्यांच्या सादरीकरणाला पुरेपूर वाव दिला. जळगाव आकाशवाणी केंद्राचे संचालक सुप्रसिद्ध कवी बालसाहित्यिक उत्तम कोळगावकर, कार्यक्रम अधिकारी प्रतिमा जगताप यांच्या माध्यमातून अनेक कार्यक्रम आबांनी सादर केले. 'ऑपरेशन भोंदूबाबा' हे बालनाट्य आकाशवाणीवरून प्रसारित झाले व खूप गाजले.

दरम्यान, आबाने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवलेली होती. त्या माध्यमातून त्यांची नायब तहसीलदार म्हणून निवड झाली. त्यानंतर त्यांनी शिक्षकी पेशाला रामराम ठोकला व प्रशासकीय सेवेत रुजू झाले. असे असले तरी आबाच्या व्यक्तिमत्त्वातून साने गुरुजींचा शिक्षक कधी वजा झाला नाही किंवा त्यांच्यातील बालसाहित्यिकही लोप पावला नाही. नोकरीत झालेला बदल असेल किंवा प्रशासकीय सेवेतील ताणतणाव, आबांनी आपल्या वाङ्मयसेवेवर कधीही परिणाम होऊ दिला नाही. उलट, अधिक जोमाने ते कामाला लागले व पुढील काळात त्यांची पुढील पुस्तके प्रकाशित झाली.

बिस्किटचा बंगला, लई मज्जा रे, चिऊचा मोबाईल, वाघोबाची गांधीगिरी, गमतीदार खेळांचा खजिना, हिप हिप हुर्रे. यात बहुतेक कवितासंग्रह होते. बालकाव्य, कुमार काव्य, शिशुगीत, विनोदी बालकविता... पूर्वसुरींची वाट पुसत-पुसतच आबा महाजन यांचा बालसाहित्यिक म्हणून प्रवास सुरू होता. दरम्यान, बालसाहित्यातील त्यांच्या मुशाफिरीला दशकभराचा कालखंड लोटला होता. सुरुवातीचे नवखेपण संपले होते. पोक्तपणाकडे, साहित्यिक भूमिकेकडे आबाचे लक्ष गेले. अनेक परिसंवाद, व्यासपीठांवरील वावर व प्रदीर्घ अनुभव-चिंतनातूनही प्रगल्भता आली होती.

मग आबा महाजन यांची दुसरी इनिंग सुरू झाली होती. स्वतंत्र वाङ्मयीन प्रवाह निर्माण करण्याकडे त्यांची पावलं पडू लागली होती. आधीचा काहीसा रंजनात्मक बाळबोध विचार सोडून त्यांचे साहित्य प्रगल्भतेकडे झेपावू लागले होते. फास्टर फेणेसारखा 'ठोंब्या' हा नायक त्यांनी रुजविला. 'ठोंब्या' नावाची कादंबरी, 'टांगाटोली' नावाचा कथासंग्रह, यावर कडी म्हणून की काय त्यांनी 'मन्हा मामाना गावले जाऊ' हा खानदेशी अहिराणी बोलीतील स्वतंत्र कवितासंग्रह निर्माण केला. 'मन्हा गावले' व 'खानदेशी गाव' या अत्यंत दर्जेदार नावीन्यपूर्ण पुस्तकांची निर्मिती केली. हीच काय ती आबा महाजान यांची सर्वोत्तम कमाई.

याअगोदर साने गुरुजी, बहिणाबाई चौधरी, बालकवी यांच्या साहित्यातून खानदेश डोकावत होता. पण संपूर्ण खानदेशी बोली, खानदेशी संस्कृती बालसाहित्यात आणण्याचे काम आबा महाजन यांनी हिरीरीने केले. बालसाहित्यातील बोलीचा हा वावर नावीन्यपूर्ण ठरला. यात अधिकची भर पडली ती २०१७ मध्ये प्रकाशित झालेल्या 'आबाची गोष्ट' या कथासंग्रहाची. हा संग्रह तर अत्युच्च वाङ्मयीन मूल्यात्मकतेचा व प्रयोगशीलतेचा परमोच्च बिंदू ठरला. या संग्रहातील सर्वच कथा जिवंतानुभव देतात व स्वतंत्र रसरशीत कथन निर्माण करतात.

आबांच्या कथा, कविता अनेक मानसन्मान पुरस्कारांच्या धनी ठरल्या. विविध अभ्यासक्रमांत त्या सन्मानाने विराजमान झाल्या. महाराष्ट्र शासनाच्या पुरस्कारासह प्रतिष्ठेचे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. पण परवा जाहीर झालेल्या साहित्य अकादमीच्या बालसाहित्य पुरस्काराने खऱ्या अर्थाने त्यांच्या प्रयोगशील बालसाहित्य परंपरेचा गौरव झाला. खरं तर हा त्यांना मोठं करणाऱ्या साहित्यपरंपरेचा व खानदेशी संस्कृतीचा गौरव आहे.

एका शेतमजूर कुटुंबातील सालदाराच्या मुलाच्या नावाचा डंका यानिमित्ताने भारतवर्षात गाजला. त्यांची ही वाटचाल इथेच न थांबता जागतिक स्तरावर जावो, या मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि आबा गोविंदा महाजन यांचे पुनःश्च अभिनंदन करतो!


**अशोक कौतिक कोळी**

कूड, जामनेर, जि.जळगाव

Mob.9421568427



जरूर वाचा...

साधना प्रकाशनाकडून आलेले

अशोक कौतिक कोळी यांचे

स्वतःचे बालपण व त्या काळातील सभोवताल

यांचे चित्रण करणारे पुस्तक

**अशानं आसं व्हतं**

पृष्ठे १५०, किंमत : १५० रुपये

संपर्क : साधना प्रकाशन, पुणे

Ph : 020-24459635

वृषाली देहाडराय

# आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण
## (नव्या आकृतिबंधातील)

आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण याचा अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती ठरवण्याची जबाबदारी एन.सी.ई.आर्.टी. म्हणजेच शिक्षण मंत्रालयाची असेल आणि त्याची योग्य प्रकारे कार्यवाही करण्यासाठी महिला व बालविकास, आरोग्य व कुटुंबकल्याण आणि आदिवासी विकास विभाग या खात्यांबरोबर समन्वय साधला जाईल, असे म्हटले आहे. मुळात शासनाच्या कोणताही एका विभागाचे गाडे हाकायचे म्हणजे हत्ती चालवण्यासारखे आहे. यावर इतक्या सगळ्या विभागांचे कडबोळे करून ही उद्दिष्टे सन २०३० पर्यंत गाठायची म्हणजे, हत्तींच्या कळपाला मॅरेथॉनमध्ये पळवण्यासारखे आहे. एकंदर पाहता, आरंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाबाबत केलेल्या विविध शिफारशी जरी सयुक्तिक वाटल्या तरी त्या प्रत्यक्षात आणताना अनेक साधकबाधक बाबींचा विचार करावा लागणार आहे, तरच त्याची परिणामकारक अंमलबजावणी होईल.

भारतामध्ये प्राथमिक किंवा उच्च शिक्षणाशी तुलना करता, बालशिक्षण हे स्वातंत्र्यपूर्व काळापासून दुर्लक्षित क्षेत्र आहे. त्याचे कारण राज्यकर्त्यांची उदासीनता व बालशिक्षणाच्या महत्त्वाबाबत अज्ञान... यावरोबरच कदाचित बालकांच्या त्या काळातल्या आरोग्याच्या स्थितीशी संबंधित असावे. भारतामध्ये सन १९५० मध्ये बालमृत्यू दर होता १८९.६३ (दर हजारी). यापैकी अनेक बालके ही कुपोषणामुळे मृत्युमुखी पडत. जिवंत राहिलेल्या बालकांमध्येही कुपोषित बालकांचे प्रमाण लक्षणीय होते. त्यामुळे बालकांना शिक्षण देण्याआधी त्यांना जगवणे आणि सुदृढ बनवणे, याला जास्त महत्त्व दिले गेले. आत्तापर्यंत शासनाने नेमलेल्या काही समित्या व आयोग यांनी बालशिक्षणाच्या आवश्यकतेवर चर्चा केली असली, तरी बालशिक्षण हा पायाभूत अधिकार मानला गेला नाही. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण होण्यासाठी बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण आवश्यक आहे, याला जरी तत्त्वत: मान्यता मिळाली तरी शिक्षणहक्क कायदा २००९ यातून ३ ते ६ वर्षे वयोगट वगळला गेल्याने बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण प्रत्यक्षात घडणे दुरापास्त बनले. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये बालशिक्षणाचा साकल्याने विचार करून ३ ते ६ वयोगटातील बालकांना बदललेल्या आकृतिबंधामध्ये स्थान देणे हे निश्चितच एक महत्त्वाचे पाऊल आहे. पण केवळ बालशिक्षणाला राष्ट्रीय धोरणामध्ये स्थान मिळाले म्हणून त्यासंबंधी केलेली सर्वच मांडणी योग्य आहे, असे समजणे धाडसाचे होईल.

**संगोपन का शिक्षण?**

बालशिक्षणासंबंधी मांडणी ज्या प्रकरणामध्ये केली आहे त्या प्रकरणाचे नाव 'आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण' असे आहे. मात्र पुढे केलेली मांडणी ही मुख्यत्वे शिक्षणासंदर्भात आहे आणि फारच थोड्या गोष्टी

संगोपनाबाबत मांडलेल्या आहेत. मुळात जेव्हा ३ ते ६ वर्षे वयोगटातील संगोपनासंदर्भात आपण बोलतो, तेव्हा केवळ बालशाळेतील शिक्षक डोळ्यांसमोर ठेवून चालणार नाही. या वयोगटातील मुले जास्त वेळ पालकांबरोबर कुटुंबामध्ये असतात, तर फारच थोडा वेळ शिक्षकांबरोबर असतात. त्यामुळे पालकांचे प्रबोधन करण्यासाठीही काही कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. धोरणामध्ये 'पालक' हा घटक कुठेच लक्षात घेतलेला दिसत नाही. केवळ बालकांना माध्यान्ह भोजन देणे व लसीकरण करणे, या दोन बाबींचा उल्लेख करून संगोपनाचा विषय संपवलेला आहे.

बालकांच्या शाळापूर्व तयारीबद्दल धोरणामध्ये भाष्य केले आहे. कुटुंब, प्राथमिक शाळा आणि बालशिक्षक या तीन घटकांची भूमिका बालकाच्या शाळापूर्व तयारीमध्ये महत्त्वाची असते. यापैकी कोणत्याही एका घटकाने अपेक्षित कार्य केले नाही, तर बालकाच्या शाळापूर्व तयारीमध्ये कमतरता राहू शकते. त्या दृष्टीने पालकांना बालशाळा या यंत्रणेचा एक महत्त्वाचा हिस्सा आहेत, हे मानून त्यांच्या सक्षमीकरणाची व्यवस्था करणे गरजेचे आवश्यक आहे. पालकांच्या बाबतीत बोलायचे झाले तर बालवर्गामध्येच मुलांना धडाधड वाचायला व लिहायला यायला हवे, १ ते १०० ची अंक ओळख हवी- या प्रकारच्या त्यांच्या अपेक्षा असतात. जी शाळा या गोष्टी लवकरात लवकर शिकवेल ती शाळा चांगली किंवा जी शाळा मुलाची लेखी परीक्षा घेत असेल, भरपूर गृहपाठ देत असेल ती शाळा चांगली- अशा प्रकारचे समज पालकांमध्ये दिसून येतात. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, पालकांचे शिक्षण किंवा त्यांची पार्श्वभूमी शहरी किंवा ग्रामीण अशी काहीही असली तरी या बाबतीत त्यांच्या समान अपेक्षा दिसून येतात. त्यामुळे बालकाच्या विकासाचे टप्पे, त्यानुसार करून घेण्याच्या कृती आणि शाळापूर्व तयारी याबाबत पालकांचे प्रबोधन आणि शिक्षण करणे आवश्यक आहे. या बाबतीत खासगी शाळांमध्ये जाणाऱ्या बालकांच्या पालकांचा विचार होणे आवश्यक आहे. यामध्ये गृहभेटींचा समावेश करून बालक आणि पालक यांच्यामध्ये कशा प्रकारे आदान-प्रदान चालले आहे याचे निरीक्षण करून आवश्यक तिथे मार्गदर्शन केले जावे. याकरता अर्थातच बालवर्गाच्या शिक्षिकेबरोबरच बालशिक्षण कौशल्यप्राप्त अतिरिक्त कर्मचाऱ्यांची गरज भासणार. ही उद्दिष्टे खरोखरच २०३० पर्यंत गाठायची असतील, तर पालक या महत्त्वाच्या घटकाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

**बदललेला आकृतिबंध-**

नव्या धोरणाप्रमाणे वय वर्षे ३ ते ८ हा एक सलग टप्पा धरला जाऊन तो 'पायाभूत टप्पा' म्हणून ओळखला जाईल. आत्तापर्यंत भारतामध्ये ३ ते ६ वर्षे या वयोगट आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण यांचा मानला जायचा, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर ३ ते ८ वर्षे हा टप्पा आरंभिक बालसंगोपन व शिक्षणाचा मानला जातो. कारण मेंदू-संशोधनामध्ये असे दिसून आले आहे की, मेंदूची ९० टक्के वाढ वयाच्या ८ वर्षांपर्यंत होते. नव्या आकृतिबंधामध्ये इयत्ता पहिली व दुसरी यांचा समावेश बालशिक्षणाच्या ३ ते ६ वर्षे वयोगटाबरोबर पायाभूत टप्प्यामध्ये झाल्याने बालशिक्षणाच्या आंतरराष्ट्रीय मानकांनुसार भारतीय बालकांची वर्गवारी झाली. त्याचा एक फायदा असा आहे की- पहिली व दुसरी या वर्गातील बालकांना औपचारिक पद्धतीने शिक्षण न मिळता बालशिक्षणाच्या खेळ व कृतीवर आधारित आणि तुलनेने जास्त लवचिकता असणाऱ्या पद्धतींनी शिक्षण मिळू शकेल.

**आरंभिक साक्षरता व अंकगणित-**

आरंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाची आठ विविध क्षेत्रे मानली जातात- शारीरिक विकास, भावनिक विकास, सामाजिक विकास, भाषाविकास, वाचन, लेखन व गणन सिद्धता व व्यक्तिमत्व विकास. या आठ क्षेत्रांच्या विकासासाठी बालशाळेमध्ये व कुटुंबामध्ये विविध संधी उपलब्ध करून दिल्यास बालक आपोआपच पहिल्या वर्गामध्ये जाण्यासाठी 'तयार' होते. बालविकासाच्या दृष्टीने या सर्वच क्षेत्रांचे समान महत्त्व आहे. यापैकी कोणतेच क्षेत्र कमी किंवा जास्त महत्त्वाचे नाही. त्यामुळे या सर्व क्षमता विकसित होण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यापैकी केवळ काही क्षेत्रे महत्त्वाची मानून फक्त तीच विकसित होण्यावर भर दिल्यास बालकाचा सर्वांगीण विकास घडून येणार नाही. धोरणामध्ये जरी ही सर्व क्षेत्रे नोंदवलेली असली तरी पुढे जाऊन मुळाक्षरे, भाषा, संख्या, मोजणी या घटकांना जास्त महत्त्व दिल्याचे दिसून येते. केवळ याच प्रकरणामध्ये नाही, तर जवळजवळ पूर्ण दस्तावेजामध्ये भाषा आणि गणित यांच्याशी निगडित घटकांचा वारंवार उल्लेख केल्याचे दिसून येते. प्रथम संस्थेतर्फे दर वर्षी केले जाणारे 'असर' आणि इतर अनेक अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, तिसरी-

चौथीतील मुलांनाही वाचन किंवा सोपी गणिते तर करता येत नाहीच, पण अनेक मुलांना साधे संख्याज्ञान किंवा अक्षरओळखही नाही. त्यामुळे या घटकांवर पूर्ण धोरणामध्ये आरंभिक साक्षरता व अंकगणित यावर खूप भर दिलेला दिसून येतो. या क्षमता सर्वच मुलांमध्ये योग्य वेळी विकसित करण्याची आवश्यकता असली तरी यामध्ये एक धोका संभवतो. या दोन गोष्टींकडे गांभीर्याने बघण्यामध्ये विकासाच्या तितक्याच महत्त्वाच्या क्षेत्रांकडे पालक व पर्यायाने शिक्षकांचे दुर्लक्ष होण्याची शक्यता आहे. धोरणामध्ये केलेल्या मांडणीनुसार सामाजिक क्षमता, संवेदनशीलता, चांगले वर्तन, नैतिकता यांसारख्या गोष्टींना दुय्यम स्थान दिल्यासारखे वाटते. मुळातच अनेक पालक आपल्या मुलांना बालवर्गातच लेखन-वाचनाचे धडे द्यावेत म्हणून आग्रह धरतात. त्यामुळे अनेक बालशाळांमध्ये गणन-वाचन-लेखन सिद्धता किंवा आरंभिक साक्षरतेऐवजी औपचारिक वाचन, लेखन व गणित शिकवण्याचा अट्टहास केला जातो. भाषिक-गणिती सिद्धता/आरंभिक साक्षरता आणि लेखन-वाचन-गणित या क्षमतांमध्ये फरक असला तरी तो लक्षात न घेता, बालकांना औपचारिक ३ R च्या दावणीला उघडपणे बांधली जाण्याची शक्यता वाढते. यामुळे बालकांचा विकास असंतुलित व एकांगी होऊन त्याचा त्यांच्यावर अतिरिक्त ताण येईल.

**अभ्यासक्रम व पायाभूत सुविधा –**

एनसीईआरटीला ० ते ३ व ३ ते ८ वर्षे या वयोगटांसाठी अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी दिली आहे. सध्या आरंभिक बालशिक्षण व संगोपन या क्षेत्रामध्ये अनेक खासगी संस्था काम करत आहेत. या संस्थांमधून दिल्या जाणाऱ्या बालशिक्षणावर कोणतेच शासकीय नियंत्रण नाही. शिक्षणहक्क कायदा हा फक्त ६ ते १४ वर्षे या वयोगटासाठीच असल्यामुळे त्या खालच्या वयोगटासाठी जरी अभ्यासक्रम तयार झाला तरी खासगी संस्था या कोणत्याच प्रकारे शिक्षण विभागाशी संलग्न नसल्यामुळे हा अभ्यासक्रम केवळ शासन-नियंत्रित बालवाड्या व अंगणवाड्या यांच्यापुरताच मर्यादित राहील. नव्या अभ्यासक्रमाचा लाभ सर्व बालकांना मिळण्यासाठी शिक्षण हक्क कायद्याची व्याप्ती वाढवून तो वय वर्षे ३ पासून लागू होण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे जर ० ते ३ वर्षे वयोगटासाठी अभ्यासक्रम तयार होणार असेल, तर तो राबवण्यासाठी पालकांचीच मदत



घ्यावी लागणार. पालक या विषयाबाबत धोरणात काहीच भाष्य नाही.

या धोरणामध्ये अंगणवाड्यांकरता योग्य त्या पायाभूत सुविधा पुरवण्याचे सूतोवाच केले आहे, हे स्वागतार्ह आहे; पण त्याचबरोबर खासगी बालशाळांमध्ये या प्रकारच्या सुविधा आहेत की नाहीत, हे बघण्याची जबाबदारी कोणाची? इथे पुन्हा या संस्था शासनाच्या कक्षेबाहेर येत असल्याने या सुविधा सर्व संस्थांमध्ये उपलब्ध केल्या जातील याची काहीच खात्री नाही.

**शाळासंकुले व अंगणवाडी –**

धोरणामध्ये शाळासंकुले ही संकल्पना मांडली आहे. त्यानुसार काही सुविधा व विषय शिक्षक यांचा फायदा अनेक शाळांना मिळावा, हा उद्देश ही संकुले सुरू करण्यामागे आहे, असे म्हटले आहे. या संकल्पनेच्या योग्यायोग्यतेची चर्चा करणे हा या लेखाचा उद्देश नाही, तर शाळा–संकुलामध्ये अंगणवाडीचाही समावेश असेल असे धोरण सांगते. या विधानामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. सध्या अंगणवाडीसेविका जरी थेट एकात्मिक बालविकास या विभागाशी संबंधित असली, तरी इतर विभागांशी निगडित संबंधित अनेक प्रकारची माहिती अंगणवाडीसेविकेला जमा करावी लागते, असे काही सर्वेक्षणांमध्ये दिसून आले आहे. शाळासंकुलांच्या संकल्पनेबाबत असे म्हटले गेले आहे की, या बदलानुसार सेविकेला एकात्मिक बालविकास विभागाव्यतिरिक्त शिक्षण विभागालाही उत्तरदायी राहावे लागेल. प्रत्यक्षात त्यांना केंद्रप्रमुखांकडून–शिक्षकांकडून किती प्रमाणात मार्गदर्शन उपलब्ध होईल, हा भाग अलाहिदा; मात्र अनेक प्रकारची आकडेवारी शिक्षण खात्यालाही पुरवावी लागेल, हे निश्चित. मुळात शिक्षण विभागातील केंद्र व एकात्मिक बालविकास प्रकल्पातील बीट या दोन विभागांचे प्रशासनिक स्तर सारखे नसतात. म्हणजे त्यामध्ये अंतर्भूत होणारी गावे किंवा वस्त्या एकच नसतात. त्यामुळे एका एकात्मिक बालविकास प्रकल्पातील एका पर्यवेक्षिकेकडे असणाऱ्या अंगणवाड्यांचा समावेश शिक्षण विभागाच्या दोन वेगवेगळ्या केंद्र किंवा संकुलांच्या अखत्यारीमध्ये येण्याची शक्यता आहे. यामुळे प्रशासनिक गोंधळ निर्माण होण्याची संभावना वाढते.

**पहिली प्रवेशाचे वय व बालवाटिका –**

या पूर्ण धोरणामध्ये पहिली प्रवेशाच्या वयाबद्दल कोणतेही भाष्य कुठेही केलेले नाही. सध्या प्रत्येक राज्यामध्ये पहिली प्रवेशाचे वय वेगवेगळे आहे. पहिल्या इयत्तेच्या प्रवेशाच्या आधीचे वर्ष हे बालवाटिका किंवा प्रिपरेटरी क्लासचे असेल, असे म्हटले गेले आहे. जर प्रत्येक राज्यामध्ये हे वय वेगवेगळे असेल, तर बालवाटिकेमध्ये जाण्याचे नेमके वय कोणते? ही बालवाटिका प्राथमिक शाळेमध्ये असेल असे म्हटले आहे. जर बालक प्राथमिक शाळेच्या परिसरामध्ये राहात असेल तर त्याला बालवाटिकेमध्ये येणे सोपे पडेल. पण जर ते वाडी–वस्तीवर राहत असेल व आधी तिथल्या अंगणवाडीमध्ये जात असेल, तर ५ वर्षे वयाच्या बालकाला दूर अंतरावरून चालत जाऊन प्राथमिक शाळेत भरणाऱ्या बालवाटिकेमध्ये हजेरी लावणे अवघड आहे. विशेषत: दुर्गम भागामध्ये ही गोष्ट जास्त अवघड बनते. एकात्मिक बालविकास कार्यक्रमामध्ये अंतराची जी मानके दिली आहेत, त्याप्रमाणे घरापासून अर्ध्या किलोमीटर अंतरावर अंगणवाडी असणे आवश्यक आहे. वाडी–वस्तीपासून प्राथमिक शाळेचे असणारे अंतर हे अनेक ठिकाणी या मानकाला छेद देते. पुन्हा खासगी शाळांमध्ये या बालवाटिका असणार आहेत का, हा प्रश्न शिल्लक राहतोच. बालवाटिकेमध्ये प्राथमिक शाळेतील शिक्षक शिकवणार आहेत. त्यामुळे या सर्व शिक्षकांना बालशिक्षणविषयक शिक्षण देणे आवश्यक आहे. इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये शिक्षकांना प्रशिक्षित करणे, हे एक मोठे आव्हान असणार आहे.

आरंभिक बालसंगोपन व बालशिक्षण न मिळाल्यामुळे पहिल्या इयत्तेमध्ये प्रवेश घेतल्यावर अनेक बालके पहिल्या काही आठवड्यांमध्येच मागे पडतात, असे धोरण सांगते. सर्व मुलांना औपचारिक शिक्षण घेण्यास तयार करण्यासाठी पहिलीतल्या मुलांसाठी 'शाळा तयारी मॉडेल' तयार केले जाईल, असे म्हटले आहे. जर याच कारणाकरता बालवाटिका असणार आहेत, तसेच सर्व बालकांना संगोपन व शिक्षण कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेतले जाणार असेल; तर या मॉडेलची काय आवश्यकता आहे? याचाच अर्थ धोरणकर्त्यांना हा विश्वास वाटत नाही का– की आपल्या शिफारशी कार्यान्वयित होतील. म्हणजे बालवाटिका यशस्वी ठरल्या नाहीत, तर निदान शाळा तयारी मॉडेल तरी यशस्वी ठरेल, या आशेने ही शिफारस केली आहे असे वाटते. पण यामुळे कोणत्याच शिफारशीवर

एकाग्रचित्ताने काम होणार नाही, शिवाय मुळातच अपुरा असणारा निधी एकच उद्दिष्ट असणाऱ्या विविध तरतुदींवर खर्च करावा लागल्याने कमी पडेल.

**अंगणवाडीसेविकेचे शिक्षण व व्यावसायिक प्रगती –**

आरंभिक बालशिक्षणाला महत्त्व मिळाल्यामुळे साहजिकच अंगणवाडीसेविकेच्या शिक्षणाचा मुद्दा उपस्थित होतो. हे प्रशिक्षण तंत्रज्ञांच्या मदतीने दूरशिक्षण पद्धतीने करण्यात येईल, असे म्हटले आहे. मुळातच लहान बालकांना कसे शिकवायचे याचे शिक्षण प्रत्यक्ष अनुभूती न देता दूरशिक्षण पद्धतीने करणे योग्य नाही. शिवाय इंटरनेटचा वेग, दुर्गम प्रदेशातील उपलब्धी, स्मार्ट फोन व इंटरनेटचा खर्च आणि अंगणवाडीसेविकांना मिळणारे मानधन याचे गणित जमायचे कसे? आंतरराष्ट्रीय स्तरावर विचार करता भारतामध्ये इंटरनेटच्या वापराचे दर कमी आहेत, हे मान्य करूनही त्याची पोहोच व अंगणवाडीसेविकेची क्रयशक्ती यांचा विचार व्हायला हवा. मुळातच अंगणवाडीसेविकेला सक्षम करणे ही शासनाची जबाबदारी असताना त्यासाठी लागणाऱ्या सर्व सुविधा पुरवणे ही शासनाचीच जबाबदारी असायला हवी. गावपातळीवर अंगणवाडीसेविकेला शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख मार्गदर्शन करणार असतील, तर त्यांनाही बालशिक्षण पद्धतींमध्ये सक्षम करणे आवश्यक आहे. बहुतांश केंद्रप्रमुख हे डी.एड्. ही व्यावसायिक पात्रता असणारे आहेत. डी.एड. अभ्यासक्रम हा मुख्यत्वे प्राथमिक शाळेतील बालकांना शिकवण्यासाठी लागणारी कौशल्ये डोळ्यांसमोर धरून तयार केलेला असतो. त्यामुळे या केंद्रप्रमुखांनादेखील विशेष प्रशिक्षण द्यावे लागणार.

धोरणामध्ये शाळेतील शिक्षकांच्या व्यावसायिक प्रगतीबाबत भाष्य करून त्याची योजना दिली आहे. मात्र बालशाळेतील शिक्षिका किंवा अंगणवाडीसेविका यांच्या व्यावसायिक प्रगतीसाठी काहीच दिशा दाखवलेली नाही. एकीकडे आरंभिक बालसंगोपन व बालशिक्षण हे देशाच्या एकंदर प्रगतीच्या दृष्टीने कसे महत्त्वाचे आहे ते अधोरेखित करायचे आणि दुसरीकडे त्यासाठी महत्त्वाची भूमिका असणाऱ्या बालशिक्षिकेबाबत मात्र उदासीनता दाखवायची हा विरोधाभास प्रगतीला मारक आहे. जर बालशिक्षिकेला योग्य त्या सेवाशर्ती नसतील, प्रगतीची दारे खुली नसतील आणि आर्थिक सुरक्षितता नसेल, तर ती तिच्या कामाला न्याय देऊ शकेल का, याचा प्रामाणिक विचार व्हावा. या पूर्ण धोरणामध्ये शिक्षणावर सकळ राष्ट्रीय उत्पादनाच्या ६ टक्के रक्कम खर्च व्हावी, हे विधान वगळता आर्थिक बाबींवर फारशी चर्चा केल्याचे दिसत नाही. जर विविध तरतुदींसाठी आवश्यक ते आर्थिक नियोजन नसेल, तर धोरणामध्ये मांडलेल्या शिफारशी प्रत्यक्षात येण्याची शक्यता फारच कमी आहे.

**आश्रमशाळेतील बालशिक्षण –**

आश्रमशाळेमध्ये आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन व बालशिक्षणाची सोय करणार, असे धोरण सांगते. अनुसूचित जमातीतील मुलांच्या शिक्षणासाठी चालवण्यात येणाऱ्या निवासी शाळा म्हणजे आश्रमशाळा. सहा वर्षे वयाच्या खालच्या मुलांना आश्रमशाळेमध्ये ठेवणे हे त्या वयाच्या गरजा बघता योग्य नाही. या वयातील मुलांना कुटुंबाची जास्त गरज असते. इतके लहान मूल कुटुंबापासून दूर ठेवल्यास त्याचा विपरीत परिणाम त्याच्या विकासावर होईल. याबाबत पुनर्विचाराची गरज आहे.

**प्रशासनिक समन्वय –**

आरंभिक बाल्यावस्थेतील संगोपन आणि शिक्षण याचा अभ्यासक्रम व शिक्षणपद्धती ठरवण्याची जबाबदारी एन.सी.ई.आर.टी. म्हणजेच शिक्षण मंत्रालयाची असेल आणि त्याची योग्य प्रकारे कार्यवाही करण्यासाठी महिला व बालविकास, आरोग्य व कुटुंबकल्याण आणि आदिवासी विकास विभाग या खात्यांबरोबर समन्वय साधला जाईल, असे म्हटले आहे. मुळात शासनाच्या कोणताही एका विभागाचे गाडे हाकायचे म्हणजे हत्ती चालवण्यासारखे आहे. यावर इतक्या सगळ्या विभागांचे कडबोळे करून ही उद्दिष्टे सन २०३० पर्यंत गाठायची, म्हणजे हत्तींच्या कळपाला मॅरेथॉनमध्ये पळवण्यासारखे आहे!

एकंदर बघता, आरंभिक बाल्यावस्थेतील शिक्षणाबाबत केलेल्या विविध शिफारशी जरी सयुक्तिक वाटल्या तरी त्या प्रत्यक्षात आणताना अनेक साधकबाधक बाबींचा विचार करावा लागणार आहे, तरच त्याची परिणामकारक अंमलबजावणी होईल. आपल्याला जर खरोखरच आपल्या प्रचंड लोकसंख्येचा निव्वळ भार न होऊ न देता त्याचे रूपांतर लाभांशामध्ये करायचे असेल, तर उत्तम दर्जाचे बालशिक्षण देण्याव्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही.

**डॉ. वृषाली देहाडराय**
सहायक प्राध्यापक, भारतीय शिक्षण संस्था, पुणे
vrushalidray@gmail.com
Mob. 9850899204

मधु जामकर

# वठलेल्या झाडाखाली...

वठलेल्या झाडाखाली नव्या पालवीचा शोध घ्यायचा नसतो तर त्याला मानवी रंग द्यायचा असतो. आजूबाजूच्या पाला-पाचोळ्यात तक्रार न करता तडजोड साधायची असते. 'सुख-दुःखे समे कृत्वा' हे अंगात मुरवायचे असते. आपल्या स्वातंत्र्याला क्षितिजसमांतर पाहायचे असते. जगाचे चक्र सतत फिरते असते. कुणालाच ते रोखता येत नाही, तसेच कुठे व किती फिरते ते सांगता येत नाही. त्यामुळे कुठे केव्हा थांबते, हे कोडे अजूनही सुटले नाही. अति पिकले म्हणजे फळ नासून जाते, त्याचे अध:पतन केव्हा होईल हे ध्यानी-मनी नसते. निसर्गातला अनुक्रम पाहता येतो, मोजता येतो; मात्र स्वत:चे वातचक्र अजमावता येत नाही. आशा-निराशेच्या खेळात कुठे लपायचे, कुठे सापडायचे याचे अज्ञान कुरवाळीत रहायचे. हाव सुटत नाही, घाव सोसत नाही आणि धाव मिटत नाही- हीच शिल्लक सांभाळायची असते.

वैद्यनाथाची परळी ही माझ्या अध्यापनाची कर्मभूमी. या नगरीतच माझ्या पंच्याहत्तरीनिमित्त माझ्या विद्यार्थ्यांनी व नागरिकांनी मोठा कार्यक्रम घडवून माझा सत्कार केला. यात अनेक ठिकाणांहून माझे कौतुक व शुभेच्छा दर्शन घडले. मी निवृत्त झाल्यानंतरही याच गावी जवळपास पंधराहून अधिक वर्षे म.सा.प. शाखेच्या वतीने व इतर संस्थांच्या सहकार्याने अनेक वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्यक्रमांत हातभार लावला. इथेच धावपळीत माझे पिकलेले म्हातारपण नवनवे रंग दाखवू लागले. पालवीने मोहारलेल्या वृक्षाकडून वठलेल्या झाडाखाली सावली घेत जगत राहिलो. पुढे या वठलेल्या झाडाच्या मुळ्या कुरवाळीत माझे पुढचे जगणे उजळू लागले. म्हातारपण हे कोरांटीचे खुरटे झाड आहे. कविवर्य तांबे यांनी याच झाडाच्या आठवणीत या झाडापासून गळणारा मध रसिकांना प्रत्यही दिला. पुढे त्यांनी त्यातून पुन्हा ४०-४५ भरलेले 'मधुघट' रसिकांना बहाल केले. इथेच आसक्ती व अनासक्तीचा रंगलेला नाटकी खेळ पुन:पुन्हा आठवत नोंदवत मी जगत आहे. खऱ्या हाडाच्या अध्यापकाची निवृत्ती ही क्षणभराची असते. याचे कारण अध्यापन ही वृत्तीच असल्याने ती सावलीसारखी त्याला जपते. अशा वेळी या निवृत्तीला नव्या नाटकाचे रंग अंगावर चढवायचे असतात. त्यातूनच जुने-नवे भोग भोगायचे असतात, तर आपले केलेले कर्म मागे वळून पुढे गिरवायचे असते. या म्हातारपणी आपल्या जगण्याचा खरा धागा 'सुटे वाद संवाद तो हितकारी' असा हमरीतुमरीवर दाखवायचा असतो. इथे नाती जुळतात, पुन्हा तुटतात. म्हातारपण मात्र या नात्यांना जुळविताना आपली त्रेधा उडवून जाते.

म्हातारपण 'अंतरंगी नाना कळा' उजळून देते. समर्थ रामदासांच्या शब्दांत सांगायचे झाल्यास 'मृत्तिका खाणोनि घर केले। ते माझे ऐसे दृढ कल्पिले। परि ते बहुतांचे हे कळले। नाही तयासि।' आणि दुसरे 'पूर्वी देव नाही पूजिला। वैभव देखोनी भुलला। सुखी प्राणी पस्तावला। वृद्धपणी।'

(दासबोध, समास ३) तरीसुद्धा आटापिटा करण्यात आपण कुठेही कमी पडत नाही. म्हातारपण हे अनेक कडव्यांनी बांधलेल्या 'जरा मरण व्याधीं'च्या एका गाण्याची मध्यवर्ती कल्पना असते. त्याला आपल्या परी गाण्याची सम गाठायची असते, तसेच यातील कडव्याशी आपले नाते सांधायचे असते. टप्प्याटप्प्याच्या वाटचालीत मृत्यूच्या पावलाची वाट पाहायची असते. त्याची चाहूल लागताच मानवी जगतातील सर्व लागेबांधे मोठ्या धीराने तोडून, माया-ममतेचा त्याग करून, ममत्वशून्य नि:संगपणे व समाधानाने जगाचा निरोप घ्यायचा असतो. हा तारेवरच्या कसरतीचा खेळ आहे. तो प्रत्येकाच्या वाट्याला येणारा असला तरी तो काळजीपूर्वक खेळायचा असतो. त्यातले सामान्य-असामान्य रूप सांभाळायचे असते. आपण फक्त एक लक्षात ठेवायचे- या सर्व परिस्थितीचे स्वागत करण्यास सज्ज राहण्याची वृत्ती म्हणजे म्हातारपण होय. त्यात मानवी जीवनाचा अंत, आत्यंतिक वियोग, सौंदर्य व वैभवाची क्षणभंगुरता लक्षात ठेवून मनात पिंजत ठेवायची असते. यात आपल्या उरलेल्या रागाची शून्यता नसून ती एक पूर्णता व सद्‌गती आहे. तो आपल्याकडे धावून आलेला आनंदाचा क्षण आहे. त्यात भाग्यविलास असून दुर्दैवविलास नाही. आपले हे अंतर्मुखी दर्शन अनावर उत्कंठा वारंवार वाढवणारे आहे. इथे तुम्ही बहिर्मुखतेच्या हावरेपणातून बाहेर येत एकटेच उरलेले असता. हेच एके काळी अनुभवलेले प्रणयासक्तीचे व भावुकतेने सर्वत्र झिडकारलेले पुन:प्रत्ययाचे जगणे राहते. तसेच ते म्हातारपणीच्या गीताचे शेवटच्या कडव्यातील आत्मानुभूतीचे गायिलेले गीत असते. डोळ्यांनी जी चित्रे-विचित्रे दिसतात, त्यात प्रणयासक्तीने धुंद झालेल्या लावण्यवतीच्या कळा आकर्षण निर्माण करतात. यात माझे पूर्ण जीवन आणि सहजीवन एकरूप झालेले असते. एरवी माझ्यापासून इष्ट, मित्र, आप्त हे सारे पांगलेले असतात. माझे एकटेपणदेखील एकाकीपणात अंतर्मुख झालेले असते. माझ्या एका हातात कृतज्ञता व दुसऱ्या हातात अंतर्मुखता अद्वैताच्या ओंजळीत ओसंडून वाहते, तितकीच ती पुन्हा रिकामीही होते. मला वाटते, ऐहिक पातळीवरचे सारे संघर्ष कणाकणाने, क्षणाक्षणाने मिटून जातायत.

म्हातारपण म्हणजे केवळ तोल सांभाळणे, तसेच ते एका संवेदनाक्षम ताटस्थ्याला पूर्णविराम नसते. ती एका उणावल्या गर्दीची आणि गुणावलेल्या एकाकीपणाची गाठ असते. म्हातारपणी आपण वठलेल्या झाडाखाली 'विसरले' आणि 'आठवले' या दोन गाठीने आपल्या दैवाचे गाठोडे बांधीत असतो. याच वयात सकाळची वाढीव उन्हे खात दुपारच्या अजीर्ण न होण्याकडे येणे-जाणे करायचे असते. अंगावरच्या सुरकुत्या मोजत बसायचे असते. थंडीमुळे वाढलेला गारवा सतत अंगाला झोंबणार नाही याची काळजी घ्यायची असते. ढगाळ वातावरणात भैरवी आळवीत मी-तूपणाची बोळवण करायची असते. जन्मभर कपड्याची ठिगळे लावीत केलेली पासोडी उबदार झाली का, याचे उत्तर शोधायचे असते. आपले जगणे 'मातीवर एक थर नवा अंतीची' किमया साधणे आहे. वातावरणात उल्हास नसल्याने आपल्या चैतन्याची ती दाणादाण उडवून देते. म्हातारपण हे भूतकाळातले परतून आलेल्या निष्पापाला बोलावलेले बालपण असते. त्याला निरागसतेच्या अंगाने, वाहत्या झऱ्याप्रमाणे वर्तमान जगायचा असतो आणि भविष्याच्या वाटेवर आयुष्य खेळकर वृत्तीने रमवायचे असते. इथेच मैत्र जपताना जीव घेणारे व जीव देणारे कोण, हे समजून घ्यायचे असते. त्यांना वाट गवसणे, वाट पाहणे व वाट लागणे यांचे गणित समजून घ्यायचे असते.

ना.सी.फडके यांनी विस्मरणाचे फायदे वर्णन करताना विद्यार्थ्यांना परीक्षेत नव्या खुणा करून दिल्या आहेत. म्हातारपणीचे विस्मरण 'प्रतिभा साधना'ची नव्याने वाट पाहात, जगण्याचा उलटा-सुलटा पाढा वाचीत आपली रोजची सायंकाळ उजळीत आहे. तोच कित्ता प्रसिद्ध लघुनिबंधकार अनंत काणेकरांनी गिरवला आणि म्हातारपणाला विस्मरणाचा केंद्रबिंदू मानून जणू काही आपल्या जगण्याचे स्तोत्र गायिले. इथे ग्रंथसंग्रह गवसणे हा एक सुखद अनुभव, तसेच तो वाचण्याच्या आवर्तनात सापडणे हा रोजचा कार्यक्रम असतो. आपले वर्तमान काळातले आणि भूतकाळातले तसेच भविष्यकाळातले म्हातारपण परस्पर एकमेकांच्या कोसो मैल धावणारे असून ते आपल्या संगमाला विसरत जाणारे झाले आहे. दुर्गाबाई भागवतांना आपले म्हातारपण हे लीन पण सायंसाज चढवलेले दिसते. तो मरणाला बोलावणारा आणि थोपणारा नवा साज वाटतो. या वयात लेखणीला वळणदार वळणावर आणायचे असते. आपल्या लेखणीला मंद ज्योतीमधून जळत ठेवायचे असते, तसेच भडका उडणार नाही ना याची दक्षताही घ्यायची असते. संत तुकारामाला पडलेले 'सोयरे धायरे दिल्या घेतल्याचे' याचे कोडे म्हातारपणी अजूनही उलगडत नाही. अभ्यासात आपण काय विसरलो आणि कुठे

घसरलो, हे समजत नसल्याने लहान मुलांचा नवा अभ्यास घेण्यातली आपली तारांबळ पाहावत नाही. ज्या घरात आपण लहानाचे मोठे झालो, त्या नव्या घरात जाताना वाल्मीकींऋषीचा आश्रम सुना-सुना कसा झाला असेल याचा ध्यास घेत असतो. हा एका डोळ्यातून पाणावलेल्या नजरेचा उत्सव असतो. इथेच कोरडेपणाच्या सांत्वनाला वाव नाही. म्हातारपण हे कुठेही 'रिझर्व्ह' असून बिनतक्रारीचे राहते. आपल्या घरात 'असून अडचण नसून खोळंबा' याचा पुन:प्रत्यय आल्याने म्हातारपण हे वेळीच शहाणपण घेत आपल्या अंतरंगांच्या सोईच्या कळा दाखवू पाहते.

वठलेल्या झाडाखाली नव्या पालवीचा शोध घ्यायचा नसतो तर त्याला मानवी रंग द्यायचा असतो. आजूबाजूच्या पाला-पाचोळ्यात तक्रार न करता तडजोड साधायची असते. 'सुख-दु:खे समे कृत्वा' हे अंगात मुरवायचे असते. आपल्या स्वातंत्र्याला क्षितिजसमांतर पाहायचे असते. जगाचे चक्र सतत फिरते असते. कुणालाच ते रोखता येत नाही, तसेच कुठे व किती फिरते ते सांगता येत नाही. त्यामुळे कुठे केव्हा थांबते, हे कोडे अजूनही सुटले नाही. अति पिकले म्हणजे फळ नासून जाते, त्याचे अध:पतन केव्हा होईल हे ध्यानी-मनी नसते. निसर्गातला अनुक्रम पाहता येतो, मोजता येतो; मात्र स्वत:चे वातचक्र अजमावता येत नाही. आशा-निराशेच्या खेळात कुठे लपायचे, कुठे सापडायचे याचे अज्ञान कुरवाळीत रहायचे. हाव सुटत नाही, घाव सोसत नाही आणि धाव मिटत नाही- हीच शिल्लक सांभाळायची असते. लांब पल्ल्याच्या गाडीत बसल्यानंतर आपले स्टेशन कोणते? तिथे उतरताना पुढचे स्टेशन आठवून चालायचे. एवढेच. चालत्या गाडीत प्रश्न पडतो- आपण इथपर्यंत तरी सुरळीत आलो का? एरवी धावणे, दमून थांबणे, धाप बाजूला सारून श्वास घेणे... म्हातारपणाला हा क्रम सोसत नाही. फक्त बुरखा पांघरायचा असतो. उसणे अवसान परवडत नाही, थकल्याचे सोंग करता येत नाही.

मानवी शरीर रज, तम, सत्त्व गुणांनी जखडलेले असते. त्यातच विचार-विकार आणि आकार यांना त्यांनी ग्रासलेले असते. आपल्या सोईनुसार आपल्या अंगच्या त्रिगुणांची विभागणी करता येत नाही. जर केली तर सत्त्व गुणाचे अपरिहार्य ठिकाण म्हातारपण आहे. आपण अशा परिस्थितीत जगण्याचे व्रत घेतो आणि मरणाकडे पाठ फिरवितो. या लपंडावात आपली दमछाक होते. त्यातील वृत्ती आणि निवृत्ती यांचा खेळ आपण कधी जिंकतो व कधी हरतो याचा ठिकाणा लागत नाही. म्हातारपण हे राजकारणी पुरुष असते. जेवढे रंग शोभून दिसत नव्हते, ते आता उजळले जातात. राजकारणी आपल्या अनुभवसिद्ध परिपक्वतेची सीमारेषा ओलांडताच बाहेर फेकले जातात. इथे म्हातारपण अजिंक्य असल्याचा काही उपयोग नसतो. आपली चिंतनमग्नता आणि चिंता व मग्नता हे प्रमुख पैलू म्हातारपणाचे नवनवे उन्मेष असतात. ते पाहताना नव्या वठलेल्या झाडावर पाखरे येत नसतात याची ओळख, सतत टोचत असते. अशा वेळी दुरून डोंगर साजरे होताना पाहात पुन्हा पुन्हा हरतो.

म्हातारपण हे केवळ सत्त्वशील न होता, त्यात रजोतम गुणांची आपल्या नकळत सरमिसळ होऊन त्यातली नेमकी सत्त्वशीलता बाजूला पडते. याबाबत सर्व संत धीर देतात, आधार देतात. संत रामदासांनी जगण्याची जीवनशैली अचूक पद्धतीने सांगितली आहे. या शैलीचा आलेख टिपताना कुठेही आपला तोल जाऊ दिला नाही. शिवाय आजचे कठोर वास्तव आणि आपली होत असलेली दैनंदिन तडफड या संताला मागे करते. रामदासांनी ज्या काळात हा आदर्श समाजापुढे व्यक्त केला, तो आजही- किंबहुना त्याहून जास्त समाजसन्मुख आहे. तो श्लोक असा...

'उपासनेला दृढ चालवावे
भूदेव संताशी सदा लवावे
सत्कर्म योगी वय घालवावे
सर्वामुखी मंगल बोलवावे'

रामदासांच्या या श्लोकात त्यांनी जी जगण्याची जीवनशैली दाखविली आहे, त्यातील शेवटची क्रियापदे द्वंद्वशील आहेत. रामदास स्वत:बरोबर इतरांनाही आपलेसे करतात. चालवावे, घालवावे, बोलवावे आणि लवावे ही क्रियापदे बहुअर्थी, बहुगुणी आहेत. यात समग्र मानवजातीला ठासून दिलेला आदर्श आहे. मानवाला नुसता विचार करायचा नाही, तर त्याला आचारापासून तोडायचे नाही. ही सारी जीवनशैली सत्कर्मात डुबली पाहिजे, ही खरी गोम आहे. समग्र श्लोकाची शैली अथपासून इतिपर्यंत पल्लेदार झाली आहे. अखिल मानवता केवळ शब्दांत न अडकता आचरणबद्ध झाली पाहिजे. संत हे केवळ टाळकुटे नव्हते, तर ते तुमचे-आमचे मार्गस्थ दीपस्तंभ होते. म्हातारपणाला नवा उजाळा देणारा हा सुखी जगण्याचा एक मंत्र आहे.

**मधु जामकर,** परळी, जि.बीड
Mob. 9850294686

# प्रतिसाद

## बांगलादेशचा धडा, न्यूझिलंडची गोष्ट

निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले यांची बांगलादेशावरील दहा भागांची लेखमालिका सुबोध परिचय करून देणारी आहे. 'बांगलादेश आणि सर्वधर्मसमभाव : एक संमिश्र चित्र' या लेखातील शेवटचे वाक्य महत्त्वाचे आहे. 'अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे, तरच अल्पसंख्याक, आदिवासी आणि बुद्धिप्रामाण्यवादी व्यक्तींना सुरक्षितता लाभेल. भारतातही परिस्थिती वेगळी आहे का? भारतीयांनीही त्याचा विचार केला पाहिजे.' या वाक्याचे उत्तर स्पष्टपणे सांगितले पाहिजे. भारतातील आजची परिस्थिती पूर्वी कधीही नव्हती इतकी चिंताजनक आहे. सर्वच सांविधानिक संस्था आपले कर्तव्य योग्य प्रकारे बजावतात का, हा प्रश्नच नाही. माध्यमे, सरकारी यंत्रणा इत्यादी स्तंभ आपली विहित कर्तव्ये निःपक्षपातीपणे पार पाडत नाहीत, हे कटुसत्य आहे.

एक भारतीय या नात्याने पाहता आपल्या देशाची स्थिती आणि सेक्युलॅरिझम, लोकशाही व स्वातंत्र्य यांची अवस्था चिंता वाढविणारी वाटते. फ्रीडम हाऊसच्या सर्वेक्षणात लोकशाही स्वातंत्र्याच्या दृष्टीने भारत गेल्या वर्षीपेक्षा खाली घसरून ६७ वा क्रमांक मिळवून Partly Free - अंशतः स्वतंत्र या श्रेणीत आला आहे. Economic Intelligence Unit ranking च्या अनुसार लोकशाही निर्देशांक घसरून १६७ देशांमध्ये ५३ व्या क्रमांकावर आहे. (गेल्या वर्षी ५१ वा क्रमांक होता.)

याचा अर्थ भारतीय लोकशाहीमध्ये त्रुटी आहेत. अंमलबजावणी सदोष आहे. गेल्या सहा-सात वर्षांतील अटक झालेले विद्यार्थी, कार्यकर्ते, पत्रकार, पर्यावरणवादी आदींबद्दल समाधानकारक स्थिती नाही. लोकशाही, स्वातंत्र्य व सेक्युलॅरिझम या बाबतीत सर्वोच्च स्थानावर आहेत नॉर्वे, स्वीडन, आईसलँड, न्यूझीलंड कॅनडा. ही राष्ट्रे लोकशाही-स्वातंत्र्य या मूल्यांचे खऱ्या अर्थाने पालन करतात. भारत आपल्या ठरलेल्या मार्गापासून भरकटला आहे. माध्यमांपासून नोकरशाही, घटनात्मक संस्था- सर्वांनी आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.


ओमर

न्यूझीलंडमधील एक गोष्ट अलीकडेच प्रसिद्ध झाली होती. ती आपल्यासाठी उद्बोधक आहे.

श्री.इब्राहिम ओमर हे मूळचे आफ्रिकेतील एरिट्रिया या छोटाशा देशातील. हा देश हिंसा आणि अशांतता, युद्ध यांच्या विळख्यात सतत सापडलेला. त्यात परकीयांची आक्रमणे आणि सशस्त्र घुसखोरी, नागरी युद्ध, गरिबी, अन्याय, हलाखी पाचवीला पुजलेली. संपूर्ण देश पूर्णपणे मोडकळीला आलेला. पण अखेरीला आपला देश, आपले जिव्हाळ्याचे आप्त-स्वकीय सर्व सोडून, शिक्षण अर्धवट सोडून ते १५००० किमी दूर न्यूझीलंडमध्ये आले. तिथे कष्टाची कामे करत असताना भविष्य अंधकारमय होते. एका विद्यापीठात झाडलोट

करायचे. काबाडकष्ट करून शिक्षण घेतले. व्हिक्टोरिया विद्यापीठात सफाई कामगार म्हणून काम करताना त्यांनी मनात ठरविल्याप्रमाणे त्याच विद्यापीठात प्रवेश मिळविला, पार्लमेंटमध्ये निवडून आले. त्या वेळी आपल्या भाषणात त्यांनी न्यूझीलंडच्या लोकशाही स्वातंत्र्याचे, समतेचे दर्शन घडविले. ते म्हणाले, ''न्यूझीलंडवर दहशतवादी हल्ला झाला. विपरीत घडले, पण या देशातील लोकांनी आणि विशेषत: पंतप्रधानांनी एकतेचे दर्शन घडविले. आपल्या नेतृत्वाने देशाला संकटातून बाहेर काढले. केवळ पंतप्रधानच नाही, तर न्यूझीलंडमधील सर्वच नागरिकांनी आम्हाला– मुस्लिमांना– कवटाळले, रक्षण केले. आमच्यातील परकेपणा गळून पडला. पंतप्रधान आणि लाखो न्यूझीलंडच्या नागरिकांनी आमच्यातील नाते दृढ केले. आम्ही स्थलांतरित, निर्वासित राहिलो नाही.''

मुस्लिम, स्थलांतरित, निर्वासित असूनही ते पार्लमेंटचे सभासद झाले. त्या वेळी शेवटी "Thank you to our Prime Minister, the Right Honourable Jacinda Ardern, and the Hon Grant Robertson for your leadership and also for your personal support to me." असे आभार मानले. भाषण संपल्यानंतर पार्लमेंटच्या सर्व सभासदांनी उभे राहून टाळ्या वाजवून आदर व्यक्त केला 'Standing Ovation.'

आपल्या देशाची वाटचाल या दिशेने व्हावी, यासाठी प्रयत्न करू या.

**डॉ. अनिल केशव खांडेकर,** कोथरूड, पुणे

## 'बबनभाऊ म्हणजे कोण?' हा उलगडा झाला...

दि.१३ मार्चचा साधना अंक कालच मिळाला. या अंकातील दोन लेखांबद्दल प्रतिक्रिया खालीलप्रमाणे...

मी बी.एस्सी.ला शिकत असताना १९७४ च्या दरम्यान सर्वप्रथम इंग्रजी कादंबरी वाचावी म्हणून रेल्वे स्टेशनच्या बुकस्टॉलवरून Grapes Of Wrath खरेदी केली. परंतु माझे दुर्दैव की, त्या पुस्तकातील बोजड आणि वाचकाला थकवणारी भाषा–मांडणी आडवी आली. अखेर आजवर मी ते पुस्तक पूर्णपणे वाचण्याची हिंमत करू शकलेलो नाही. सदरच्या अंकात त्याच पुस्तकातील एका प्रकरणाचा मराठी अनुवाद आला असल्याने मी ते वाचायला उत्सुकतेने सुरुवात केली. पण माझे 'ते' दुर्दैव माझ्या पिच्छा सोडायला तयारच नाही, असे लक्षात आले. अनुवादसुद्धा मला मूळ इंग्रजी पुस्तकात आढळल्यानुसार बोजड आणि 'न–ओघवताच' आढळून आला. पर्यायाने मला हे प्रकरणसुद्धा पूर्ण वाचण्याची हिंमत झाली नाही. अर्थात, हे माझे अल्पमतीचे आकलन आहे आणि त्याबद्दल मी क्षमाप्रार्थीसुद्धा आहे. असो.

मनीषा गुप्ते यांचा 'साथी बबन डिसोजा : सच्चे समाजवादी, प्रेमळ काका' हा लेख वाचून मला माझ्या वडिलांची (निधन : जानेवारी २०१८/८८ व्या वर्षी) आठवण ताजी झाली. त्याचे झाले असे की, अशोक मेहता जेव्हा गोंदियातून लोकसभेसाठी निवडून आले (नंतरच्या निवडणुकीत एका साध्या व्यक्तीकडून– ज्वालाप्रसाद दुबे यांच्याकडून– त्यांना पराभूत व्हावे लागले होते), तेव्हा प्रचारादरम्यान त्यांचा मुक्काम पुष्कळदा आमच्या वाड्यातच असायचा. माझे वडील या भागातील तत्कालीन काँग्रेसचे एक महत्त्वाचे व प्रभावशाली(!) कार्यकर्ते असल्याने मलासुद्धा माझ्या बालपणी अशोक मेहता यांना जवळून अनुभवता आले. कदाचित मी त्यांच्या प्रभावानेच प्रथमपासूनच (१९७३ पासून) दाढी ठेवतो आहे. तर, माझ्या वडिलांच्या तोंडून मी अशोक मेहता यांचे कार्यकर्ते म्हणून 'बबनभाऊ' यांचे नाव कित्येकदा ऐकले होते. (आमच्याकडे नावासमोर भाऊ लावून संबोधण्याची पद्धत अजूनही आहे. माझ्या वडिलांचे नाव मोहनलाल असले तरी ते मोहनभाऊ याच नावाने ओळखले जायचे.) पण हे 'बबनभाऊ' म्हणजे कोण, याचा मला कधीच उलगडा झाला नव्हता. गुप्ते यांचा हा लेख वाचून मला आता बबनभाऊ कळले. हे बबनभाऊ आमच्या वाड्यात थांबले, राहिले, जेवलेही आहेत; कारण निवडणुकीच्या कालावधीत आमच्या वाड्यात वीस–पंचवीस लोकांच्या जेवणाची व्यवस्था असायचीच. तर अशा प्रकारे मला या लेखाच्या आभासी पद्धतीने का असेना– माझ्या वडिलांच्या तोंडी ज्यांचे नाव असायचे, असे आदरणीय बबनभाऊ कळले याचा अर्थातच खूप आनंद झाला. बबनभाऊंना माझा प्रणाम!

**लखनसिंह कटरे,** बोरकन्हार, जि.गोंदिया,

## आपले घोडे नेमके तिथेच पेंड खाते

जागतिक महिलादिनाच्या पार्श्वभूमीवर 'स्त्री–पुरुष (किमान) समता : शिखर गाठण्यास १३० वर्षे लागणार' या संपादकीयात (साधना दि.१३ मार्च) जागतिक पातळीवर स्त्री–पुरुष समानतेचा सप्रमाण धांडोळा घेतला आहे. याच पैलूचा



हरसिमरत कौर

आधार घेत ‘स्त्री-पुरुष समता’ या परिप्रेक्ष्यात भारतात सामाजिक, राजकीय, वैयक्तिक पातळीवर आपण कोठे आहोत, याचा थोडासा ऊहापोह करणे क्रमप्राप्त ठरते.

‘सैन्यदलात महिलांची अधिकारपदावर नियुक्ती केली तर त्या महिलेने एक अधिकारी म्हणून दिलेले आदेश पाळणे पुरुषांना कमीपणाचे वाटू शकते,’ असे आतार्किक कारण (‘बेटी पढाओ-बेटी बचाओ’ अशी घोषणा देणाऱ्या) मोदी सरकारतर्फे सर्वोच्च न्यायालयात दिले गेले होते. ज्या देशात एका महिलेने पंतप्रधानपद भूषविले, आयर्न लेडी- दुर्गा म्हणून जिला संबोधिले गेले- अशा देशातील केंद्र सरकारतर्फे महिलांना सैन्यदलातील अधिकारपद नाकारण्यास्तव अशी कारणे सर्वोच्च न्यायालयात दिली गेली आहेत.

मोदी सरकारच्या तीन वादग्रस्त कृषी कायद्यांविरोधात भाजपचा सर्वांत जुना मित्रपक्ष शिरोमणी अकाली दलाच्या एकमेव मंत्री असलेल्या नेत्या हरसिमरत कौर यांच्या राजीनाम्याची घोषणा त्यांचे पती व लोकसभा खासदार सुखबिरसिंग बादल यांनी केली.

दक्षिणेतील १२० वर्षे जुन्या, ३८ हजार कोटी रुपयांची उलाढाल असलेल्या मुरुगप्पा समूहाच्या संचालक मंडळावरील नियुक्तीला सदर समूहाचे संस्थापक असलेले एम.व्ही. मुरुगप्पन यांच्या कन्या अरुणाचलम यांना त्या स्त्री आहेत म्हणून विरोध झाला. ही काही प्रातिनिधिक उदाहरणे ‘स्त्री-पुरुष समता’ मध्ये भारत कुठे, यावर जळजळीत भाष्ये करणारी आहेत.

सर्वोच्च न्यायालयाचे मागील काही निर्णय भारतीय स्त्री-जगतासाठी फारच महत्त्वपूर्ण ठरणारे आहेत. जसे की- ४९७ हा वसाहतकालीन कायदा रद्दबातल ठरवणे- पती हा पत्नीचा मालक नाही, केरळमधील शबरीमला देवस्थानासंदर्भात सर्व वयोगटातील महिलांना प्रवेश देणे- पुरुष मंदिरात जिथपर्यंत जाऊ शकतात तिथपर्यंत महिलांनाही जाण्याचा हक्क आहे, सेनादलांत महिलांना नेतृत्वपद देणे- महिलांची स्थायी नियुक्ती करणे. न्यायालयाचे हे निर्णय स्त्री-पुरुष समानता या अनुषंगाने दूरगामी ठरणार आहेत; पण कधी? तर, न्यायालयीन आदेशाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी केली गेली तर. आणि आपले घोडे नेमके तेथेच पेंड खाते.

मध्यंतरी स्वित्झर्लंडमधील दावोस येथे भरलेल्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या परिषदेत २०२० चा ग्लोबल जेंडर गॅप रिपोर्ट अहवाल सादर करण्यात आला आहे. जगभरात स्त्री-पुरुष समानतेबाबत काय स्थिती आहे, यासाठी जगातील १५३ देशांचा अभ्यास करून सादर केलेल्या या पावणेतीनशे पानांच्या अहवालात भारताचा क्रमांक ११२ वा आहे. यावरूनच स्त्री-पुरुष समानतेबाबतची आपली लढाई अजून संपलेली नाही, हेच अधोरेखित होते.

**बाळकृष्ण शिंदे**, पुणे

## अनेक पक्षांच्या आघाडीतून सरकार झाले असेल तर...

संतोष दास्ताने यांचा २० मार्चच्या साधना अंकातील ‘विषमतेचा विषाणू’ हा लेख आवडला. काही अपवाद वगळता सर्व जगभर व भारतामध्ये विषमता वाढत आहे असे त्यांनी प्रतिपादन केलेले आहे, ते सर्वांना पटण्यासारखेच आहे. पण या अपवाद असलेल्या देशांनी कशा प्रकारे विषमतेचा सामना केला, हे त्यांनी दिलेले नाही. या देशांनी अवलंबिलेल्या धोरणांपासून भारताला खूप काही शिकता येईल. मला वाटते की, हे देश म्हणजे पश्चिम युरोपीय देश (इंग्लंड वगळता) व स्कँडिनेव्हियन देश असावेत. प्रमाणशीर प्रतिनिधित्व या निवडणूक पद्धतीमुळे या देशांमध्ये सहमतीचे राजकारण निर्माण होते. तसेच या देशातील शासन हे अनेक पक्षांच्या आघाडीतून सरकार निर्माण होते. त्यामुळे विरोधी राजकीय पक्षांशी संघर्षमय राजकारण निर्माण होत नाही. परिणामी या देशांमध्ये समाजकल्याण योजनांवर खूप खर्च केला जातो, पर्यावरणाची जास्त चांगली काळजी घेतली जाते, परराष्ट्रांना विकासासाठी जास्त मदत दिली जाते, तर युद्धसाहित्याची मदत फार कमी केली जाते.

या देशांबद्दल दास्ताने यांचा अभ्यास काय आहे, त्याचा फायदा साधनाच्या वाचकांना व्हावा.

**सुभाष आठले**, कोल्हापूर.

# साधना प्रकाशनाची
# 75 पुस्तके e-book स्वरूपात kindle वर उपलब्ध

नोकरशाहीचे रंग • राजकारणाचा ताळेबंद • बापू : एकभाषित चिंतनकाव्य
हिंदभक्त विदेशिनी • बहादूर थापा • दलपतसिंग येती गावा • ऋतू बरवा
विज्ञान आणि समाज • चिखलाचे पाय • वाचता वाचता • शाळाभेट
गांधीजी आणि त्यांचे टीकाकार • स्वामिनाथन • दंतकथा • उघडा, दरवाजे उघडा!
प्रश्न तुमचा उत्तर दाभोलकरांचे • कोऽहम • मन्वंतर • युगांतर • सेंटर पेज • तारांगण
तीन तलाक विरुद्ध पाच महिला • श्यामची आई • लाल श्याम शाह
तीन मुलांचे चार दिवस • आठ प्राथमिक शिक्षकांची आत्मवृत्तं • हिरवे पान
विवेकाचा आवाज • चले जाव • इस्लाम आणि सहिष्णुतेचे भवितव्य • कालपरवा
माझे शिक्षक • सा. रे. पाटील बोलतोय • हे मित्रवर्या • वारसा प्रेमाचा
सार्क विद्यापीठातील दिवस • तात्पर्य • आठवणी जुन्या शब्द नवे • थर्ड अँगल
शोधयात्रा : ईशान्य भारताची • बिकट वाट • न पेटलेले दिवे • डिकन्स आणि ट्रोलॉप
लाटा लहरी • लॉरी बेकर • ऐकता दाट • इकेबाना • मी भरून पावले आहे
लढे अंधश्रद्धेचे • नक्षलवादाचे आव्हान • कैफियत • झुंडीचे मानसशास्त्र • जमीला जावद
मला प्रभावित करून गेलेला सिनेमा • कानोसा– भारतातील मुस्लिम मनाचा
पोशिंद्याचे आख्यान • इस्लामचे भारतीय चित्र • बिजापूर डायरी • ऋणानुबंध
थैमान चंगळवादाचे • मेळघाट : शोध स्वराज्याचा • तरुणाईसाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर
चार्वाक • एकाकी • शोधयात्रा : ग्रामीण महाराष्ट्राची • चकवा • अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट
कारंत चिंतन • उंबरठ्यावर • गुलामगिरीतून गौरवाकडे • भारतातील मुस्लिम राजकारण
असेही विद्वान • श्याम • धडपडणारा श्याम • श्यामचा जीवनविकास
वरदान रागाचे • अँग्री यंग सेक्युलॅरिस्ट • पुढे जाण्यासाठी मागे वळून पाहताना

सर्व पुस्तकांच्या किंमती
५० ते २०० रुपये या दरम्यान
Free with kindle unlimited membership

आणखी ७५ पुस्तके
आगामी पाच महिन्यांत
क्रमाक्रमाने उपलब्ध होतील...

also available on amazon.in

अधिक माहितीसाठी संपर्क
**साधना** प्रकाशन
431, शनिवार पेठ, पुणे 411030
Ph 02024459635 • mediasadhana@gmail.com




Date of Publication : 22-3-2021



SkinSense
Skin & Laser Clinic
Using science to enhance youth and delay ageing.
Dr. Abhijit Desai
Cosmetic Dermatologist and Laser Specialist
Dr. Gauri Desai
MD, Laser Specialist
Medical State of the Art LASERS
Skin Toning
Face Lift & Skin Tightening
Reduction of Snoring
Permanent Hair Reduction
Acne Scar Reduction
Tattoo Removal
Pigmentation Treatment
Vaginal Tightening
Spot Fat Reduction and Body Sculpting
Pore Minimisation
Texturing
Tel no.:
02224331099 / +919920977940
Address:
2nd floor, Marathe Udyog Bhavan, Appasaheb Marathe Marg, Prabhadevi, Mumbai – 400028
Email: dr.skinsense@gmail.com | Website: www.yourskinsense.com

साधना साप्ताहिक :
२७ मार्च २०२१

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6 / 31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/ 2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting : 22-3-2021 / Date of Publication : 22-3-2021

# वसमत तालुक्यातील पहिली नागरी सहकारी बँक


लोकनायक जयप्रकाश नारायण


शंकरराव खराटे
संस्थापक।अध्यक्ष


आमचे दैवत श्री बापुसाहेब काळदाते


जय बँक

| अ.क्र. | तपशील | रक्कम (लाखांत) |
|---|---|---|
| १ | भाग भांडवल | २१९.२५ |
| २ | राखीव व अन्य निधी | ३४८.५२ |
| ३ | एकूण ठेवी | १०१८७.४८ |
| ४ | गुंतवणूक | १६३५.६७ |
| ५ | एकूण कर्ज | ५५७२.९५ |
| ६ | खेळते भांडवल | १०९३७.६३ |
| ७ | नफा | २९.६० |
| ८ | Gross NPA | ४.८९ |
| ९ | NET NPA | २.७३ |
| १० | CRAR | १०.७७ |
| ११ | ऑडिट वर्ग ३१/३/२०१९ | ब |

लोकनायकाच्या नावाने चालणारी
एकमेव बँक

## जयप्रकाश नारायण नागरी सहकारी बँक लि. वसमतनगर

स्थापना : १९९४

मुख्य कार्यालय, श्री छत्रपती शिवाजी चौक,
वसमतनगर ४३१ ५१२ जि. हिंगोली
फोन : (०२४५४) २२२९०५, २२०६३१

**शाखा : वसमत, हिंगोली, सोनगाव**
**विस्तारित कक्ष : कुरुंदा, गिरगांव, वसमत**

बी. एम. गोरे
सहाय्यक सरव्यवस्थापक

बी. आर. वैद्य
सरव्यवस्थापक

शामराव डिगुळकर
उपाध्यक्ष

| संचालक मंडळ | | |
|---|---|---|
| श्री. खराटे शंकरराव संभाजी | श्री. डिगुळकर शामराव लक्ष्मण | श्री. बेले पांडुरंग जळबाजी |
| डॉ. जिंतुरकर अनिल दिगंबरराव | श्री. कडतन विजय श्रीरंगसा | श्री. इंगोले निरंजन बेगाजी |
| श्री. झंवर संतोष भगवानदास | श्री. बागल विवेक सखाराम | श्री. तोरेवार गणेश व्यंकटी |
| श्री. गवळे भास्कर लक्ष्मण | सौ. भोसले गुंफाबाई नागोराव | सौ. गोरे नंदाबाई गणेशराव |
| श्री. जोशी गजानन गोविंदराव | श्री जगताप एकनाथ विश्वनाथ (सी.ए.) | |

### । बँकेची ठळक वैशिष्ट्ये ।

| | | | |
|---|---|---|---|
| १) २४ वर्षांची अविरत व विश्वसनीय सेवा | २) CBS सोल्युशन | ३) CRAR सतत १० टक्केपेक्षा जास्त | ४) रु. ५ लाखापर्यंत ठेव विमा योजनेअंतर्गत पूर्ण सुरक्षित |
| ५) स्वतःच्या मालकीचे घर घेण्याकरता दीर्घ मुदतीची व अल्प व्याजदराची गृहस्वप्न कर्जयोजना | | | ६) RTGS व NEFT सेवा उपलब्ध |
| ७) पूर्ण संगणकीकृत व वातानुकूलित शाखा | ८) CTS चेक सुविधा | ९) वीजबील स्वीकृती केंद्र | १०) मिस कॉल अलर्ट सुविधा |
| ११) तत्काळ सोनेतारण कर्ज उपलब्ध | १२) ज्येष्ठ नागरिक व सहकारी संस्थाकरता ठेवींवर नियमित व्याजदरापेक्षा ०.५०% अधिक व्याजदर | | |